अठराशे सत्तावनच्या क्रांती वर आधारित

## नाटक



# प्रक्षोभ

लेखक: कै. पांडुरंग सूर्यवंशी

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# प्रक्षोभ

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

a

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रक्षोभ

## अठराशे सत्तावनच्या क्रांती वर आधारित नाटक

कै. पांडुरंग सूर्यवंशी

# प्रक्षोभ

**लेखक : कै. पांडुरंग सूर्यवंशी**

द्वारा- कुमुद्वती भोसले

पत्ता - प्लॉट नंबर 15 ,दीप सेवक सोसायटी ,आर के नगर ,कोल्हापूर .

संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८

Email : bhosalekumudwati@gmail.com

मुखपृष्ठ - प्रश्रय शरश्चंद्र सूर्यवंशी.मुंबई

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकांच्या वारसाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

his declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

a

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(For free ebooks send your name and place)

प्रकाशन : २३ जुलै २०२२

(लेखक कै पांडुरंग सूर्यवंशी आणि लोकमान्य टिळक जयंती)

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# कै. पांडुरंग देवाप्पा सूर्यवंशी



(जन्म -२३ जुलै.१९२६ मृत्यू -४ एप्रिल -१९७६.)

हे बेळगांवचे सिद्धहस्त साहित्यिक आणि प्रतिभावान कवी होते. त्यांनी १९४० ते १९५० या दरम्यान काही कविता, एक खंडकाव्य, लघुनिबंध व नाटक लिहिले. त्यापैकी कथा व कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांच्या पहिल्याच लघुकथेला पहिले बक्षिस मिळाले होते. त्यांच्या कविता अभिरूची आणि सत्यकथा या दर्जेदार मासिकातून अग्रक्रमाने प्रसिद्ध होत होत्या. 'तुला कोणती आणु वानगी', 'माऊली', 'अभिसार' या कविता 'अभिरूची' त गाजल्या होत्या. 'वैशाखाचे स्वप्न' हे खंडकाव्य, शार्दुलविक्रिडित वृत्तात लिहून त्यांनी अभिरूची'कडे पाठविले होते, परंतु अभिरूची मासिक बंद पडले आणि त्या खंडकाव्याचे काय झाले ते समजले नाही. या खंडकाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे के. माधव ज्यूलियन यांच्या 'विरहतरंगा' नंतरचे त्या वृत्तात लिहिलेले मराठीतील हे दुसरे खंडकाव्य होते. या खंडकाव्याचा विषय हा अखंड आसामच्या डोंगराळ भागातील जनतेविषयी होता.

रा. स्व. संघाचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि संघाच्या नित्य कार्यामुळे त्यांच्याकडून विपुल साहित्य रचना झाली नाही. मात्र रा. स्व.

a

संघाशी बाळपणापासून संबंध आल्यामुळे त्यांच्या विचारात आणि शब्दात भावोत्कटता, लयबद्धता, गतिमानता, ओज व तेज हे गुण प्रकर्षाने जाणवत होते.

त्यांचे शिक्षण चिंतामणराव हायस्कूल, लिंगराज कॉलेज, लॉ कॉलेज आणि बी. टी. कॉलेज येथे होऊन त्यांनी एम.ए., एलएल.बी., बी. एड्. या पदव्या मिळविल्या होत्या. त्यानंतर चिंतामणराव हायस्कूल आणि नंतर सरदार्स हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षक म्हणून नोकरी केली. शिक्षक असतानाच ते दीर्घकाळ असाध्य व्याधीने आजारी पडले आणि कीटस्, शेले, बालकवी यांच्याप्रमाणेच साहित्यिक क्षेत्रात नाव कमावण्याची प्रतिभा असूनसुद्धा सगळेच व्यर्थ गेले. प्रदीर्घ कालानंतर वयाच्या अवघ्या ५० व्या वर्षी म्हणजे १९७६ मध्ये ते वडगांव येथील आपल्या घरी निधन पावले.

कॉलेजमध्ये डॉ. ग्रामोपाध्ये, डॉ. वि. म. कुलकर्णी आणि कविमित्र शांताराम रामचंद्र यांच्या सहवासात राहून त्यांनी वाङ्मय प्रकाश मंडळातर्फे 'नवधारा' हा प्रातिनिधीक काव्यसंग्रह आचार्य अत्रे व ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या उपस्थितीत बेळगावच्या साहित्य संमेलनात प्रसिद्ध केला. या कवितासंग्रहामध्ये देखील त्यांनी लिहिलेली चार ओळीची गणिका गाजली.

# प्रक्षोभ

-- सन अठराशे सत्तावनच्या क्रांती वर आधारित नाटक

--------------

लेखक--कै.पांडूरंग देवाप्पा सूर्यवंशी

M.A.L.L.B. BEd

वडगांव, बेळगांव.

--------------

a

नाटकातील पात्रे---

1)नानासाहेब पेशवे.
2)ज्वालाप्रसाद(हेरप्रमुख)
3)अझीमुल्लाखान (मंत्री)
4) सेनापती तात्या टोपे
5) झाशीची महाराणी लक्ष्मीबाई
6) मिस्टर डॅनियल शेपर्ड
7) मिसेस डोरोथी शेपर्ड
8) मिस स्यु जेनी शेपर्ड
9) नानकचंद
10) सुरेंद्रनाथ चटोपाध्याय
11) सर व्हीलर (इंग्रजांचा कानपूर येथील सैन्याधिपती
12) मूर----
13) व्हायटिंग----
14) रोक---- हे तीनही इंग्रज अधिकारी
15) रंगराव घोडेस्वार
16) केशव भट्ट (नानांचा पुजारी)
17) एक तरुण
18) पहिला घोडेस्वार
19) दुसरा घोडेस्वार
20) चौकीदार

a

# अंक 1 ला

अठराशे सत्तावन साल. त्याच्या सुरुवातीचे दिवस. उठावाच्या पूर्वी पाच सहा महिने अगोदर गंगेच्या किनारी वसलेले ब्रम्हावर्त. ब्रह्मावर्तातील नानासाहेब पेशव्यांचा प्रासाद. प्रसादातील एक भव्य दालन. या दालनात नानासाहेब आणि त्यांचे इतर सहकारी यांचे बरेच वेळा हितगूज होत असते. राजकारणाविषयक अनेक गोष्टींचे निर्णय याच दालनात घेतले गेले आहेत. गेली पाच-सहा वर्षे हे दालन गुत बैठकांचे स्थळ होऊन बसले आहे. याच दालनाच्या आतील बाजूस पेशव्यांचे देवघर आहे. डावीकडील बाजूस पेशव्यांचे नेहमीचे बसण्या उठण्याचे दुसरे एक प्रशस्त दालन आहे. त्या डाव्या बाजूच्या दालनातून रंगभूमीवरील या प्रशस्त दालनात एक घोडेस्वार लगबगीने प्रवेश करतो. देवघर आहे त्या दिशेने गणपतीला बाहेरुनच मनोभावे नमस्कार करून पुन्हा घाई करू लागतो. त्याचा नमस्कार संपावयाला आणि देवघरातून पळी पंचपात्रासह सोहळे सावरीत भटजी प्रवेश करण्याला एकच गाठ पडते. तथापी घोडेस्वाराचे लक्ष तिकडे जात नाही. घोडेस्वाराला पाहून भटजीची मात्र कळी खुलते. त्याला जुन्या मित्राची गाठ पडल्याबद्दल अत्यानंद होतो. भटजी घोडेस्वाराला हटकतो.

a

केशव भट--- नमस्ते रंगराव!

रंगराव घोडेस्वार ---कोण केशव?

केशव --म्हटलं - नमस्ते.

रंगराव --राम राम.

केशव---- नमस्कार स्वीकारण्याची तरी फुरसद आहे की नाही?

रंगराव ---का बरं?

केशव --- जेव्हा पहावं तेव्हा तू आपला घोड्यावर बसलेला!

रंगराव ---खोलीत नेहमी लोळत पडून घोडेस्वार म्हणवून घेण्याचे दिवस गेले आता भटा! आज-काल नेहमी घोड्याच्या पाठीला!

केशव ----तेच तर विचारतोय मी! आज काल तुझ्या फुरसतीचा राम राम कधी सुद्धा लाभला नाही. आहेस कुठल्या गडबडीत?

रंगराव ---अरे आहे झालं काहीतरी. आजकाल नानासाहेबांचा जमाना आहे ना? स्वस्थ पडून पगार खायला देतील तर शप्पथ!

केशव ---गेले ते दिवस रंगराव!आता आमचाही काळ फिरला खरा.

रंगराव ---का रे, तुझं काय एवढं वाटोळं झालं?

a

केशव--- अरे, वाटोळं होतं ते सपाट होत चालले ना! हे काय पोट? कसं वाटोळं गरगरीत होतं रावबाजींच्या काळी! आताशा पाठीशी चिकटत चाललंय.(खालच्या आवाजात)नाना साहेबांची आमदानीदुसरं काय?

रंगराव ---एकूण तुझी ही परिस्थिती आज काल बिघडलेलीच आहे म्हणतोस?

केशव--- काय गंमत आहे पहा. तू आळशी होतास, तो तुझ्या मागं काम हात धुऊन लागलं आणि मी," कोण हे काम "म्हणणारा आज-काल बेकार होत चाललो.

रंगराव ---का? अलीकडे पूजा -व्रत-वैकल्यं तुझ्याकडेच आहेत ना इथली?

केशव ---अरे, ही कसली व्रतवैकल्य आणि ही कसली पूजा? काय उपयोगी ही असून?

रंगराव ---का? असं का म्हणतोस?

केशव--- अरे, रावबाजीसाहेबांच्या वेळच एक शतांश तरी राहिलं आहे का? रावबाजीसाहेब पूजेला बसले म्हणजे घंटा घंटा हलायचे नाहीत. तेच हे नानासाहेब मिनिट दोन मिनिट पूजेला बसतील तर

शपथ! नमस्कार करतील, गंध लावतील की थेट बाहेर पडतील देवघरातून.

रंगराव----मग काय बिघडलं तुझं? उलट. तू आनंदच मानला पाहिजेस. तेवढेच काम कमी नाही का तुझं?

केशव ----अरे बाबा, तुला कळायचं नाही ते! आज काल आमची वर्षासन आणि दक्षिणा त्यामुळे कमी झाली. त्याचं काय?

रंगराव ----हां हां! असं होय? एकूण तुझी नाखुशी नानासाहेब पूजेत फार थोडा वेळ घालवितात याबद्दल नसून, तुला मिळणारी दक्षिणा तुटली याबद्दल आहे.

केशव ----हां.!कस बरोबर ओळखलस पण! ती तशीच मिळत राहती तर काही हरकत नसती. मग नानासाहेबांनी अजीबात पूजेला फाटा दिला असता तरी काही हरकत नसती माझी!

रंगराव ----अरेरे,फार वाईट गोष्ट झाली!

केशव ---किती वाईट ते काही विचारू नकोस! आणि तू सुद्धा विचार करण्याच्या फंदात पडू नकोस! विचारच करता यायचं नाही तुला.

रंगराव ---हो, मला विचार करायलाही सवड नाही हे ठाऊक आहेच तुला!

केशव ----आणि मला विचार करण्या व्यतिरिक्त आता दुसरी सवडच उरली नाही, हे तुलाही कळून आलच असेल. रावबाजीच्या वेळी मेजवान्या झोडझोडून इतकी सुस्ती यावयाची म्हणतोस! विचाराला डोक्यात चुकून सुद्धा प्रवेश मिळत नसे!

रंगराव ---च् च् च्! फार वाईट झालं पण! आजकाल विचार तरी एवढा कसला करतोस?

केशव--- दुसरा कसला? त्याकाळची ती दररोजची नवी-नवी पक्वान्ने, त्यांचे ते सुगंध, त्यांची ती खुमासदार चव, त्यांचा तो नुसता स्पर्श सुद्धा किती सुखद असायचा! त्या सार्यांच्या गोड आठवणींची ही भाऊगर्दी होते डोक्यात. पण काय उपयोग? रिकाम्या पोटीच्या नुसत्या कोरड्या आठवणी त्या! त्यान उलट डोकं गरगरायलाच लागतं.

रंगराव ---तरीच तू नानासाहेबांना दोष देत सुटला आहेस! श्रीखंड-पुरीच्या, शिऱ्या लाडवाच्या विचारां - ऐवजी जरा वेगळे विचार तुझ्या डोक्यात आणतास तर कशाला इतका बेचैन होतास भटा!

केशव ----श्रीखंडपुरी, लाडू शीऱ्या व्यतिरिक्त वेगळे विचार? काय म्हणतोस काय तू?

रंगराव ----तेच तर म्हणतो आहे!

a

केशव ---अरे पिढ्यानपिढ्या मुरलेला आहे तोच पूऱ्या लाडवाचा विचार! दूसरा विचार या डोक्यात शिरण्याचा विचार तरी कसा करवतो तुला?

रंगराव ----पण आता तुला मी म्हणतो तो विचार केलाच पाहिजे! रावबाजींनी राज्य बुडविलं,' पण तुला खंत वाटली नाही! तु आपला लाडू जिलब्यांच्या मेजवानीवर संतुष्ट! आता रावबाजींच्या मरणानंतर कंपनी सरकारने त्यांच आठ लाखाच पेन्शन नानासाहेबांना देण्याचं बंद केलंय याचा कधी तू या चार-पाच वर्षात चुकून तरी विचार केला आहेस?

केशव ----तो विचार मला रे कशाला हवा? आमचं कर्तव्य देवघरापाशी! राजकारण्याचा स्पर्श आम्हाला कशाला?

रंगराव ---म्हणजे धन्याचं काहीही झालं तरी त्यानं तुमची वर्षासन चालूच ठेवावी, आणि तुमचे हात दक्षिणेन ओले करीत राहीलच पाहिजे असंच ना?

केशव---- अलबत! कसं बरोबर बोललास? राजकारण बघावं धन्यानं! आम्ही आपले फार तर देवघर सांभाळू! त्यात कुचराई झाली की मग मारा पोटावर हवं तर! पण आम्ही आमच्या संध्येची पळी नेहमी ओली ठेवण्यात तत्पर असताना, धन्यानं आमचा हात ओला ठेवू नये म्हणजे, काय आहे काय?

रंगराव ---अरे कुणी ऐकतील जरा, हळू बोल! शिवाय आज इथं पेशवे सरकारही आहेत.

केशव ----हळू काय बोल? ब्राह्मणातलं ब्रह्मतेज तापलं आहे आता! फार झालं हे! किती दिवस सहन करायचं? आता मीच नानासाहेबांना एकदा समक्ष सांगणार आहे.

रंगराव ---अस्स?मग मी तुला मदत करू का? मीच सांगतो त्यांना!

केशव ----नको बाबा. तेवढं करू नको. तुझं घोडं तू सांभाळ आपला. तुझी घोडदौड मला नाही झेपायची. माझं मी सांगेन वेळ साधून!

रंगराव----पण अशी वेळ आता फार विरळा येईल केशव! तू आपला माझा लंगोटी मित्र म्हणून तुला मी हे सांगतो! गेला संबंध महिना दीड महिना नानासाहेब इथं पूजेला सुद्धा नव्हते. आता यापुढे तुझ्या देवघरात ते कधी मिनिट दोन मिनिट आलेच आणि तेही वर्ष-सहा महिन्यात तर महत्भाग्य समज तू आपलं!

केशव ---खरं म्हणतोस की काय?

रंगराव ----आणि म्हणून तर तुला मी मघासची सूचना केली! मित्र कार्य करावयाची काही संधी मला देतोस का पहा!

केशव ---काय बातमी सांगतो आहेस ही! मित्र आहेस की गेल्या जन्मीचा कुणी दावेदार आहेस?

रंगराव ----कुणीही असलो तरी बातमी खरीच आहे भटा!

केशव ----का रे बाबा ; का एवढा पाठीशी हात धुऊन लागला आहेस? काय धामधूम आहे एवढी?

रंगराव---- धामधूम कसली? आपलं नेहमीचंच! इंग्रजांनं पेन्शन बंद केलय ना?

केशव---- मग त्याचा नानासाहेबांच्या भ्रमंतीशी काय संबंध?

रंगराव ----अरे कंपनी सरकारात खेटे चाललेत! आता तुला एक आनंदाची बातमी सांगू का?

केशव ----काही लाभ्यांश आहे का त्या बातमीत?

रंगराव---- थोडाथोडका नाही. तुझ्या अगदी फायद्याची आहे! पुन्हा तुझा हात ओला होऊ लागेल तुझ्या पोटाचा घेरही फुगू लागेल!

केशव ----अस्स! मग सांग! सांगण्यापूर्वी हे तीर्थ घे पोटात.

रंगराव---- नुसतच कंपनी सरकारकडे खेटे नाहीत! काशी प्रयागाकडील तीर्थ क्षेत्रातील देवळांचे उंबरठे नानासाहेबांच्या पायानं पुनीत होताहेत इष्ट- सिद्धीसाठी!

केशव ----अरेरे! किती वाईट गोष्ट सांगितलीस ही! इथं घरची दैवत उपाशी बसली आहेत बिच्चारी! बाहेरच्या दैवतांची चंगळ ऐकवून

तू मला कसला आनंद दिलास? घरचीला टाकून बाहेरचीला जवळ केलं आहे आणि ती बातमी तू घरचीला तिच्या आनंदाची म्हणून सांगतो आहेस?

रंगराव ----अरे असा निराश होऊ नकोस! बाहेर तीर्थक्षेत्र होत आहेत, याचा अर्थ पेशवे सरकार अधिक धर्मप्रवण होत आहेत याची खूणगाठ बांध! पेंशन पूर्ववत चालू झालं की तुझं देवघर उजळलंच म्हणून समज. बरं येऊ आता?

केशव---- थांब रे. जाशील म्हणे! घाईत तर नाहीस ना?

रंगराव ----घाईत तसा काही नाही. तसा घाईत असतो तर इथे थांबतो ना!

केशव---- तेच तर म्हणतो आहे! कधी वर्षा सामासी भेटतो आहेस! मित्रांबरोबर आणखी थोडा वेळ बोललास तर काय बिघडेल?

रंगराव ---श्रीखंड -जिलेबी पुराणा शिवाय वेगळं काही बोलणार आहेस का?

केशव ----हो तर! पण नाही! श्रिखंडं- जिलेबीचा संबंध सगळीकडेच आहे. मी बोलणार होतो ते ब्रह्मवर्तात जिकडे तिकडे चालू असणाऱ्या सत्यनारायण पूजे विषयी! एक दोन घरी मलाही भट म्हणून बोलावणे आहेच. पण विचारायचं ते असं की एवढे सत्यनारायण हे एकदम कसे निघाले?

रंगराव---- ते तुला अधिक माहिती की मला? बोलावणाऱ्या यजमानांना तू पूजेचा हेतू विचारला नाहीस?

केशव---- मी कशाला विचारतो हेतू? दक्षिणा मिळाली की पुरे मला.

रंगराव----मग आता मी काय सांगणार तुला?

केशव ----पण काय रे, मी असं ऐकतो की सत्यनारायण, कंपनी सरकारला हिंदुस्थानातून हुसकावून लावण्यासाठी केले जात आहेत! खरे आहेे का हे?

रंगराव ----अस्स? कोण म्हणतं असं?

केशव ----जो तो म्हणतो, आणि इतकंच नव्हे! १८५७ साल आहे ना! आणि 23 जुलैला म्हणे इंग्रजांची शंभर वर्षे भरणार आहेत! त्यादिवशी तर इंग्रज इथून आपलं तोंड काळ करणार असं भविष्य आहे म्हणे. त्याच्यासाठीच हे सत्यनारायण असतील नाही?

रंगराव---- असेल बुवा! मीही अस ऐकलंय खरं!

केशव----हे जर खरे असेल तर फार वाईट गोष्ट आहे ती!

रंगराव ----वाईट? ती कशी काय?

केशव ----इंग्रज जातात ही काय बरी गोष्ट आहे?

रंगराव ---तुला फारच वाईट वाटतं असं दिसतं!

केशव---- नाहीतर काय? इंग्रज इथे आला म्हणून कितीतरी गोष्टी झाल्या! रस्ते काय बांधले, बंदोबस्त काय केला, खुशाल काठीला सोने बांधून काशीला जातो आहोत उगाचच नाही? नाहीतर पूर्वी! लंगोटीत सोनं दडपून काशीला जाईपर्यंत जीवात जीव नसायचा लोकांचा!

रंगराव ----अरे, पण काठीला बांधायला त्यांनी सोनं शिल्लक ठेवलं आहे का?

केशव ----मग काय समुद्रात बुडवताहेत ते? इतका इंग्रज दुष्ट असता तर काय एवढ्या नव्या गोष्टी त्याने केल्या असत्या? आगीनगाडी काय धावते, तारा कि काय म्हणतात त्या इकडून तिकडं काय जातात! इंग्रजी शाळा काय खडाखड उघडल्या जाताहेत! आमचे लोक इंग्रजी काय शिकताहेत! कापडाच्या गिरण्या काय चालतात! हे सगळं काय त्यांच्याशिवाय झालं असतं?

रंगराव ----नाही, खरं आहे तुझं म्हणणं!

केशव---- खरोखर देवानं पाठवलं आहे त्यांना इकडे! आणि ते लोक तरी किती हुशार! आमची संस्कृत भाषा त्यांनी कशी आत्मसात केली आहे पण! इंग्रज पंडितात आमच्या पेक्षाही अधिक संस्कृतपंडित! अशा लोकांनी इथून जावं म्हणजे काय? आता या देशाचं कसं होणार? इथल्या आगगाड्या कोण चालविणार? इथे इंग्रजी कोण

a

शिकविणार? इथं तारांमधून संदेश कोण नेणार आणि आणणार? इथल संस्कृत कोण शिकणार?

रंगराव ---खरं आहे! इंग्रज आहेत तेच ठीक आहे!

केशव ---अरे इंग्रज आहेत म्हणून तर या ब्राह्मवर्तात राहून तिकडे पुण्याकडे माझ्या म्हाताऱ्या आईला मी दोन पैशात पत्र तरी पाठवू शकतो. यापूर्वी अशी होती सोय इथं कधी?आमचे ते सांडणीस्वर काय? आमचे ते पूर्वीचे लखोटे काय? महिनेच्या महिने लागायचे. पैसा किती खर्च व्हायचा! आणि फक्त राजे-महाराजे तेवढे असला व्यवहार करीत. पण आज माझ्यासारखा एखादा भटजीही खुशाली धाडू शकतो.

रंगराव---- मग असं कर केशव, तू ही एक सत्यनारायण बोल! इंग्रजांचं स्थान अढळ व्हावं म्हणून मागणं मागून घे!

केशव----का? तुला पटलं नाही माझं म्हणणं!

रंगराव ---पटलं तर! म्हणून तर तुला सत्यनारायण बोलायला सांगितल!

केशव ----तुला पटलं ना! मग तूच सतनारायण बोल आणि मला भटजी बोलव ना! तेवढीच दक्षिणा मिळेल मला!

a

रंगराव ---बरं, बरं, आता मी जातो. पेशवे सरकारांचे एवढ्यात इथे येणं होईल. मला एक कामगिरी आहे. भेटेन आणखी केव्हातरी! येतो. राम राम!

केशव ----नमस्ते. मात्र सत्यनारायणच नक्की हं!

रंगराव ----(पडद्यामागे जात) हो, हो नक्की!

(केशव.भटजी इकडे तिकडे पाहतो. आणि आत पुन्हा देवघरात जातो)

(थोड्या वेळात नानासाहेब, अझीमुल्लाखान व ज्वालाप्रसाद बोलत-बोलत प्रवेश करतात)

नानासाहेब ----नानकचंदान एकूण असा मात्रागमनीपणा चालू केला आहे तर! या सर्पाला आपण आता वेळीच ठेचून टाकला पाहिजे. त्याला अजून पर्यंत आम्ही आपल्या अगदी आतल्या गोटात नाही घेतलं हे फार बर झालं!

ज्वालाप्रसाद ----हो ना! मलाही हा त्याचा घरभेदी उपद्व्याप समजला तेव्हा मी थक्क झालो. स्यू जेनी शेपर्ड ही आपल्या हाती सरळ मार्गाने लागत नाही, तेव्हा तिच्या आईला खुश करण्यासाठी व अखेर स्यू जेनीची प्राप्ती करून घेण्याच्या डावानं त्यांन हा उद्योग आरंभिला आहे. स्यू जेनीनच मला हे सांगितलं आहे.!

अझीमुल्लाखान---- पण इंग्रज तरुणी आपलं लग्न लावण्याला स्वतंत्र असतात. त्या आईबापांना भीक घालीत नाहीत किंवा आईबाप ही त्यांच्यावर काही दडपण आणीत नाहीत हे या मुर्खाला ठाऊक नाही काय?

ज्वालाप्रसाद ----ठाऊक नसायला काय झालं? पण त्याला आपलं वाटतं की डोरोथीबाईंना खूष करून तिची मुलगी मिळविता येईल.

नानासाहेब ----मूर्ख बेटा.

अझीमुल्लाखान ----तुम्हा हिंदूंची ही परंपराच आहे सरकार! जयचंद राठोडच किंवा सूर्याजी पिसाळच घराणं अजून नीर्वंश झालेलं नाही.

नाना ----बरोबर बोललास अझीम! तू मुसलमान धर्मिय म्हणून तुला हे पटकन सांगता आल!. या भारतामध्ये हिंदू व मुसलमान एक होण्याची चिन्ह दिसत आहेत! . पण हिंदू मधील ही घरभेदी पणाची मुळे साफ जळून जाण्याची काही चिन्हे दिसत नाहीत!

ज्वाला प्रसाद ----आणि म्हणूनच नानकचंदाला दोन हात आत्तापासूनच दूर ठेवायला हवं!

नाना ----हो, पण आता अधिक बोलण्यापूर्वी आत तो पुजारी आमची वाट पाहत बसला असेल.,त्याला एकदा वाटेला लावून आम्ही एक दोन मिनिटात येतो. श्री गजाननाला नमस्कार केला, गंध लावला

आणि तीर्थाचे पाणी प्राशन केलं की संपलंच आमचं! (नानासाहेब देवघरात जातात).

अझीमुल्लाखान ----अच्छा, what does your SueJany say?

ज्वालाप्रसाद ----स्यू जेनी काय? संजीवनी म्हण. मी तिच्या नावाचं मराठीकरण केलेलं आहे.

अझीम ----वा,! छान! पण तू सांगितल्या शिवाय आम्हाला ते कळावं कसं? संजीवनी काय? नाव तर मोठं मिठास निवडलं आहेस गड्या! तुझ्या नावाचं तीनही काही तस इंग्रजीकरण केलेले असेलच.

ज्वालाप्रसाद---- केलंय तर! मला ती ज्वालाप्रसाद न म्हणता Don Juan म्हणते.

अझीम--- वा!ठीक. आता भारतमातेच्या स्वातंत्र्य शुभ मंगला बरोबरच तुमच्याही शुभमंगलाच स्वातंत्र्य रंगणार तर!

ज्वालाप्रसाद ----फार दूरच्या गोष्टी आहेत त्या अझीमुल्लाखान! आधी लगीन भारत मातेचं आणि मग या डॉन ज्युआँनच समजलं?

अझीम ----नरवीर तानाजीच्या प्रतिज्ञे इतकीच अगदी द्रुढ प्रतिज्ञा का?

ज्वाला---- अगदी त्या सिंहाच्या प्रतिज्ञेइतकीच!

a

अझीम---एकूण पेशवे सरकारांनी तुझी शिफारस शेपर्ड साहेबाला एक उत्कृष्ट संस्कृत शिक्षक म्हणून केली. आणि एका दगडात दोन पक्षी मारले तर! पेशव्यांच्या सिंहासनाची सेवा घडली आणि या सिंहालाही इथे एक इंग्लिश सेवा भेटली.

ज्लाला प्र.---- केवळ योगायोगाच्या गोष्टी आहेत या अझीम! शेपर्ड साहेबाला संस्कृत पंडित होण्याची महत्त्वाकांक्षा असावी. त्याने नाना साहेबांकडे एक संस्कृत पंडित मिळवून देण्याची गोष्ट काढावी आणि इंग्रजांकडील काही गुप्त हालचाली कळाव्यात म्हणून नानांनी माझी शिफारस करावी, तिथे स्यू जेनी ----

अझीम ----का? संजीवनी म्हण की!

ज्वाला---- हां. संजीवनी भेटावी, ती मजवर अनुरक्त व्हावी, हा सारा योगायोग नाहीतर काय?

(गंधाचा टिळा लावून तीर्थ घेऊन नाना येतात)

नाना---- कोणत्या योगायोगाच्या गोष्टी चालल्या आहेत एवढ्या?

अझीम ---- दुसऱ्या कुठल्या चालणार श्रीमंत? मिस स्यू जेनी आणि डॉंन जुआनच्या प्रेम प्रकरणातील योगायोगाच्या.

नाना---- डॉंन जुआन?हा कोण डॉंन जुआन स्यू जेनी बरोबर?

a

अझीम ---हे एकच आश्चर्य नाही सरकार! दुसरं ऐका ; ज्वालाप्रसाद आणि संजीवनी यांच्या प्रेम प्रकरणातील योगायोगाचं!

नाना ---संजीवनी? ज्वालाप्रसाद बरोबर संजीवनी? आणि ही कोण? काय ज्वालाप्रसाद तुझं आणि स्यू जेनीचं फिस्कटलं प्रकरण?

ज्वाला प्रसाद--- ही सारी अझीमुल्लाची शब्द चलाखी आहे श्रीमंत.

अझीम ---अझीमुल्लाची शब्दचलाखी काय? अरे वा! ज्वालाप्रसादन स्यू जेनीची संजीवनी बनविली आणि स्यू जेनीने ज्वालाप्रसादचा डाँन जुआन बनवला आणि म्हणे शब्द चलाखी अजीमुल्लाखची!

नाना ---असं? अरे वा! बरीच आघाडी मारली आहे!

अझीम ---आणि ही आघाडी आमच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या आघाडी बरोबरच रंगणार असा दिसतं सरकार!

नाना ----ठीक!

अझीम---- कशी काय भाळली बुवा ही फ्रॉक मधली इंग्रज संजीवनी या शेंडीवाल्या संस्कृत डाँन जुआन शास्त्र्याला?

नाना ---अरे भाळली असेल! फक्त आपल्यावरच तेवढ्या आंग्ल तरुणी भाळतात असं तुला वाटतं की काय? मक्ता तर घेतला नाहीस तू?

a

अझीम--- हो! तसच आहे मुळी. उगाच नाही मी युरोपियन सारखा तांबडा लाल! माझ्यावर भाळतील नाहीतर काय या "काला आदमी "वर भाळतील?

ज्वाला प्रसाद--- अरे ठाऊक आहे -तुझी लाल कातडी, गाजर तोंड्या! इंग्रज तरुणींना मुळी काळा रंग अधिक आवडतो. युरोपीय गौरकाय तरूणी म्हणे आपल्या कातडीचा काळा रंग व्हावा म्हणून बीच वर जाऊन उन्हात न्हात बसतात असा तूच आपला अनुभव नाही का सांगितलास?

अझीम ----मग तुझ्या संजीवनीला काळा रंग आवडतो की काय?

ज्वाला--- हो. तसही असेल कदाचित!

अझीम---- पहा बुवा! सावध रहा. या आंग्ल युवती भारी चंचल वृत्तीच्या असतात असा माझा एकंदरीत अनुभव आहे. नाहीतर तुला हातोहात फसविल ही संजीवनी!

नाना ----फसवलं तर फसवलं! तिचं काय तितक? ज्वालाप्रसाद काही तिचा लाभ घेण्याच्या उद्देशाने केवळ तिकडं जात नसतो. हो की नाही प्रसाद?

ज्वाला----अं? हो. .तसंच काही म्हणता यायच नाही! पण मुख्य उद्देश वेगळा होता आणि आहे हे निश्चित म्हणता येईल!

नाना---- कितपत सफल होत आला आहे तो मुख्य उद्देश?

ज्वाला ----अगदी शंभर टक्के. या आयोध्या प्रांतात इंग्रजांच्या काय काय हालचाली आहेत याची अगदी गुप्त बातमीही कळते शेपर्डकडे. सर व्हीलरची आणि शेपर्डची खास मैत्री असल्यामुळे त्यांची सैन्यासंबंधी बरीच बोलणी होतात आणि ती,मी शेपर्डचा संस्कृत शिक्षक म्हणून मला खास ऐकायलाही मिळतात.!

नाना ---मग नाही ना अजून आमच्या उद्योगाचा त्यांना काही सुगावा लागलेला?

ज्वाला ----बिलकुल नाही! सर व्हीलर तर अगदी छातीवर हात ठेवून सांगतो की देशात अन्यत्र कुठेही बंडाळी माजेल, तथापि त्याच्या या आयोध्या प्रांतातील सैन्यात कधी खुट्ट सुद्धा व्हायचे नाही!

नाना ----बिचारा सरव्हीलर! कोणत्या ज्वालामुखीवर तो झोपलेला आहे याची त्याला काही कल्पना नाही.

ज्वाला---- इतकच नव्हे! त्यांचा सर्वात मोठा आधार खुद्द आपणच, श्रीमंत सरकारच वाटतात! आपल्या राजनिष्ठेविषयी त्याला बालंबाल खात्री वाटते.

नाना----(हसून)अस्स!फारच उत्तम! असाच निश्चिंत ऐस म्हणाव आणखी काही काळ!

a

अझीम ---सैन्यात आणि सर्व देशात आमचे प्रचारक शिरलेले आहेत. उठावणीची तयारी करीत आहेत, यापैकी काही एक समजलं नाही अजून?

ज्वाला ---काही अक्षर सुद्धा नाही! तसा त्यांना अधून मधून वास येतो आणि नानाकचंदासारखी कुत्री मध्येच काही अशुभ सुचक रुदन करून त्यांच्या मनाचा थरकाप उडवतात! पण ते जेवढ्यास तेवढं! सैनिकही मोठे बिलंदर आहेत! काही हू की चू करीत नाहीत! सर्व जणू इंग्रजांची शंभर वर्षे भरण्याची वाट पाहत आहेत!

नाना ---वारे आपल्याला अनुकूल दिसतात अजीम!

अझीम ----हो आणि इंग्रज सुद्धा आगीत तेल स्वतःहून टाकीत आहेत. आज काय सातारचा दत्तक नामंजूर करून ही गादी खालसा कर, नागपूरकर भोसल्यांच्या गादीला दत्तक वारसही नाही म्हणून ती खालसा कर, आयोध्येच्या नबाबाला उडवून लाव असे एक की दोन तेलाचे डबेच्या. डबे त्याने ओतले आहेत! श्रीमंत सरकारांचा कराराप्रमाणे मिळणे आवश्यक असणारा आठ लाख रुपयांचा तनखा कसा चटदिशी खाऊन टाकला आहे पण!. बिचारा रंगो बापूजी, इंग्रजी सत्तेचे इंग्लंडमधील उंबरठे सातारकरांच्याकरिता झिजवून परतला. मी आपणासाठी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये खेटे घालून घालून शेवटी असा हा हात हलवीत परत आलो. पण अजून

a

तेल ओतणे चालूच आहे! लॉर्ड डलहौसी तर म्हणे हिंदुस्थानची भूमी सपाट करण्यासाठी इकडे किनाऱ्यावर उतरला आहे! चालवा इंग्रजांनो, हे तेल ओतणे असेच काही काळ चालू ठेवा! ही आग पूर्णपणे भडके पर्यंत आपल्या पायाखाली काय जळते आहे ते तुम्हाला दिसू दे नको! सैन्यांमध्ये काळया शिपायांवर तुमच्या बंदुका आपोआप उडतात, त्या तशाच उडूद्यात! एक दिवस इथल्या लोकांच्याही बंदुका तुमच्यावर अगदी आपोआपच उडू लागतील!

नाना---- हे इतकच नाही अझीम, अजूनही बऱ्याच गोष्टी शिजताहेत या ज्वालामुखीचा उदरात! तुम्हाला ती बातमी आम्ही अद्याप सांगितलेली नाही! ती ऐकून तुम्हाला आता धक्काच बसेल! अखेर झाशीचा दत्तक नामंजूर ठरवून, झाशीची गादी ही खालसा करण्याचा कुटील डाव डलहौसीने रचला आहे!

ज्वाला---खरं? (मुठी वळवतो.)

अझीम ----(त्वेषाने)चालव डलहौसी! हा घास जर तू घेतलासच तर, तुझ्या पापाचे रांजण निश्चित भरले असं तू समज!

ज्वाला ---आता तू समोर असायला हवा होतास! तुला टराटरा फाडून टाकला असता!

a

नाना ---अंग पेट घेतं सारं! पण शांत राहिलं पाहिजे! अजून शांत राहिले पाहिजे!. निश्चित योजना ठरवून पुढील पावलं टाकली पाहिजेत! आत्तापर्यंत विणित आणलेलं जाळं अकस्मात विस्कटून जाणार नाही, यासाठी रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून जागलं पाहिजे!

ज्वाला--- पण कधी? किती दिवस? कधी? कधी?

नाना---- पुढे कोणता पवित्रा घ्यायचा हे ठरवण्यासाठीच मी इतक्या तडकाफडकी काल आलो आहे. तात्या टोपे मागे राहिले. ते माझ्या मागोमागच झाशीच्या राणीसह निघाले आहेत. आज ते इतक्यातच येतील. ते आल्यावर पुढील कार्यक्रम आपल्याला ठरवायचा आहे. (एवढ्यात,झाशीची राणी प्रवेश करते) या पहा आल्याच महाराज्ञी! नाव काढताच त्या येऊन दाखल सुद्धा झाल्या. (सर्वजण उत्थापन देतात. मागून तात्या टोपे येतात)

लक्ष्मी ---ही आत्ताशीच येत आहे भाऊ! बाहेर पहाऱ्यावर चौकशी केली, तो तुम्ही या आपल्या खास दालनात आहात असं कळलं. अगोदर तुम्हाला भेटावं म्हणून अशी ही तडक आले. धुळीन व घामानं मळलेली ही वस्त्र सुद्धा अजून उतरावयाचीआहेत.

नाना---- तू थकली असशील मनू! वस्त्र बदलून काही काळ विश्रांती घे. स्वस्थ पडून राहा. मग आपण बसू बोलत!

लक्ष्मी ---आता तुम्हा त्रिमूर्तींना पाहिल्यावर स्वस्त पडून राहणं?.नाव नको! तुम्हा सर्वांना पहिल्या बरोबरच माझे श्रमपरिहार झाले! आता स्वस्थता नाही भाऊ! आता स्वस्थता त्याच वेळी, जेव्हा इंग्रजांचे पांढरे पाय ही भूमी सोडून जातील! एक ते गेले पाहिजेत नाहीतर मला कायमचीच स्वस्थता तरी मिळाली पाहिजे! हे दोनच मार्ग! आता क्षणिक स्वस्थता या जीवनात नाही! आता ही हातपाय मुखमार्जन करून व कपडे बदलून येथेच मी! (जाते)

टोपे---- बेचैन आहेत महाराणी! रात्ररात्र झोप नाही! नुसत्या तळमळत आहेत! अस्वस्थ आहेत. धुसफुसताहेत.! विज केव्हा कडाडेल याची निश्चिती नाही!

नाना---- तुम्हीही श्रमला असाल सेनापती!.जा तुम्हीही तोंडावर थंड पाण्याचे फवारे मारून घेऊन उत्तेजित होऊन या!

तात्या----(मुजरा करून) हा आलोच सरकार! (जातो)

नाना ----(बोलू इच्छिणाऱ्या ज्वालाप्रसाद व अजीमुल्लाखानास तोंडावर हात ठेवून इशारा करीत) थांबा! बोलू नका! तिकडून कोणी येत आहे.

अझीम---बेवकूफ नानकचंद आहे तो सरकार!

a

नाना----आता याला टाळलंच पाहिजे. निदान महाराणी इथे आली आहे हे या हैवानाला कळून उपयोग नाही! आम्हीच आात जातो. महाराणीला आताच थांबवून ठेवतो. तुम्ही दोघे इथे राहून त्याला वाटेला लावा! त्याच्याविषयी काही संशय आलेला आहे हे त्यांना कळू देऊ नका! (जातो). (नानकचंद प्रवेश करतो)

नानकचंद---Hallow Azim! Hallow Jwalaprasad! What on earth are you doing here?

अझीम---- वा! इंग्रजी बोलण्याचं व्रत घेऊनच आला आहातसं दिसतं!

नानक---- म्हंटलं आम्हालाही इंग्रजी बोलता येऊ लागलं आहे, हे दाखवावं तुम्हाला! तुम्ही दोघांनीच आता काही एस् फॅस् करायला नको!

अझीम--- चला! तेवढीच स्यू जेनीच्या प्राप्तीला मार्गातली एक धोंड कमी झाली!

नानक--- म्हणजे? काय म्हणता काय तुम्ही अझीम?

ज्वाला प्रसाद--- एवढा क्षुद्र हेतू त्याच्या इंग्रजी शिकण्याच्या प्रयत्नाला चिकटवतोस म्हणजे काय अझीम?

अझीम---प्रेम हा क्षुद्र हेतू काय? .त्यातही स्यू जेनीचं प्रेम प्राप्त करून घेण्याचा हेतू क्षुद्र म्हणणं म्हणजे तुला प्रेमाचा काहीच अनुभव नाही म्हणायचा!

ज्वाला----कबुल! आपण बुवा अगदी कोरडे आहोत! पण मला आपलं अजूनही वाटतं की देश सेवा घडण्याच्या पवित्र हेतूनच नानकचंदान इंग्रजी आत्मसात करण्याचा खटाटोप केलेला आहे!

अझीम--- हा, तोही एक हेतू आहे ;यात काही संशय नाही! पण माझा पहिला तर्कही काही चुकीचा नाही होय ना नानकचंद?

नानक ---हेतू काही का असेना; पण स्यू जेनी मिळण्याचं मोठं दुरापास्त दिसतं खरं!

अझीम----का असं का म्हणता नानकचंद?

ज्वाला---अरे! उगीच काहीतरी वरवरचं सांगतो आहे तो! उलट माझ्या समोर तर नानकचंदाची स्तूती करीत होती स्यू जेनी. नानकचंदान त्यांच्या बॉलडान्स मध्ये कमालीची प्रगती केली आहे असं म्हणत होती ती! नानकचंद त्यांच्या बॉलडान्सला अगदी न चुकता हजर राहतो म्हणे अझीम!

अझीम--- अस्स!अरे वा! Did she favour you.with her company?

a

नानक---She did favour. परंतु कोणत्याही विचारण्याला आलेल्या तरुणाबरोबर नृत्य करणं हे काही प्रेमाचं निश्चित द्योतक नाही. कुठलीही आंग्लतरुणी विचारल्यावर नृत्याला ना म्हणत नाही!

अझीम----हे खरं आहे म्हणा! मला माहित आहे ते! त्या तशा फ्री असतात! पण त्यातही माणसाला त्यांची नृत्यासमयीची उत्सुकता, त्यांची तन्मयता अनुभवता येते.

ज्वाला---- ज्या अर्थी ती नानकचंदाची स्तुती करीत होती, त्याअर्थी तिथे काही पाणी मुरतं असे निश्चित समजायला हरकत नाही. !

अझीम---बरोबर आहे बुवा!Nanakchand, I congratulate you.!

नानक----Thanks

अझीम---- इंग्रजी भाषा मोठी गोड आहे. नाही नानकचंद?

ज्वाला----आणि सोयीची ही! (डोळे मिचकावतो) प्रेमाचे चाळे करायला!

अझीम ----काय कशी काय म्हणते स्यू जेनी?

नानक---- प्रत्यक्ष माझा अनुभव हा तितकासा काही उत्साहवर्धक नाही! मला वाटतं ती हृदयाच्या गाभाऱ्यात कुठं तरी माझा तिरस्कार करते! ती मला टाळण्याचा प्रयत्न करते!

a

अझीम----Do't worry Nanakchand! फिक्र मत करो यार! अहो, स्त्रीयांचा नकार हा होकार असतो.Go ahead! I wish you the best luck!

नानक----Thank you!

ज्वाला---- (एकदम आठवल्यासारखं करुन) अरे हो, नानक, तू आल्या बरोबरच तुला सांगायला हवं होतं! स्यू जेनीन तुझ्याकरिता इकडे माणूस पाठविला होता! तू इकडे आल्याबरोबर ताबडतोब तुला सांगायला सांगितलं होतं. पण या थट्टा विनोदात राहून गेलं!

नानक----(बेफिकीरीने) जाता येईल जरा वेळाने!

अझीम---- पण महत्त्वाचं काम आहे, असं म्हणत होता तो!

नानक--- मग मला निघालेच पाहिजे तर!

ज्वाला---हो, हो. निघच तू! पण इथं का येणं केलं होतस?

नानक----आपलं सहज! म्हटलं श्रीमंत सरकार येणार असं ऐकलं होतं. ते आले की नाही सहज पाहावं आणि त्यांची खुशाली पहावी म्हणून आलो होतो.

अझीम----आम्ही सुद्धा त्यांची येण्याचीच वाट पाहत आहोत! ते आले म्हणजे कळवू तुम्हाला!

a

नानक----Thank you! अच्छा मी सवडीने भेट घेईन त्यांची!Bye Bye! (जातो)

(तो गेला याची संपूर्ण खात्री करून घेऊन ज्वालाप्रसाद आणि आझीम एकदमच हसतात)

अझीम---चांगलंच बनवलंस त्याला प्रसाद! प्रतिस्पर्धी शोभतोस खरा! (टाळी देतात)

ज्वाला----काही डावपेच लढविले पाहिजेत अझीम! त्याशिवाय जीवनाच्या लढाईत टिकाव लागत नाही!

अझीम----जीवनाची लढाई! वा उत्कृष्ट रूपक केलस.! पण जीवनाशी झुंज खेळताना ही तलवार तुझ्या हाती लागेल म्हणतोस? आणि लागली तर पचेल ती तुझ्यासारख्या काशीच्या ब्राह्मणशास्त्र्याला?

ज्वाला----अझीम मी जातीने ब्राह्मण खरा, पण वृत्तीनं क्षत्रिय आहे! पिढीजात वृत्ती म्हणून मी शास्त्री, तथापि माझी वैयक्तिक आवड ही क्षात्र धर्माकडेअधिक! संजीवनी माझ्या हाती लागेल यात शंका नाही! पण हे दुष्ट जीवन ती मला पचू देईल की नाही हे मी सांगू शकत नाही! पण त्याबद्दल मी बेफिकीर आहे!

अझीम---आहेस खरा क्षत्रिय तू! पण तू संस्कृत पंडित ; या रसात कसा काय पोहलास, आणि तेही एका गौरकाय तरुणीबरोबर?

ज्वाला---- आम्हा संस्कृत शास्त्र्यांना आणि पंडितांना तू समजतोस तरी कोण? अरे जगन्नाथ पंडिताच आणि तुमच्या धर्माची एक राजकन्या, जी लवंगी, तिचं उज्वल प्रेम काय तू एवढ्यातच विसरलास? कदाचित त्याचं इतिहासाची पुनरावृत्ती आमच्याही बाबतीत होईल इतकेच!

अझीम--- मिस्टर शेफर्ड आणि मिसेस डोरेथी यांची कितपत अनुमती आहे या संबंधांला?

ज्वाला----मिस्टर शेपर्ड यांच्या विषयी काही प्रश्नच नाही! जुन्या पिढीतील.जे औदार्यशील इंग्रज अधिकारी होऊन गेले, यापैकी ते एक शेवटचे इंग्रज गृहस्थ आहेत! इथल्या लोकांविषयी त्यांना कमालीची सहानुभूती आहे! नोकरी संपल्यानंतरही ते इथे राहिले आहेत हे केवळ इथल्या लोकांबद्दल व विशेषतः इथल्या संस्कृत विद्येबद्दल वाटणाऱ्या असिम भक्ती खातर! इथल्या लोकांत किती मिळून मिसळून वागे पहिली पिढी! इथल्या लोकांबरोबर रंगपंचमी ही खेळलेले ते गृहस्थ आहेत! वेद आणि भगवद्गीता यांचा अभ्यास केल्यापासून तर त्यांना हिंदू धर्माविषयी अत्यंत ओढ लागून राहिली आहे! तो गृहस्थ म्हणजे एक आंग्ल हिंदू आहे, असं त्यांचं एका शब्दात वर्णन करता येईल!

a

अझीम----पण मिसेस शेपर्ड संबंधी मी जे ऐकले आहे ते फारच वेगळे आहे! त्या तर हिंदू धर्मांचा अत्यंत तिरस्कार करतात ना? शिवाय ख्रिस्ती धर्म प्रचाराचं त्यांनी पवित्र येशूच्या नावानं हाती कंकण बांधलेलं आहे!

ज्वाला----हो! आणि ते आपलं काम सुलभ व्हावं म्हणून त्या एतद्देशीय भाषापैकी मराठी आणि बंगाली याचा कसून अभ्यास करत आहेत. त्यांना मराठी शिकवण्याचं काम मलाच करावं लागतं आणि मी मराठी शिकवीत असता मला पवित्र बायबलच्या पाठांचे घुटके अधून मधून पाजण्यासही त्या कमी करीत नाहीत!

अझीम----पण तिची ही पोरगी कशाकरिता तुझ्या जवळून मराठी शिकली बुवा?

ज्वाला----व्वा! अगदी कुक्कुल्या बाळाचं सोंग आणलं आहेस की! ती कशाकरिता मजकडून मराठी शिकली हे तुला अगदी समजतच नसेल, नाही!

अझीम----(मुद्दाम वेड पांघरून) वा! मला कसं समजणार? मी काय अंतर्ज्ञानी थोडाच आहे! अगदी अज्ञानी आहे मी!

ज्वालाप्रसाद----मग तर फारच उत्तम! Where ignorance is bliss, it is, folly to be wise! काय गंमत आहे पहा! नवरा येथे नोकरी

a

नंतरही रहातो तो हिंदू धर्माच्या आवडीमुळे आणि ओढीमुळे! तर त्याची बायको इथंच राहण्याचा सल्ला देते ती सर्व हिंदुस्थान ख्रिस्ती करण्याच्या जबरदस्त राक्षसी आकांक्षेने!

अझीम---- आता फार दिवस चालणार नाही हा ख्रिस्तांचा उपद्व्याप प्रसाद! फारच थोडा वेळ टिकेल त्यांचं ते नाटक! फारच थोडा वेळ टिकेल! पण वेड्यासारखे आपण दोघेच काय बोलत बसलो आहोत! नानकचंदाला पिटाळून लावल्याचं श्रीमंतांना कळवायचंहि भान राहिलं नाही! थांब तो गेल्याची वर्दी मीच देऊन येतो श्रीमंतांना! (जातो)

ज्वाला----(थोडासा स्वतःचीच अंतर्मुख होऊन विचार करून) काय मुर्खासारखा बडबडलो मी! बोलण्याच्या भरात थोरल्या बाजीरावांच्या आणि जगन्नाथ पंडितांच्या पंक्तिला नेऊन बसवलं मी स्वतःला आणि स्यू जेनीला! त्या दोघांचं प्रेम प्रतिकूल परिस्थितीत का असेना पण सफल झालं! माझी काय निश्चिती आहे? .देशाच्या स्वातंत्र्याचा होम जेव्हा पेटविला जाईल, त्यात माझीच आहुती पडणार नाही कशावरून? मी कदाचित वाचलो आणि स्यू.जेनीच इथल्या आम्हीच चेतवीत असलेल्या प्रक्षोभाला बळी पडली तर! कुणी सांगावं; इंग्रजांचं हत्यासत्र जेव्हा आरंभिलं

a

जाईल तेव्हा काय होईल ते! (कुणाचीतरी चाहुल लागल्यामुळे सावध होतो)कोण आहे तिकडे? (चौकीदार प्रवेश करतो)

चौकीदार----(नमस्कार करीत)मी हाय जी. कुणी इंग्रज मुलगी आपली चौकशी करीत आली हाय चौकीवर!

ज्वाला---इंग्रज मुलगी? नाव काय सांगितलं तिने?

चौकीदार--- नाव सांगितलं त्यांनी, पर ----

ज्वाला---- पण लक्षात नाही राहिलं ना तुझ्या?

चौकीदार---हा, होय बघा! चांगलं मर्हाटी बोलतात त्या!

ज्वाला---स्यू जेनी शेफर्ड असं नाव सांगितलं का तीनं?

चौकीदार---- हां!व्हय,व्हय,वाईच तसलच तसलच काही तरी सुकसुक केलं!

ज्वाला---- पाठवून दे तिला इथं!

चौकीदार ----जी!

ज्वाला---ही इथं कशाला आली असेल? काही कमी-अधिक बातमी तर नसेस? (अझीम प्रवेश करतो)

अझीम----कसला विचार करतोस ज्वालाप्रसाद?

a

ज्वाला---अरे स्यू जेनी आली आहे इकडे! आता येईल ती इथं!

अझीम---इथं! मग मी आपला आतच जातो तर! तिकडे श्रीमंत आणि महाराणी सरकार आतच थोडा वेळ बसून राहणार आहेत. तेव्हा मीही तिथंच जातो आपला! उगीच तिसऱ्याची गर्दी नको! Three is a crowd

ज्वाला---छे,छे तसं काही नाही! तू इथेच थांब! (स्यू जेनी येते) ही आलीच पहा संजीवनी!

स्यू----(एकदम ज्वालाप्रसाद कडे धावत जाऊन) oh!dear Don! कुठे आहे तुझा पत्ता अलीकडे? पुरे दोन दिवस तुझा पत्ता नाही Two - days my,dear! Two days. (अझीमकडे पाहून) who is he?

अझीम---I am very sorry dear lady, to be on the scene.

स्यू---No, No I don't mind!

ज्वाला---This is Mr. Azimulla, my friend!

स्यू---- Oh! I have heard about you! You had been to England, No?

अझीम----This fool might have told you so many absurd things about me!

स्यू----Yes, yes.

ज्वाला--- बरं, का आलीस तू संजीवनी?

स्यू जेनी----का आलीस? माझ्या डॉन जाँनला न्यायला!

ज्वाला ----माफ कर संजीवनी, मी आता यावेळी तुझ्या बरोबर येऊ शकत नाही!

स्यू जेनी----No, No. You must come. आज दोन दिवस अजिबात आला नाहीस म्हणजे काय?

ज्वाला---मी फार महत्त्वाच्या कामात आहे जेनी!

स्यू----Hang it Don! You can not deceive me so.

ज्वाला----नाही! मी तुला देवा शप्पथ खरं सांगतो आहे.

स्यू---बरं तर! Kiss me now! आणि केव्हा येशील ते सांग!

ज्वाला----हा काय चावटपणा संजीवनी! मी तुला सांगितलं आहे ;तुला कसं वागलं पाहिजे ते! तू आम्हा हिंदू गृहिणींप्रमाणे वागले पाहिजेस! वाटेल तिथे Kiss me किंवा तसलं काही नाही चालायचं! तसं नसेल तर तू चालती हो!

स्यू---oh! क्षमा कर! पण मला छळू नकोस!

ज्वाला ----Don't be silly Sue. Behave yourself.

स्यू---oh! to hell myself! मला लक्षातच राहत नाही! Excuse me dear. Don't tease me any more.Look,how he tease me Mr. Azim!

ज्वाला---बरं आज संध्याकाळी निश्चित येईन मी!

स्यू---- पहा बरं नाहीतर पुन्हा फसवशील!

ज्वाला---- नाही ग लाडके! निश्चित येईन!

स्यू----well! Do you see Mr. Azim, how he behaves with me?

अझीम----After all an Indian he is!

स्यू---- oh! You appear more shrewd than my Don Juan.! And more attractive also! Aye!

अझीम----Right! आणि म्हणूनच माझ्यासाठी इंग्लंडमध्ये कितीतरी तरुण पोरी नुसत्या झुरत आहेत! हे पहा कालच एकीच तिच्या प्रिय आझीमला हे पत्र आल आहे. They are all dying for me!

स्यू---And why should not they? . या माझ्या दुष्ट डॉन जुआनला पाहण्यापूर्वी जर तुझी माझी गाठ पडली असती तर मी सुद्धा

तुझ्यासाठी प्राण पाखडले असते! अच्छा! Bye bye. Forget me not Don. (जाते)

ज्वाला---- पाहिलस अशी आहे ही!

अझीम ---आहे खरी चित्तचोर! एक प्रेमळ जीव! पण प्रकरण जरा घाईला येणार दिसतं.नाही?

ज्वाला---त्याचा विचार करण्याची आत्ताच काही घाई नाही! पाहू पुढचं पुढे! श्रीमंत सरकार काय खल करताहेत ते आधी पाहू चल.

अझीम---- ते काय इकडेच येत आहेत सारीजणं!

(झाशीची राणी, नानासाहेब, तात्या टोपे प्रवेश करतात)

नाना----अरेरे! कुठे गेलं ते आमचं वैभव? कुठे गेली ती आमची सत्ता? काय आम्ही त्या श्री.शिवरायांची, त्या परमप्रतापी बाजीरावाची लेकरं आहोत? त्यांचच रक्त या आमच्या धमन्यांमधून वाहत आहे ना? त्यांचंच स्वातंत्र प्रेम, त्यांचच शौर्य, त्यांचीच भरारी या देहाच्या कणाकणात प्रस्फूरित झाली आहे ना? पण आज आम्ही लोक कोणत्या मुडद्याच्या मोलान हतपतित श्वानाचं जीणं जगत आहोत? कसे जगत आहोत? काय आमच्यात जीव नाही? काय तो आमच्यात कधी नव्हता? का नाही? सारं काही आहे. फक्त सुरुवात करायचीच खोटी आहे!

a

लक्ष्मी ----नाही भाऊ! मी झाशी कदापिही देणार नाही, इंग्रजांना माझी झाशी पचू देणार नाही!

नाना----आता हा केवळ आपल्या झाशीचा प्रश्न राहिला नाही महाराणी! साऱ्या हिंदुस्तानात आता डोंब उसळणार आहे!

ज्वाला----हो! धर्म आणि स्वराज्यासाठी प्रत्येकाच्या रक्ताचा प्रत्येक बिंदू तापत चालला आहे! रावांपासून रंकांपर्यंत!

अझीम---- हिंदू पासून मुसलमानांपर्यंत ----

तात्या----आणि एका अझीजान नामक नर्तकी स्त्रीपासून बलदंड अशा पुरूषा पर्यंत ----

नाना---प्रत्येकाच्या रक्ताच्या थेंबाथेंबात अन्यायाबद्दल चीड. निर्माण झाली आहे! देश,धर्म आणि स्वराज्य या वर येत चाललेला हा घाला अगदी असह्य झाला आहे

लक्ष्मी ----भाऊ! तुझ्या कर्तबगारीची तू आतापर्यंत तरी शर्थ केली आहेस! तुझे संघटना कौशल्य, सर्व हिंदुस्थानात क्रांतीच्या उठावाची तयारी करण्याचे तुझे चातुर्य, प्रत्यक्ष इंग्रजांच्या हिंदी सैन्याच्या तुकड्या तुकड्यातून स्वातंत्र्य युद्धाची चेतावणी देण्याचा तू उभारलेला प्रचंड प्रचार पाहून मी थक्क झाले आहे! तू बरिक लक्षात ठेव की जेव्हा तू स्वातंत्र्य युद्धाची ललकारी पुकारशील,

a

तेव्हा ही झाशीची स्त्री, पुरुष वेश धारण करून आपल्या तळपत्या तलवारीसह समरांगणामध्ये तांडव नृत्य करण्यास बाहेर पडेल!

नाना----तुझ्या प्रमाणेच मला प्रत्येकाची खात्री आहे मनू! देवळे आणि मशिदी यांचे रूपांतर आता उंच उंच शिखराच्या चर्चमध्ये झालेलं यापुढे कुणाकडूनही सहन केलं जाणार नाही. आमच्या प्राणापलिकडे प्रिय असलेला धर्म पदतली तूडवून आकाश मार्गाने उंच उंच चढू इच्छिणारी ही आसुरी शिखरं छिन्न-विछिन्न करून पाताळात गाडण्यात येतील! साम्राज्य तृष्णेच्या आहारी जाणारी इथली पवित्र सिंहासन तशी आता सुखासुखी त्या साम्राज्य तृष्णेला पचू दिली जाणार नाहीत! या भूमीचा कणन्कण एक दिवस खवळुन उठेल!

लक्ष्मी----हे सारे निश्चितपणे कधी घडवून आणायचं ते ठरविण्याची आता वेळ येऊन ठेपली आहे भाऊ!

नाना---हो स्वातंत्र्यदेवीच्या शुभ- मंगलाचा मुहूर्त, तिथी, वारासहित ठरविण्याची वेळ आली आहे खरी! काय ज्वालाप्रसाद, अझीम सेनापति तुम्हाला कसं वाटतं?

ज्वाला--- आमच्या भावना काय वेगळ्या असणार आहेत श्रीमंत!

a

नाना--- मग ठरवा तर! या अन्यायाचा कायमचा शिरकाण करण्याचा तो पवित्र मुहूर्त ठरू द्या!

ज्वाला---मला असं वाटतं की 23 जून १८५७ ची पर्वणी आपण अवश्य साधलीच पाहिजे.

तात्या--- हो, बरोबर शंभर वर्षे होतात या दिवशी! प्लासीच्या लढाईत आम्ही सर्वच हरवून बसलो आणि हा गोरा इथला स्वामी झाला तो दिवस 23 जून १७५७ हाच होता.

अझिम--- बरोबर! लोकांमध्येही तशीच समजूत प्रसृत आहे! 23 जून १८५७ साली इंग्रजांचे राज्य संपुष्टात येणार या भविष्याबद्दल सर्वांची मनोमन खात्री आहे!

नाना--- माझा काही भविष्यावर तितकासा विश्वास नाही! पण ती समजूत जर पराक्रमाला बळकटी देणार असेल तर तो दिवस उठावणीचा ठरवायला हरकत नाही!

लक्ष्मी---थांबा! 23 जुन हा उठावणीचा दिवस नको! त्यादिवशी सोक्षमोक्ष लागायला हवा! त्यादिवशी इंग्रजांच्या हिंदुस्थानातील साम्राज्याचा अस्तंगत झाला पाहिजे!

अझीम----बरोबर आहे, त्या दिवसापूर्वीच उठावणी होऊन त्यादिवशी आपले भारतीय स्वातंत्र्य उद्घोषित झाले पाहिजे!

ज्वाला--- शिवाय सर्व देशाच्या तलवारी त्या अखेरच्या दिवसापर्यंत आवरून धरणे ही अवघड जाईल! सर्वांना तेवढा संयम राहीलच असे नाही! तेव्हा देशाच्या पराक्रमाला यापूर्वीच वाव मिळाला पाहिजे!

नाना---- क्रांतीचं शास्त्र फार उत्तम जाणलंस तू प्रसाद! जुलमी सत्तेचे राक्षसी रक्त, प्राषण करण्यासाठी क्रांतिकारकांच्या तलवारी अगदी अधीर झालेल्या असतात! त्यांना अंतिम क्षणापर्यंत क्वचितच धीर निघतो!

तात्या---- पण अंतिम क्षणाच्या फार अलीकडे ही उठावणीचा दिवस ठरू नये! वीस-पंचवीस दिवसांचा अवधी पुरेसा व्हावा. म्हणजे एकदा केलेल्या उठावामध्ये ढिलाई वा कुचराई शिरणार नाही. क्रांतीच्या क्षणाकडे उठावाची चाक विलक्षण वेगाने धावण्यास त्यामुळे मदतच होईल,!

नाना----बरोबर आहे सेनापती.

ज्वाला---मग ३१ मे हा दिवस ठरवा ठरवायला कोणती हरकत आहे?

अझिम---ठीक आहे.

लक्ष्मी--- काही हरकत नाही.

नाना----मग ठरला तर! ३१ मे चा सूर्य प्रखर राहीलच. परंतु आमच्या क्रांतीच्या ज्वाला भारतखंभर लाख लाख जिभानी अकस्मात आणि एका क्षणी भडकून उठतील, आणि तो सूर्य अधिकच प्रखर भासेल! क्रांतीच्या धगिनं इथली इंग्रजी राजवट तर करपून जाईलच जाईल, तथापि ३१ मे च्या प्रखर सूर्याच्या केवळ तापातच कितीतरी रानोमाळ पळणारे इंग्रज माळरानावरच पटापट मरून पडतील!

अझीम--- पण आपल्या ठरलेल्या दिवसाची वाच्यता या पाच मुखांच्या बाहेर कुणापाशी ही करून उपयोगी नाही!

नाना----हो! फक्त क्रांतीच्या उठावाची जय्यत तयारी करून ठेवायची आणि "चपात्या येण्याची वाट पहा "अशी समज सर्व क्रांती नेत्यांना देऊन ठेवायची!

ज्वाला---गावोगाव चोवीस तासाच्या अवधीत सर्व भारतवर्षभर चपात्या फिरल्या पाहिजेत! चपात्या मिळाल्याच्या दुसऱ्या दिवशी सूर्योदयाला रणगर्जना करून उठावयाचं असा संकेत ठरवून दिला पाहिजे!

नाना---बरोबर आहे. सैन्याव्यतिरिक्त अन्य ठिकाणी चपात्या संदेश नेतील आणि क्रांतीपक्षाच्या हिंदी फलटणीमधून रक्तवर्णाची कमळ ते कार्य करतील, तेव्हा सैन्यातील आमच्या पक्षाच्या सूत्रधार अधिकाऱ्यांना रक्तवर्णाच्या कमळांची प्रतीक्षा करावयास सांगू!

a

हातोहात रक्तकमळ सर्वदूर पसरत, क्रांतीचा संदेश सर्व फलटणीच्या प्रमुखांना देत जातील!

ज्वाला----ही योजना जर उत्कृष्ट ठरली; तथापि कानपूरच्या दृष्टीने आणखी एका गोष्टी संबंधी आपली योजना आगाऊ ठरली पाहिजे! श्रीमंत, सर व्हिलरला मधून मधून जो संशय येत असतो, त्यामुळे तो शहाणा बनत चालला आहे! कानपुरातील क्रांती पक्षाचा प्राण असा सुभेदार टक्कासिंग आणि शिपायांचा नेता श्यामसुद्दीन याजकडून कळले की आणीबाणीच्या वेळी इंग्रजांना आसरा घेता यावा, म्हणून सर व्हिलर ने कानपूरच्या सैन्याला जवळच पण गंगा मातेच्या दक्षिण बाजूला मजबूत तटबंदीची एक गढी उभारण्याचा उद्योग चालविला आहे. या गढीला आजूबाजूस खंदक म्हणून मोर्चे बांधण्यात येणार आहेत. आणि गढीत धान्यधुन्यही भरून ठेवणार आहेत! यातही सुदैवाची गोष्ट अशी की ज्या हिंदी ठेकेदाराला तिथे शिधा आदी सामग्रीची सिद्धता ठेवण्याची आज्ञा गेली आहे तो सुभेदार टक्कासिंगाला वश होणाऱ्या यापैकी एक आहे.

नाना----वा; इतकी जर अनुकूलता आहे तर, आमच्या या गुप्तहेरांच्या प्रमुखाला अवघड काय वाटत आहे?

ज्वाला----अवघड असं काही विशेष वाटत नाही. मी त्या दृष्टीने पावले टाकण्यात सुरुवातही केली आहे. आजच रंगराव घोडेस्वाराला

टक्कासिंगाकडे ती कामगिरी फत्ते करण्याबद्दल निरोप देण्याला पाठविला आहे. तथापि जर त्यात यश आले नाही तर त्या गढीचा समाचार घेण्याला आपण समर्थ होण्याच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत. ही गोष्ट श्रीमंतांना ज्ञात व्हावी म्हणून मी आवर्जून सांगितली इतकंच!

नाना----ठीक आहे! सेनापती तात्या टोपे या परिस्थितीवर तोडगा योजतीलच!

तात्या----पाहू,माझा विचार नक्की झाला की श्रीमंतांना मी तो कळविनच!

नाना---- आणि देवांचे वारे ही अनुकूल वाहत असलेले दिसत असल्यामुळे या गोष्टीतही आपला मार्ग लवकरच मोकळा होईल असं मला वाटतं! तेव्हा आता ३१ मे हा उठावाचा दिवस ठरला! त्यादिवशी कोटी-कोटी खड्ग पहाटेच्या अंधुक अंधारातून सूर्योदयाबरोबर लखलखत उठतील आणि भारत मातेच्या क्षितिजावर स्वातंत्र्यसूर्याचा आरक्त रक्तिमा पसरू लागेल! तोपर्यंत आम्ही आपापल्या ठरलेल्या कामाला लागुया! एप्रिल अखेर पर्यंत आम्ही आणि आमचे हितमंत्री अझिमुल्लाखान गुप्त संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपणा आणि एकजिनसीपणा आणण्यासाठी उत्तर हिंदुस्थानातील प्रमुख नगरांचा दौरा करू! तोपर्यंत झाशीच्या

महाराणी, तुम्ही आपल्या झाशीचे तट मजबूत करून ठेवा. ज्वालाप्रसाद, तुम्ही तुमच्या हेरगिरीचं जाळं अगदी कुशलतेने आणि अत्यंत गुप्तपणे आज पर्यंत जसं करून ठेवलं आहे त्याची मजबूत बांधणी करण्याच्या कार्याला लागा. तात्या टोपे तुम्ही सुभेदार टक्कासिंग आणि शमशुद्दीन यांच्या सहाय्यानं कानपूरची सर्व सूत्र आपल्या हाती अगदी हूकमी येतील याच्या तजवीजीला लागा. आशा करूया की ३१ मे चा क्रांतीदिन आपल्या अपेक्षेप्रमाणे एकाएकी रक्तरंजित होईल धुसमुसत्या प्रक्षोभाच्या ज्वाला एकाक्षणीच सर्व अन्यायाला गिळून टाकण्यास भडकून उठतील.

(पडदा)

अंक पहिला समाप्त

# ---अंक2----प्रवेश1ला

-----------

मिस्टर शेपर्ड यांचा बंगला. .गेल्या अंकात घडलेल्या प्रसंगानंतर दोन अडीच महिन्यांनी या अंकातील प्रसंग घडतो. मिस्टर शेपर्ड यांच्या बंगल्यातील व्हरांड्यातीलच बसण्या उठण्याची जागा. व्हरांड्याच्या समोर पोर्च आहे. आणि पोर्चवर एक हिरवीगार वेल चढली आहे. तिला तांबडा-लाल पेल्याच्या आकाराची फुले आहेत. पोर्चच्या समोर एक गोल आकाराची सुंदर बाग असून त्या बागेभोवती हिरव्यागार वनस्पतींच्या आणि शोभेच्या झुडपाच्या कुंड्या आहेत. सर्व काही अगदी "टिप-टॉँप" आहे.व्हरांड्यात कोच आहेत.कोचांच्या समोर लहान लहान दोन टिपाँय आहेत. टिपाँयवर दोन दोन ऍशपॉट आहेत. मधल्या दरवाज्यावर सुंदर फुलांच्या प्रिंटचा सिल्कचा पडदा आहे. त्याचा रंग फिकट गुलाबी आहे.

व्हरांड्यात मिस्टर आणि मिसेस शेपर्ड यांचा संवाद होत आहे. तो संवाद कसला? वाद-विवाद आहे. दोघेही अगदी हिरिरीला पेटून आपली बाजू मांडत आहेत. दोघांच्याही बोलण्यात तळमळीचा प्रामाणिक ओलावा आहे. मिस्टर शेपर्डच्या हातात गीतेची एक प्रत आहे. मिस्टर

a

शेपर्ड यांच्यासमोर एक पेटलेली पाईप आहे. मधून मधून ते या पाईपचा आस्वादही घेतात. डोरोथीबाई लोकरीचे विणकाम करीत आहे.

डोरोथी शेपर्ड----डॅनिअल आज सकाळपासून कशात डोकं खुपसून बसला आहेस एवढा?

(डॅनियल शेपर्ड तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपले वाचन तसेच चालू ठेवतात. डोरोथीबाई चिडून त्यांच्याकडे पाहते आणि बहिऱ्याला ओरडून सांगावे त्या प्रमाणे मोठ्या आवाजात प्रारंभ करते) Did you hear me? (तरी ही पूर्वीची तऱ्हा. पुन्हा अधिक मोठ्यानं) कान तपासून घे डॅनियल. Are you short of hearing?

मिस्टर शेपर्ड----(वाचनातून डोके वर काढून) what?

मिसेस शेपर्ड--- म्हटलं ऐकायला येतंय ना?

मिस्टर शेपर्ड----ऐकायला येतं! परंतु सध्या जे पुस्तक मी वाचीत आहे, या पुस्तकातील एक एक शब्द, तुझ्या लांबलचक भाषणापेक्षाही अधिक लक्षवेधक आहे.

मिसेस शेपर्ड---- -तेच तर विचारते मी! मघा पासुन मी इथं आपली बसले आहे. मधून मधून मीच आपली बोलते आहे. त्याला तुझं

a

"हं!अं?हं! या पलीकडे काही उत्तर येत नाही. म्हटलं मी काही स्वगत बोलत बसले नाही.

मिस्टर शेपर्ड----यावेळी खरोखरच जर तू स्वगत बोलशील तर किती छान होईल?

मिसेस शेपर्ड----पण काय वाचतो आहेस तरी काय ते? एवढंस तर चोपड आहे.

मिस्टर शेपर्ड----हे चोपडं एवढंच आहे हे खरं आहे. पण यात सर्व विश्वाचं दर्शन साठविलं आहे. यात सर्व विश्वाचं कोडं उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. आणि तो किती पटणारा प्रयत्न आहे पण!

मिसेस शेपर्ड---- तेच म्हणते मी! आहे तरी कोणतं चोपडं ते?

मिस्टर शेपर्ड----ही भगवद्गीता आहे---

मिसेस शेपर्ड----_Oh! Burn that rubbish thing! You are becoming Heathen day by day.

मिस्टर शेपर्ड----तुला गाढवीला या गुळाची काय चव असणार आहे! हे आहे संस्कृत भाषेत. तुला तर संस्कृत भाषेचा गंध नाही! किंबहुना हिंदुधर्माचा उगाच द्वेश करणाऱ्या तुझ्या पादरी गुरुना तरी संस्कृत भाषेचा स्पर्श झालेला आहे? त्यांना या संस्कृत ग्रंथराजाची काय गोडी लागणार?

मिसेस शेपर्ड---- नाही तेच ठीक आहे! आकाशातील देवबाप्पाच्या पवित्र प्रेषित येशूच्या बायबलहून या जगात कोणती वस्तू श्रेष्ठ असणार आहे?

मिस्टर शेफर्ड---- हा हेच! I wish to lay my finger rightly on this attitude! मला तुमच्यासाठी आणि सर्व पाश्चिमात्य जगाचे डोळे उघडण्यासाठी या संस्कृत ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर करावयाचे आहे. सांप्रत मी त्याच उद्योगाची ही पूर्वतयारी करीत आहे!

मिसेस शेपर्ड---- काही नको हा उपद्व्याप करूस तू! इकडची पूर्वेकडची घाण तिकडे पश्चिमेकडे पार्सल करू नकोस! निदान आमची इंग्रजी भाषा तरी या अपवित्र ग्रंथाने विटाळू नकोस!

मिस्टर शेपर्ड ----वाटायच, वाटायचं तुला तसं! परंतु नुसते तुला वाटायला माझी काही हरकत नाही. पण तुझे ते घाणेरडे विचार तुझ्या मुखाने बोलून तू तुझ्या तोंडाचा शेतखाना करू नकोस.

मिसेस शेपर्ड----Shut up Danial, What a hell you are making of your mouth! Speak some sense.

मि. शेपर्ड---- शांत हो! चिडू नको अशी! बाजू लंगडी असली की माणूस असाच चिडतो बरं! शांतपणे विचार कर. तू जर दुसऱ्याच्या भावनांकडे दुर्लक्ष करून अद्वातद्वा बोलण्याचं टाळणार नाहीस, तर

a

दुसऱ्यांनी तरी तुझी गय का करावी?. या पौर्वात्य लोकांच्या तत्त्वज्ञानाकडे जरा डोळे उघडून सहानुभूतीने पहा!

मिसेस शेपर्ड ----मला त्याची काही गरज वाटत नाही डॅनियल! हे सारे लोक गुलाम आहेत! या गुलाम लोकांचं तत्त्वज्ञान काय किमतीचे असणार ते न वाचता ही सांगता येण्यासारखा आहे! गुलामांचा तत्वज्ञान आम्हाला शिकण्याची काही गरज नाही!

मिस्टर शेपर्ड----पण तुझं राष्ट्र जन्मण्यापूर्वी हे राष्ट्र स्वतंत्र आणि वैभवशाली होतं हे विसरू नकोस! निदान तू जन्मण्यापूर्वी तरी हे राष्ट्र स्वतंत्र होतं, याची जाणीव ठेव!

मिसेस शेपर्ड----फारच सहानुभूतीने पाहतो आहेस या गुलामांकडे तू डॅनियल! त्यांचा धर्म, यांचं तत्त्वज्ञान जर श्रेष्ठ उच्चभ्रू प्रतीचं असतं तर त्याचा काही अंश तरी यांच्या आचरणात उतरला नसता का? काय हे इथले लोक? सारे गोष्टी करतील त्या लाडू -करंज्याच्या! कुठेच पराक्रमाचे वारे नाहीत! जे काही आहे ते त्यांनी भाकरीसाठी विकून टाकले आहे. यांच्यात राजे तरी किती! काय यांच्यात एकजिनसीपणा आहे? हे लोक अजून प्राथमिक अवस्थेत नाही तर मध्ययुगीन अवस्थेत आहेत! प्रत्येक राजा आणि त्याची प्रजा म्हणजे एकेक प्रबळ सरदार आणि त्याची टोळी!

a

मि. शेपर्ड----अशी परिस्थिती आहे ही गोष्ट खरी आहे. पण यांची अशी परिस्थिती असतानाच तू जन्माला आली आहेस हा काही या लोकांचा दोष नव्हे! याच भूमीत शिवाजी महाराजांसारखा सर्व जगात श्रेष्ठ ठरणारा राजा होऊन गेला हे तुझ्या ध्यानीमनीही नाही! These people were have a great nation my dear! You are yet a child! You have to learn their history! They were civilised once!

मिसेस शेपर्ड----त्यांच्या त्या हाय सिव्हिलायझेशनचा एखादा कण तरी तुला आता आढळलेला असलाच पाहिजे!. कुठे आढळला आहे ते मला सांगशील का!

मिस्टर शेपर्ड----अगदी आनंदानं! दुर काही जावयाला नको! ज्वालाप्रसादचे उदाहरण घे! तू उघडपणे कबूल कर अथवा न कर! परंतु त्याला तू आपल्या ख्रिस्ती धर्म प्रचाराचे डोस पाजण्याचे अधून मधून प्रयत्न करीत आली आहेसच! पण तो ख्रिस्ती व्हावा म्हणून तू आपल्या मुलीचाही उपयोग करून घेत आहेस! या दोघांचा प्रेम संबंध जडतो आहे हे तुलाही ठाऊक आहे व मलाही ठाऊक आहे! मी त्यांच्याकडे केवळ प्रेमाचा प्रताप या दृष्टीने पाहतो, तर तू आपल्या जेनी मुळे आज ना उद्या हा ज्वालाप्रसाद

ख्रिस्ती होईल म्हणून आशाळभूत दृष्टीने त्या संबंधाला एक अनुमती देत आली आहेस!

मिसेस शेपर्ड----Danial!

मिस्टर शेपर्ड ----wait. Let met finish! तू ते मान्य कर अथवा करू नकोस! तो प्रश्न नाही! पण मुख्य प्रश्न असा आहे की तुझ्या या कुटिल डावाला ज्वालाप्रसाद बळी पडेल का? So far as, I read him, it is next to impossiblity ज्वालाप्रसाद हा अशा मोहाना बळी पडून आपला धर्म सोडणाऱ्यापैकी नाही!

मिसेस शेपर्ड ----मग यात सिव्हिलायझेशनचा कुठे प्रश्न आला?

मि.शेपर्ड----मला तुझी कीव वाटते डोरोथी! अगं, तुला इतकंही समजू नये? सिव्हिलायझेशन म्हणजे काय नुसते झकपक कपडे, इस्त्रीची ताठ कॉलर, मोठमोठे बंगले, ही चिनी मातीची मौल्यवान भांडी, या शोभेच्या कुंड्या, सुबक आणि शोभिवंत आरसे, स्नो पावडर, लिपस्टिक, मोठमोठे रस्ते एवढंच वाटलं तुला? हे सारं असूनही माणसं जंगली, रानटी, अनसिव्हीलाईज्ड असतात! सिव्हिलायझेशनचा मनाशी संबंध आहे! मन किती उदार आहे, मन आपल्या धर्म मार्गावर किती अचल आहे, ते परमतत्वसहिष्णू किती आहे, शत्रूबद्दल देखील त्या मनात किती माणुसकी आहे, या गोष्टीवर सिव्हिलायझेशन अवलंबून आहे. कळलं? इथली सुज्ञ

स्वाभिमानी माणसं ही किती उंच विचारांची आहेत याचा तुला अनुभव नाही! त्या शोधक दृष्टीनं तू पाहिलेलच नाहीस त्यांच्याकडे!

मिसेस शेपर्ड----सर्व काही शोधक दृष्टीने पाहिलं आहे मी डॅनियल! किंबहुना तुझ्या पेक्षा अधिक शोधक दृष्टीनं पाहिलं आहे!

मिस्टर शेपर्ड---- खरंच का पाहिलं आहेस.? मला शंका वाटते! मग तुझ्या त्या दृष्टीला इथल्या नानासाहेब पेशव्यांसारखा तरी ठळक माणूस दिसला का? आमच्या कंपनी सरकारने कोणत्या न्यायानं त्याच्या बापाची आठ लाख रुपयांची पेन्शन बंद केली? वारसाहक्काने त्याला मिळू दिली का? पण इंग्रजां विषयी या नानाचं वागणं कसं आहे? एखाद्या प्रणयी तरुण इंग्रज युग्माला चार दिवस प्रणय रंगात आकंठ बुडण्याची इच्छा झाली की "महाराज" नानासाहेबांच्या अनेक प्रसादापैकी एखादा सुंदर प्रसाद अगदी सर्व सेवक परिवारासह अजून मिळतो ना? कानपूरमध्ये राहण्यास कंटाळलेले कितीतरी साहेब आणि त्यांच्या मेमसाहेब हे महाराज नानासाहेबांच्या ब्रह्मावर्तास भेट देतात ना? ज्या इंग्रजी सत्तेने त्यांच्या हक्काची त्यांच्या सिहासनाची पायमल्ली केली, त्या आम्हा इंग्रजां विषयी व्यक्तिगत विद्वेषाचे विष त्याच्या आत्म्याला थोड तरी स्पर्शित झालं आहे का? शत्रुपक्षाच्या लोकांची व्यक्तिगत

a

जीवनात इतक्या उदार आणि सामाजिक सभ्यतेने वागण्याची उच्च आणि विरोचित वृत्ती किती इंग्रज नरपुंगवामध्ये आहे?

मिसेस शेपर्ड----तू सांगतोस हे केवळ अपवाद आहेत डॅनियल. And exception proves my rule! या इंडियन लोकांइतके निकृष्ट लोक या पृथ्वीतलावर नसतील! केवळ या लोकांचं सुदैव म्हणून आमचं राज्य इथं आलेलं आहे! आता या लोकांना आम्ही सुधारायचं आहे!

मि.शेपर्ड----Exactly, मी तरी तेच म्हणतो आहे! इथल्या लोकांना आपण सुधारलं पाहिजे. आपल्या दोघांचं एकमत आहे या बाबतीत! पण यांना सुधारतांना या लोकांचही जे आपल्याहून चांगलं आहे, ते आम्ही टिकवलं पाहिजे असे मी म्हणतो. आणि याच सारंच पुरून टाकले पाहिजे असं तू म्हणतेस तेवढाच फरक आहे! नानासाहेबांना तू अपवाद म्हणतेस. ते कदाचित खरं असेल! पण इथल्या या भूमीत ते बीज आहे हे तुला मान्य केलं पाहिजे! या लोकांना आपल्या धर्मातील तत्व आचरणात आणण्याची सवड कधीच मिळालेली नसावी अशी माझी समजूत आहे! यांना सतत झगडा द्यावा लागला आहे! सतत लढाई आणि धामधूम यातच यांचा काळ गेला आहे! त्यांना स्वस्थपणे विचार करण्यास सवडच नव्हती, निदान मोगलांच्या स्वाऱ्यांपासून तर यांना मुळीच सवड

a

मिळालेली नाही! आता आम्ही यांना सवड दिली पाहिजे. आम्ही त्यांना चान्स दिला पाहिजे. या लोकांचा धर्म आणि या लोकांची संस्कृत विद्या ही टिकवून धरून जर आम्ही त्यांना इंग्रजी शिक्षण देऊ आणि सुधारू,तर ते राष्ट्र म्हणजे आपल्या इंग्लिश राष्ट्राने जगाला दिलेली एक मोठी देणगी ठरेल आणि आपल्या राष्ट्रालाही ती गोष्ट मोठ्या अभिमानाची होईल!

मिसेस शेपर्ड ----केवळ शिक्षणानं का त्यांना सुधारता येईल?

मिस्टर शेपर्ड----हो!-केवळ शिक्षणानं! आणि दुसऱ्या कशानही नव्हे! तुझ्या धर्मांतराच्या मार्गाने तर मुळीच नव्हे! या अभागी देशाची ऊर्जितावस्था केवळ शिक्षणात आहे; हे इथल्या लोकांना आणि इथल्या सरकारला जेवढं लवकरात लवकर उमजेल तेवढ्या लवकरात लवकर यांची सर्वांगीण सुधारणा होईल! आनंदाची गोष्ट की राजाराम मोहनरॉय सारखे दूरदृष्टीचे हुशार गृहस्थ या भारतात हेच कार्य करीत आहेत! आता इथला म्हातारा कोतारा, इथला बालगोपाल शिकून तयार होईल हाच त्यांच्या सुधारणेचा मार्ग!

मिसेस शेपर्ड----छट्! अगदी चूक! इथल्या सर्व लोकांना ख्रिस्ती करणं हाच त्यांच्या सुधारणेचा एकमेव मार्ग आहे. यांच्या सुधारणेतील जर मोठी धोंड कोणती असेल तर त्यांची ती संस्कृत विद्या! So called विद्या आहे ती! त्यांच्या संस्कृत पुस्तकात काय आहे ते

a

लॉर्ड मेकाँलेनं सांगितलं आहे, ते तू एकदा वाच! त्यांची जिओग्राफी, त्यांच्या भूगोलाचं ज्ञान म्हणजे समुद्र हा दुधाचा आहे! त्यांच्यातला सर्वात शहाणा माणूस नाना फडणवीस हा आम्हा इंग्रजांना जलचर प्राणी समजत असे म्हणे!आणि कलकत्ता हे एक बेट आहे अशी त्यांची माहिती होती म्हणे! काय दिवे ज्ञानाचे पाजळले आहेत पण! फेकून दे ती संस्कृत पुस्तक गटारात! लाँर्ड मेकॉलेनं यांना इंग्रजी शिक्षण देण्याचे ठरविले आणि ते आमच्या इंग्लंडच्या सरकारनही स्वीकारलं, ती गोष्ट किती चांगली झाली! आता हे लोक इंग्रजी शिकतील, आमच्या लोकांच्या चालीरीती स्वीकारतील आणि मूळ इंग्रजीतून बायबल वाचून ख्रिस्ती धर्म स्वीकारतील व आपला उद्धार करून घेतील!

मिस्टर शेपर्ड----मेकॉलेन यांना इंग्रजी शिकवण्याची शिफारस केली हे ठीक झाल! परंतु यांची संस्कृत पुस्तक टाकाऊ ठरवली हे केवळ त्याच्या संस्कृत विद्येच्या उथळ ज्ञानाचं द्योतक! काही लोकांनी अलंकारिक भाषेत समुद्र हा दुधाचा म्हटलं आणि त्यालाच या उथळ बुद्धीच्या मेकॉलेनं, या लोकांचं ज्ञान म्हणून प्रसिद्धी दिली!

मिसेस शेपर्ड ----मेकॉले उथळ बुद्धीचा काय? मला वाटतं तू ही संस्कृत पुस्तकांच्या वाचनाने बुद्धू होत चाललास! ते काही नाही तुझ्या

लायब्ररीतील सारी संस्कृत पुस्तक जाळून मी त्यावर तुला आता काही दिवस चहा करून देण्याचे ठरविले आहे!

मिस्टर शेपर्ड---- माझी संस्कृत पुस्तक जाळणाऱ्याचे प्रथम हात जळतील हे लक्षात ठेव!

मिसेस शेपर्ड----मग सोडून दे पाहू हा नाद! उगाच वेळेचा अपव्यय! त्यापेक्षा बायबलची पारायणे करीत बैस! वृद्धापकाळी तेवढाच स्वर्गाच्या आणि येशूच्या जवळ जाशील!

मिस्टर शेपर्ड ----येशूच्या जवळ जाण्याचा मार्ग तुझ्यापेक्षा मला अधिक चांगला माहीत आहे! इथल्या लोकांना जुलमानं वाढवून जर तू येशू जवळ जाणार अशी तुझी समजूत असेल तर ती साफ चुकीची आहे! त्यामुळे तू नरकातच जाशील! त्यापेक्षा त्यांना त्यांच्याच धर्मात जगू दे व तुझ्या आणि माझ्या धर्माचं जे परमतत्व "सेवा " ती त्यांना शिकव. त्यांना मदत कर, त्यांची तू ही सेवा कर. त्यांना निष्कारण बाटवून त्यांच्या धर्मात असलेल्या काही परम तत्त्वावर उगाच घाला घालू नकोस! त्यांना बाटविणं म्हणजे त्यांच्याही धर्मात असलेल्या काही थोर तत्त्वांना साफ बूडविणं होय! ती,एक हत्या समज! त्यामुळे तू नरकात जाशील! परमतत्वे मारल्याचं पाप तुझ्या मस्तकी बसेल!

मिसेस शेपर्ड----हिंदू धर्मात किंवा मुसलमान धर्मात? आणि परमतत्त्व! काय वेड लागलंय की काय तुला? तुझ्या संस्कृत वाचनाचा हा परिणाम बरं! संस्कृत वाचनाचा परिणाम! तू ही त्यामुळे नेभळट बनत चालला आहेस. इथल्या लोकांचा धर्म किती क्षुद्र आणि टाकाऊ आहे आणि असला धर्म टिकव,म्हणून मला उपदेश करतोस? आम्ही या धर्माची पाळंमुळं खणून काढण्याचा चंग बांधलेला आहे! आमच्या बिशप कार्डिनल लोकांना इथले लष्करातील अधिकारी व इथले कंपनी सरकार आतून अनुकूल आहेत! त्यांनी सैन्यातील सर्व हिंदी लोकांना बाटविण्याचं अभिवचन आम्हाला दिलं आहे! कलकत्त्याला डमडम जवळ काडतुसं करण्याचा जो कारखाना आहे त्यांना गाईची व डुकराची चरबी लावण्यात येणार आहे! ती◌े काडतुसं या सैनिकांना देण्यात येतील आणि ती तोंडाने तोडण्यास सांगण्यात येतील! सर्व सैन्य हा हा म्हणता ख्रिस्ती होतील!

मिस्टर शेपर्ड ----अरेरे! कोणत्या पातकाचे तुम्ही धनी होताहात डोरोथी! तू माझी पत्नी म्हणून तुला तरी निदान मी या पातकापासून परावृत्त करू शकेन काय?

मिसेस शेपर्ड----मला अडविणारे कोणतेही हात अगोदर झडून पडतील!. मी पवित्र येशूचं कार्य करीत आहे! इतकेच नव्हे, आमच्या

मायदेशाच्या सरकारची ही फार मोठी सेवा आमच्या मिशनरी संस्था करीत आहेत! इथे ख्रिस्ती धर्म पसरला की इंग्रजांचं म्हणजे आमचं राज्य अगदी चंद्रसूर्य असेपर्यंत कायम झालं असं समज!

मि. शेपर्ड----किती भयंकर! अंगावर नुसते शहारे उभे राहत आहेत माझ्या.! काय ही असुरी लालसा डोरोथी! इथल्या लोकांना कायम गुलाम ठेवावयाचं? इथला धर्म, इथली संस्कृती कायमची काढून टाकायची? मला तर तुझे हे विचार ऐकून भोवळ येऊ लागली आहे! तुझ्या आत्म्यात सँटनचा तर प्रवेश झालेला नाही?

मिसेस शेफर्ड ----poor Danial तू किती डरपोक आहेस! आमच्या इंग्लिश राष्ट्राची सेवा करण्याची ही प्रचंड योजना तुझ्या बुद्धीला पेलू नये? हा तुझ्या संस्कृत विद्येच्या वाचनाचा परिणाम! फेकून दे ती गीता आणि ते तिकडे पहा नानकचंद आणि तो त्याच्याबरोबर दुसरा एक तरुण येत आहे. ते दोघे आता धर्म बदलण्याचा विचार करण्यासाठी व बाप्तिस्म्याचा दिवस ठरविण्याकरिताच मजकडे,येत आहेत! त्यांना तरी निदान माझ्या नवऱ्याच्या हातात हे अपवित्र पुस्तक दिसू दे नको!. आण ते इकडे! (पुस्तक हिसकावून घेऊ पाहते)

मि. शेपर्ड ----No, No, Dorothi! you are committing an assault! Leave it with me! (पुस्तक सोडवून घेतो) माझ्या

a

हातातून हे पुस्तक जाण्यापेक्षा मीच इथून माझ्या लायब्ररीत जातो म्हणजे झालं! मात्र जाता जाता तुला सांगून ठेवतो की स्यू जेनीशी लग्न लावून देण्याच्या अटीवर जर यापैकी कोणी ख्रिस्ती होत असेल तर मध्येच स्यू जेनीला फुकट बळी देण्याच ठरवु नको! समजलं? (जातो)

मिसेस शेपर्ड ----Nonsense! असली अत्यद्भुत कल्पना याला सुचली तरी कशी? (नानकचंद आणि सुरेंद्रनाथ चटोपाध्याय प्रवेश करतात)

नानकचंद----May we come in mam?

मिसेस शे.----Come in gentlemen! Good morning.

नानकचंद ----Good morning mam!

सुरेंद्रनाथ----Good morning.

मिसेस शेपर्ड ----बसा बसा (नानकचंद व सुरेंद्रनाथ एका कोचावर बसतात)

नानकचंद----This is Mr. Surendranath Chattopadhyaya mam! यांच्याविषयीच मी आपणापाशी बोललो होतो! (सुरेंद्रनाथास)आणि या मिसेस शेपर्ड बाई!

मिसेस शे..----(शेख हॉंड करीत)Very glad to see you!

a

सुरेंद्र---- Oh! the same with me!

मिसेस शेपर्ड ----नानकचंदानं मला आपले विचार कळविले आहेत. तुम्ही हिंदू धर्माला कंटाळा आहात असं त्यांनं मला सांगितल.

सुरेंद्र----खरं आहे ते! हिंदू धर्म हा मूळचा फार चांगला असावा अशी माझी समजूत आहे. परंतु त्या धर्मात आणि तो धर्म मानणाऱ्या समाजात इतक्या अनिष्ट गोष्टी शिरल्या आहेत की आता त्या धर्माची व त्या समाजाची मला शिसारी येत आहे.

मिसेस शेपर्ड----या अनिष्ट गोष्टी दूर करता येण्यासारख्या असतील ना!

सुरेंद्र ----नाव नको! या अनिष्ट गोष्टी म्हणजेच हिंदू धर्म ठरला आहे! त्या बदलणं मनुष्य शक्ती बाहेरचं आहे! त्यापेक्षा दुसरा धर्म शोधणं सुलभ असं माझं विचाराअंती मत बनलं आहे!

मिसेस शेपर्ड----मग तुम्हाला ख्रिस्ती धर्म आवडत असावा नाही?

सुरेंद्र----असंच काही नाही. त्या धर्माची आवड निर्माण होण्यासाठी त्या धर्माचा मला अभ्यास करावा लागेल!

मिसेस शेपर्ड----वा! हे ऐकून मला फार आनंद झाला!

a

सुरेंद्र ----आपल्याकडे त्या धर्माचं काही वांग्मय मिळू शकेल असं माझा हा मित्र मला म्हणाला. आणि म्हणून मी आपल्याकडे आज आलो आहे.

मिसेस शेपर्ड----अस्स! मला कळलं होतं ते जरा वेगळंच होतं. आपण ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याच नक्की ठरवलं असून केवळ काही शंका दूर करून घेण्यासाठी मजकडे येणार आहात असं मला नानकचंद म्हणाले होते. होय ना हो?

नानक---- मला तसं वाटलं होतं खरं!

सुरेंद्र----चुकीची समजूत झाली तुझी नानक! ख्रिस्ती धर्मच मी स्वीकारणार आहे असं नाही. हिंदू धर्माशिवाय दुसरा कुठला तरी धर्म मला स्वीकारायचा आहे. मी हिंदू म्हणून जन्मलो खरा, पण ते माझ्या हाती नव्हते! पण मी हिंदू म्हणून मरणार नाही हे निश्चित! इतका मी या धर्माला विटलो आहे!

मिसेस शेपर्ड ----वा! छान! आपला हा निश्चय सर्व जगाला मार्गदर्शक ठरेल यात मला तरी शंका वाटत नाही! पण तुम्ही हिंदू धर्माला निश्चित कोणत्या कारणासाठी विटला आहात ते मला समजेल का? म्हणजे तुमची व्यथा कोणती हे मला कळेल आणि त्यावर ख्रिस्ती धर्मात औषध आहे की नाही ते मला निश्चित सांगता येईल!

सुरेंद्र----हिंदू धर्माची मुलतत्वे ही सर्वोत्कृष्ट वाटतात. त्यांचं तत्वज्ञान, त्यांची सर्वसमावेशक दृष्टी, त्यांचं विश्व व्यापकत्व, त्यांची परमसहिष्णुता इत्यादी गोष्टी अत्यंत श्रेष्ठ आहेत. तथापि ही तत्व केवळ तत्त्वज्ञानाच्या पुस्तकातच पडून राहिली आहेत. त्यांचा अनुभव, त्यांचा साक्षात्कार प्रत्यक्ष जीवनात पाहायला मिळत नाही आणि हीच माझी व्यथा आहे! हा समाज जातीभेदाने अगदी बुचबुचला आहे. इथल्या जाती, पोटजातीतही भेद, उपभेद आहेत.आणि हे भेद, उपभेद केवळ जन्माने ठरतात, ठरवले जातात. आणि ते अनुलंघ्य आहेत! माणसाला कर्तृत्वानं या जातीभेदाची उच्चनीचता भेदून जाता येत नाही. हे एक मोठं प्राणघातक दुष्टचक्र आहे.

मिसेस शेपर्ड----Right you are!

सुरेंद्र---- आता ही विकृतावस्था किती पराकोटीला पोहोचली आहे पहा!. हिंदू समाजात अगदी हीन समजले गेलेले अस्पृश्य लोक. अस्पृश्यता ही हिंदू समाजाला लागलेला महारोग तर खराच, पण या अस्पृश्यात तरी भेदाभेद नसावा! पण नाव नको! महारोग तो महारोग. पण त्यातही जाती. कोण महार कोण चांभार, कोण ढोर, कोण मांग, कोण भंगी, एक का दोन! यांच्यात रोटी व्यवहार नाही कि बेटी व्यवहार नाही! मी खरोखर अस्पृश्य म्हणूनही हिंदू धर्मात

a

राहिलो असतो. पण त्यांच्यात तरी उच्चनीचता नसावी! ती नसती तर स्वतः अस्पृश्यता स्वीकारुन त्यांच्या अभंगतेच्या, एकतेच्या जोरावर सर्व हिंदू समाजाला अभंग, एक, जातिभेदरहित करण्याचा मी विश्वप्रयत्न केला असता! पण दुर्दैव! दुसरं काय? आणि म्हणूनच मी हिंदू धर्माला कंटाळलो आहे. त्या धर्मावर जी चौकट स्वार्थी लोकांनी लादली आहे, ती या समाजाच्या हाडीमासी इतकी रुतून बसली आहे, कि ती दूर करणे म्हणजेच हिंदुधर्म हे नाव टाकून देणे असं मला वाटतं! तेव्हा हिंदुधर्म हे नाव टाकून देण्यासाठी मी काय करावे, याचा विचार करतो आहे! हे नाव टाकण्यापूर्वी मला जे दुसरं नाव स्वीकारायच आहे ते ठरविलं पाहिजे! मात्र हे दुसरं नाव संपूर्ण जातिभेदरहित असलं पाहिजे! तसा आहे का तुमचा धर्म?

मिसेस शेपर्ड----हो आहे ना! आमच्या इंग्रज समाजात जातिभेद नाही! आम्ही कर्तृत्वाला अधिक मानतो, जन्माला नाही!

सुरेंद्र---- शेपर्ड बाई! माझा प्रश्न केवळ इंग्रज समाजात काय आहे याविषयी नाही! तुमच्या ख्रिस्ती समाजात काय आहे याच्या विषयी आहे! आजपर्यंत तुम्ही इथे लाखो लोक ख्रिस्ती केले आहेत! ते सारे पूर्वी हिंदू समाजात होते. ज्या परिस्थितीने ते हिंदू समाजात गांजले गेले होते, ती त्यांची परिस्थिती दूर झाली आहे का?

मिसेस शेपर्ड ----त्यांना आम्ही पैशाची मदत देतो. त्यांना शिक्षण देतो, त्यांच्या जडाभारात त्यांना बेस्ट मेडिकल हेल्प देतो. त्यांची परिस्थिती शतपटीन सुधारली नाही का?

सुरेंद्र---- मी आर्थिक परिस्थितीविषयी विचारत नाही मिसेस शेपर्ड! मी जीवनात अर्थाला दुय्यम स्थान देतो. त्यांच्यात आणि तुमच्यात तुम्ही भेदाभेद मानीत नाही का? त्यांना अस्पृश्य समजत नाही हे मला ठाऊक आहे. पण ते काले आदमी, तुम्ही गोरे आदमी हा भेदाभेद मानीत नाही का? ख्रिस्ती धर्माचा कोणताही माणूस हा त्याच्या कातडीच्या रंगाकडे लक्ष न देता बेटी व्यवहार योग्य मानला जातो का?

मिसेस शेपर्ड----तुम्ही म्हणता तसा धर्म अजून अवतरलेला नाही मिस्टर सुरेंद्रनाथ! आणि सर्व प्रकारचे भेदाभेद नाहीसे करण्याचं तुमचं स्वप्न हे स्वप्नच राहिल. जगाचा अंतकाळ जवळ आला तरी तुमचं स्वप्न हे साकार होणार नाही. You take it from me! It is an ideal and an ideal is what remains externally ideal.

सुरेंद्र----मग मला तुम्ही निराश करता आहात मिसेस शेपर्ड!

मिसेस शेपर्ड----नाही,. उलट मी तुम्हाला मार्ग दाखवीत आहे. आता त्या आयडीएलशी अधिक जवळ असणाऱ्या आमच्या धर्माचा विचार करण्यास मी तुम्हाला सांगणार आहे! पहा आमच्या धर्माकडे! तो

खराखुरा भूतदयावादी आहे. सेवा हा आम्ही आमच्या धर्माचा प्राण मानतो. सेवा करण्यासाठी येशु अवतरला आणि आम्हाला सेवाधर्म शिकवुन निघून गेला. शिवाय हा धर्म युरोपात, अमेरिकेत पसरलेला आहे जवळजवळ अर्धे जग ख्रिस्ती झालेलं आहे

नानकचंद----हं, मी सुद्धा तेच म्हणतो!

सुरेंद्र---- हिंदुस्थानातही तुम्ही धर्म पसरविण्यास सुरुवात केलीच आहे. परंतु इथं जे दिसतं ते तितकंसं उत्साहवर्धक नाही! तुम्ही जे इथले कमी लेखलेल्या जातीतले लोक ख्रिश्चनधर्मिय केले आहेत, त्यांच्यामधला सुद्धा जातिभेद नाहीसा झालेला दिसत नाही.

मिसेस शेपर्ड----असं कसं म्हणता तुम्ही?

सुरेंद्र----मी त्यांना भेटून त्यांच्या जीवनाचा अभ्यास केला आहे. मला तुम्ही फसवू शकणार नाही.

मिसेस शे.----महारख्रिस्ती, मराठाख्रिस्ती, मांगख्रिस्ती, ब्राह्मणख्रिस्ती असे भेदाभेद घेऊनच हे लोक तुमच्या धर्मात ही वावरताना दिसतात. धर्मांतरानंतरही ही मुळचेच भेदाभेद राहणार असतील तर धर्मांतराचा उपद्व्याप कशाला.?

मिसेस शेपर्ड----हे भेदाभेद तेच लोक मानतात त्याला आम्ही काय करावं? आणि हे भेदाभेद हळूहळू नाहीसे होणार नाहीत काय?

a

सुरेंद्र---- मला तसं वाटत नाही! जे उगमस्थानी, तेच पुढे पात्रात! जे आडातच नाही ते पोहऱ्यात कुठून येणार?

मिसेस शेपर्ड----हा ज्याच्या त्याच्या कनव्हीक्षनचा, मनोधारणेचा प्रश्न आहे.. मला हे भेदाभेद नष्ट होतीलसं वाटतं!

सुरेंद्र----आणखी एकच प्रश्न मिसेस शेपर्ड, तो मला अधिक सतावतो. हे धर्मांतर केलेले लोक ख्रिस्ती झालेले लोक अधिक कुणाला मानतील? त्यांनी कोणत्या चर्चला अधिक मानावं?

मिसेस शेपर्ड----अर्थात इंग्लंडच्या चर्चला! इतकंच नव्हे तर त्यांचा उद्धार करणारा तो इंग्लंडचा राजा, त्यांच्याशी त्यांनी सदैव राजनिष्ठ राहिले पाहिजे!

सुरेंद्र---- म्हणजे त्यांची पूजास्थान बदलली असा त्याचा अर्थ नाही का? धर्मांतराने तुम्ही त्यांची राजनिष्ठा बदलून त्यांना इंग्लंडनिष्ठ बनवित आहात!

मिसेस शेपर्ड---- मग त्यात वाईट काय आहे? आपल्याला जन्म देणाऱ्या बापाचं आम्ही नाव सांगतो ना? मग इथल्या लोकांचे धर्मांतर म्हणजे त्यांचा नवा जन्मच नाही का? आणि हा त्यांचा नवा जन्म आमचं इंग्लिश राष्ट्र घडवून आणीत आहे.

सुरेंद्र----मिसेस शेफर्ड बाई, तुम्ही अगदी सोईस्करपणे तुमच्या इंग्लंडचाच इतिहास विसरून बोलत आहात. तुमच्या इंग्लंडच्या राजानं आपल्या राष्ट्राची निष्ठा रोमकडे वळू नये म्हणून पोपची सत्ता झुगारून दिली आणि चर्च ऑफ इंग्लंड स्थापन करून स्वतःला धर्माचा प्रमुख बनविले. हा सगळा खटाटोप त्यानं का बरे केला? त्यामुळे तुमच्या इंग्लिश राष्ट्राची राष्ट्रनिष्ठा फोपावण्यास मदत झाली नाही काय?. मग तेच स्वातंत्र्य इथल्या लोकांना का ठेवीत नाही?

मिसेस शेपर्ड----तुम्ही धर्मकारणाच्या चर्चेतून मला वाटतं राजकारणाच्या चर्चेत शिरत आहात! आमचा संबंध धर्मकारणाशी आहे. मला राजकारणात शिरण्याचे प्रयोजन वाटत नाही.

सुरेंद्र----असं कसं म्हणता बाई? आपल्याला सर्वच दृष्टीने विचार करायला नको का? राजा राम मोहन रॉय यांचा मी विद्यार्थी आहे. मला सर्व दृष्टीने विचार करावाच लागेल.

मिसेस शेपर्ड ----पहा. तुम्हाला मी पुन्हा एकदा आवाहन करते. तुम्ही विचार अवश्य करा. पण ख्रिस्ती धर्म हा परमेश्वरापाशी अधिक जवळ नेणारा धर्म आहे हे लक्षात ठेवा!

सुरेंद्र----सध्या परमेश्वरापाशी अधिक जवळ जाण्याचा प्रश्न माझ्या मनात नसून माणसाला माणसापाशी अधिक जवळ कसे जाता येईल हा

प्रश्न आहे! त्याचे उत्तर नेमकं सापडेपर्यंत मी विचार करीन. प्रचलित धर्मात तसा कोणताच धर्म आढळला नाही तर एखादा नवा धर्म मला शोधून काढावा लागेल. आणि त्या धर्माचा प्रचारही करावा लागेल!

मिसेस शेपर्ड---- मी आशा करते की ख्रिस्ती धर्म व येशूच तुम्हाला अधिक श्रेष्ठ वाटतील. ही बायबलची एक प्रत असू द्या तुमच्याकडे.

सुरेंद्र----थँक्यू! मी बायबल वाचले आहे तुमचे! बरं येतो आम्ही.

मिसेस शेपर्ड----अहो पण ही एक प्रत असू द्या. तुम्हाला निश्चित मार्ग दिसेल त्या पुस्तकात! (पुस्तक हाती ठेवतेच)

सुरेंद्र---- बरं तर! येतो आम्ही. काय येणार ना नानकचंद?

नानकचंद----तुम्ही चला, मी जरा थांबतो इथं.

सुरेंद्र----अच्छा Good bye

मिसेस शेपर्ड----Good bye(सुरेंद्र जातो.)

नानक---- आपल्या हाती लागेलसा दिसत नाही हा! भारीच चिकित्सक आहे!

मिसेस शेपर्ड----पण विद्वान दिसतो. हाती लागला तर बहार होईल.

नानक----शिवाय त्याचं इथं गावातही भारी वजन आहे. त्याला पकडण्याचा मी प्रयत्न करतोच!

मिसेस शेपर्ड----हा आपल्याला मिळाला तर आपलं सारं काम सुलभ होईल!

नानक---- आहे..मी त्याच खटपटीत आहे. मी स्वतः बाप्तिस्मा घेण्याच्या वेळेपर्यंत त्याला मार्गावर निश्चित आणू शकेन असं मला वाटतं!

मिसेस शेपर्ड ----wish you Every success!

नानक ----पण एक गोष्ट करता येते का पहा! या माणसाकडे मी एकटा जाऊन काम होणार नाही. मीस स्यू जेनी जरा मज बरोबर आल्या आणि त्यांनी याला गळ घातला तर हा मासा गळाला लागेल. तसा जरा बायकांच्या पुढे ढीला माणूस आहे.

मिसेस शेपर्ड----पाहीन. मी स्यू जेनीचं मन वळवीन. त्या कार्टीनं माझ्या कामात लक्ष घातलं असतं तर किती बरं झालं असतं. तिला तिच्या डँडींची मतच अधिक आवडतात ना! ते काही नाही. या मुलीला ही मला योग्य मार्गावर आणले पाहिजे. मी करीन तिच्या मनाची तयारी आणि मग देईन पाठवून तुमच्याकडे!

नानक----आत्ताच का बोलावून विचारीत नाही तिला?

मिसेस शेपर्ड----Are you a fool नानक? ते काही एवढं सोपं काम नाही. सवडीने घेतलं पाहिजे बरं! आणि शिवाय ती आता घरी ही नाही!

नानक----Oh! I see! काही हरकत नाही स्यू जेनीची, तयारी झाली की मला कळवा. मग मी आणि ती जाईन त्याच्याकडे. May I take your leave now!

मिसेस शेपर्ड----Oh! Yes. मी प्रयत्न करीनच.

नानक----Thank you mam! Good bye! (नानक जातो)

मिसेस शेपर्ड----बाय-बाय

(थोडा वेळ जातो.मिसेस शेपर्ड काही विचारात गर्क होऊन बसतात. सर व्हीलर तेवढ्यात येतो.)

Sir Whillar----oh! excuse me Mrs. Shepard!

मिसेस शे.----(एकदम भानावर येऊन) Oh! Good morning Sir Whillar! I did not expect you today.

सर व्हीलर ----Good morning! (सर व्हीलर हा अधिक बेफिकीर आणि अरेरावी व आपल्याच सामर्थ्याच्या घमेंडीत असलेला दाखविला पाहिजे) I have come on some confidential and

important business. I want to see Mr. Shepard. Is he in?

मिसेस,शेपर्ड----Yes, he is in his library. I will send him here. Please be seated.

सर,व्हीलर----Thank you. (तो बसतो मिसेस शेपर्ड आत जाते. सर व्हीलर शिरुड काढून पेटवतो. एक दोन झुरके घेतो. तेवढ्यात मिस्टर शेपर्ड येतो. सर व्हीलर हा चांगला तगडा आणि तरणाबांड सेनाधिकारी आहे. अर्थात मि. शेफर्ड हा वृद्धावस्थेच्या उंबरठ्यावर आहे.)

मि. शेपर्ड----Sir Whillar, Good morning!

व्हीलर----Good morning Sir! How do you do?

मि.शेपर्ड----Ouite O. K. How goes the world at Kanpur?

व्हीलर----. sometimes there is storm in a teacup. Some sensational news sometimes spreads in the air and the quiet world is a bit stirred.

मि.शेपर्ड---- oh, I see

व्हीलर ---- I have come on some confidential purpose sir, would not it be dangerous to discuss it right here?

मी.शेपर्ड---- Oh!. nothing harmful! come on, fire out yourself!

व्हीलर ----I don't mind Mrs.Shepherd sitting in here. Has she purposely remained in?

मी. शेपर्ड----no, no, She will be coming up here in a moment or two. She has just gone to the kitchen room.

व्हीलर----One Jwala Prasad of this place is closely associated with you. Is not he?. I am receiving bad reports regarding him.

मी. शेपर्ड----Oh! I know him thoroughly. Moreover he is a close friend of Nanasahib. It is Nanasahib who has recommended me this Jwala Prasad as a Sanskrit Teacher. He is not a person of that type.

व्हीलर----Well, may be. But I have come to warn you against this man. (enters Mrs. Shepherd)

मिसेस शेपर्ड---- what is it, sir whillar

व्हीलर----I have reports that your Sanskrit Teacher Jwalaprasad is closely connected with reactionary movement. I smell a rat madam!

मिसेस शेपर्ड---- Right! there is something behind his outward appearance. He is not an innocent man.

मि.शेपर्ड----I don't believe it. sir Whillar.

व्हीलर----May be. We may have been wrongly informed. But one thing I want to tell you paricularly, Mr. Shepherd. Now a days we are suspecting some kind of plot being hatched against our government

मिसेस शेपर्ड---- what? sign of mutiny?

व्हीलर- ----Not exactly, We are not yet convinced about it. We have left no stone unturned to detect it, but we haven't, as yet been able to find anything. But we should be on our guard, Should not we?

मिसेस शेपर्ड ----Yes, we must be!

मि. शेपर्ड----ln what way can Jwalaprasad be connected with it?

व्हीलर----I can't tell exactly, but I have learnt, he is one of the chief traitors.

मि.. शेपर्ड----well, I don't simply believe!

व्हीलर----it is heard that they shall masacre all the while race residing in this land. Is not it horrible?

मिसेस.शेपर्ड----Oh! How horrible! So what precautions we are going to take?

व्हीलर---- I am sure that my Kanpur is safer than the rest of the cities in India. However I have ordered to construct a castle at Kanpur, where all of us can take refuge in times of danger. But that time shall never arrive. I am sure about it

मिसेस शेपर्ड----How wise of you! Would you like to have tea.

व्हीलर---- No,thank you! So I will take your leave.

मिसेस शेपर्ड----Are you in such a hurry?

a

व्हीलर---- please excuse, I have got a lot of work madam. I had dropped in here in order to give you an idea of what may pass under our feet. Be on your watch. See whether you can draw anything out of Jwala Prasad.

मि..शेपर्ड----I will try my best to do that. He ought to have come here by now. I don't know how he is late today.

व्हीलर--Well then. I take your leave. (They shake hands) Bye Bye (Whillar goes)

मिसेस शेपर्ड----Oh! this bloody fool,! He must be connected with some such horrible thing. I will see that he gives out the truth today.

मि.. शेपर्ड----Mind your kitchen and needlework Dorothy, I will manage that.

मिसेस शेपर्ड----Oh! How dare you say that.

मिस्टर शेफर्ड---- It's no use arguing right now. Do as I bid you. I will call you and ask your help if need be. But I don't think I shall ever require help.

a

मिसेस शेपर्ड----You will never take me into confidence. You have been such a bad husband Daniel!

मिस्टर शेपर्ड----It's no use repenting for that in such an old age, Dorothy. It's no use crying over spoilt milk. Let me have my own way.

मिसेस शेपर्ड---- Go to hell with your ways. Your own ways, even if you would go to destruction. (She Goes angrily)

मिस्टर शेपर्ड---- (स्वतःची प्रक्क्षुब्धावस्था अत्यंत संयमाने आवरतो. एक दोन मिनिटात शांत होतो. काय करावे ते न सुचल्यामुळे उगीचच इकडची पुस्तके तिकडे करतो आणि अखेर पाईपचे झुरके घेत कोचमध्ये विसावतो. तेवढ्यात ज्वालाप्रसाद प्रवेश करतो.)

ज्वालाप्रसाद ----नमस्ते शेपर्ड साहेब.

मिस्टर शेपर्ड----नमस्ते गुरुजी.

ज्वालाप्रसाद ----आज एकटेच बाहेर बसला आहात? आणि विचारात गढून गेलेले दिसता, पण कसल्या?

मिस्टर शेफर्ड ----(उपरोधिक स्वरात) जगण्या-मरण्याचा विचार चालला आहे गुरुजी!

a

ज्वालाप्रसाद ----भगवत गीतेमध्ये त्यावर अनुपम विचार सांगितला आहे.

मिस्टर शेपर्ड----मला ठाऊक आहे तो आणि पाठही आहे.

***वासासि जीर्णानी यथा विहाय***
***नवानि गुह्यति नरोऽपराणी!***
***तथा शरीराणि विहाय जीर्णान्य***
***न्याति संयाति नवानी देही!***

पुढचे ही श्लोक पाठ आहेत म्हणून दाखवू?

ज्वालप्रसाद----आज काही पाठांतराची परीक्षा नाही ना?

मिस्टर शेपर्ड ----पाठांतराची नसेल पण तुमची परीक्षा घ्यायची आहे!

ज्वालाप्रसाद----माझी परीक्षा! वा! आनंद आहे! शिष्यादिच्छेद पराजयम! जर माझी परीक्षा घेण्याइतकी तुम्ही प्रगती केली तर मला आनंद का वाटणार नाही? पण आजचसा हा विचार आला?

मिस्टर शेपर्ड ----सांगितलं ना! जीवनमरणाचा प्रश्न आहे म्हणून! स्वतःच्या जीवावर बेतलं की सारं तत्वज्ञान लंगड पडतं! तत्वज्ञान हा डॉक्टर सारखा आहे! इतरांना तत्वज्ञान पढविणं सुनावणं फार सोपं. पण स्वतःच्या घरीच कुणी अत्यवस्थ झालं की डॉक्टर जसा चलबिचल होतो तसाच तत्त्वज्ञही स्वत:वर बेतलं की लडबडतो.

ज्वालाप्रसाद ----आज काही निराळे शेपर्ड साहेब बोलत आहेत असं दिसतं मला! आणि त्या बोलण्यालाही ना शेंडा ना बुडखा!

मिस्टर शेपर्ड ---शेंडी आणि पारंबी तुटण्याच्या गोष्टी मी बोलतो आहे. त्या बोलण्याला शेंडा बुडखा सगळं आहे!

ज्वालाप्रसाद----अस्स?आपला पराभव कबूल आहे मला. आपण बुवा हरलो आहोत! तुमच्या परीक्षेत नापास!

मि.शेपर्ड ----खरी परीक्षा तर पुढेच आहे गुरुजी! आता कुठे नमन झालं आहे! एवढ्यात भरतवाक्य म्हणू नका!

ज्वालाप्रसाद ----(हसून)अरेच्या! आज माझी दमछाकच होत आहे! ते काही नाही. आता सरळ सरळ सुरुवात करा पाहू! पण चला! आपण आज तुमच्या वाचनालयातच बसू! माझा फजितवाडाच होणार असेल तर तो अगदी उघड्यावर तरी नको!

मिस्टर शेपर्ड ----आता आतलं, उघड्यावरचं असं काही आज ठेवायचं नाही ज्वालाप्रसाद! तेव्हा आपण आहोत इथं ते ठिक आहोत. अगदीच काही out of place नाही.

ज्वालाप्रसाद ----आजवर तरी काय आतलं बाहेरचं होतं मिस्टर शेपर्ड साहेब?

a

मिस्टर शेपर्ड ----(शोधक दृष्टीने)तेच आता मला विचारायचं आहे तुम्हाला? कसा अगदी नेमका प्रश्नालाच हात घातला पण!

ज्वालाप्रसाद----अरे वा! असं ही आहे का? चला तर! तिळा दार उघड!

मिस्टर शेपर्ड----(डोळ्याला डोळे भिडवून) दार उघडलं! ही पहा आतील गुहा ज्वालाप्रसाद! तुम्ही आता आत आला आहात. इथं आम्हाला इंग्रजांच्या प्राणाचे,आमच्या राज्याचे मोठे मोठे अलंकार अगदी खच्चून भरलेले आहेत! तुमचे डोळे दिपून गेले आहेत! या इंग्रजाचा प्राण घेऊ का त्या इंग्रजाचा प्राण घेऊ असं तुम्हाला होऊन गेलं आहे! अलिबाबाप्रमाणे तुम्ही आधाशासारखे आपली पोतडी भरण्याचा विचार करीत आहात! इंग्रजी सत्तेच्या राजयंत्राचं अमोलिक जडजवाहीर तुम्हाला हिरावून न्यायचे आहे. तुम्ही आता एकेक रत्नाला नव्हे इथल्या संबंध राशीला हात घालण्याच्या तयारीत आहात! काय खरं आहे हे? उत्तर झटपट हवं!

ज्वालाप्रसाद---- (निश्चयात्मक सुरात आणि उग्रमुद्रेने) काय तुमची भूमिका अस्सल परीक्षकाचीच आहे?

मिस्टर शेपर्ड ----परीक्षेचा विद्यार्थी असला विचार करून उत्तर देत नसतो! त्याला परीक्षेत पास होण्याकरिता अचूक उत्तर देण्यापलिकडे दुसरा कर्तव्य नसतं! उत्तर झटपट हवं! मी म्हणालो ती गोष्ट खरी आहे काय?

a

ज्वालाप्रसाद----(एकदम उठून कठोरपणे) होय अगदी खरी आहे!

मि.शेपर्ड----(ऊठून पाठीवर हाताने थोपटीत) शाब्बास! परीक्षेत शंभर टक्के पास! तुम्ही मैत्री करण्याला योग्य गृहस्थ आहात!

ज्वालाप्रसाद ----(एकदम गोंधळून)काय, माझा तुम्हाला तिरस्कार वाटत नाही? मला इथल्या इथं पकडून न्याव अस वाटत नाही? निदान गोळी घालून ठार करावसं वाटत नाही?

मिस्टर शेपर्ड----(खिन्नपणे हसून) ही परीक्षा होती ज्वालाप्रसाद! परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करायचा असतो. त्याच्या भावी विद्याभ्यासाविषयी अभिष्टचिंतन करायचं असतं! मी तुमच्या कार्यात तुम्हाला सुयश इच्छितो. तुम्ही आता जावयाला हरकत नाही. तुम्ही आजचा दिवस मावळेपर्यंत माझे मित्र राहाल. उद्यापासून मी तुमचा शत्रू नसलो तरी मित्रही नाही! जा तुम्ही आता!

ज्वालाप्रसाद----(एकदम कातर स्वरात) तुमच्या औदार्याची कमाल झाली मि. शेफर्ड साहेब! आज पर्यंत तुमच्या इथली अनेक गुप्त खलबते मी ऐकली आहेत. मी खरोखर आलिबाबाप्रमाणे अमाप धन इथं लुटलं आहे! तरीही तुम्ही मला इथून सहीसलामत जाऊ देता म्हणजे धन्य आहे तुमची! मी आणखी एक विचारू का?

a

मिस्टर शेपर्ड----(कोरडेपणाने) आज एक दिवस तुम्हाला कोणताही गोंधळ घालावयाला इथं मुभा आहे! मी तुम्हाला तसं वचन देऊन चुकलो आहे!

ज्वालाप्रसाद---- तुम्ही रक्तान आणि हाडान जरी इंग्रज, ख्रिस्ती असलात तरी अंतःकरणानं आणि बुद्धीने अगदी हिंदू बनलेले आहात! इथल्या हिंदू धर्मानं तुम्हाला वेड लावले आहे! इथल्या लोकांच्या बद्दल तुमच्या अंतकरणात प्रेमाची शुद्ध पवित्र गंगामाई वहात आहे! काय तुम्ही आम्हाला आमच्या कार्यात सहाय्य कराल? एक हिंदू म्हणून आमचं नेतृत्व कराल?

मिस्टर शेपर्ड----सांगितलं ना! तत्वज्ञान हे व्यवहारात लंगड पडतं! माझ्या रक्तावर आणि हाडावर उलटत असताना माझं तत्वज्ञान जाग्यावर कसं राहू शकेल? किती भयंकर गोष्ट करण्यास सांगत आहात याची काही तुम्हाला कल्पना आहे?

ज्वालाप्रसाद----पण ही गुहा काही सज्जनांनी निढळाचा घाम ढाळून भरून ठेवलेली नाही! ती चाळीस चोरांनी आमच्या पासूनच जडजवाहिर अपहरण करून भरून ठेवलेली आहे! हे चौर्यकर्म तुम्हाला पसंत आहे? काय ती भयंकर गोष्ट नाही?

मि.. शेफर्ड ----एकूण मी समजत होतो तसे एक सोवळे संस्कृत शास्त्री पंडितच केवळ नाही तुम्ही! या सुकोमल आणि नादमधुर अशा

संस्कृत शब्द पंडित्याखाली प्रचंड क्रांतीची धगधगती तोफ पेट घेत आहे तर!

ज्वालाप्रसाद---- पण माझ्या प्रश्नाचं काय?

मिस्टर शेपर्ड----भल्या गृहस्था आता जास्त ताणू नको! मी हाडाचा आणि मासाचा इंग्रज आहे! माझं राष्ट्र मला स्वर्गाहून प्रिय आहे! इंग्रज हा राष्ट्रकाजाच्या प्रसंगी आपल्या राष्ट्रावरून स्वर्गाचं साम्राज्यही ओवाळून टाकण्यास तात्काळ सिद्ध होतो हे कदापिही विसरू नकोस! आणि असं आहे म्हणूनच इंग्रजांच्या राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नाही! फुकट झालेली नाही ही गोष्ट! समजलं?

ज्वालाप्रसाद---- समजलं! एका क्षणात समजलं!राष्ट्रवादापुढे तुमचा उदारमतवाद, तुमचं हिंदू अंत:करण, तुमचं परमतसहिष्णू मन, एका क्षणात गोठून जातं हे चांगलं समजलं!

मिस्टर शेपर्ड----आणखी काय हवे आहे या अलीबाबाला?

ज्वालाप्रसाद----आता जास्त काही नको! तुमच्या पासून मी खूप हिरावून नेलं आहे! फक्त एकासाठी जीव तळमळतो आहे. स्यू जेनी-संजीवनीची मला भेट मिळू शकेल काय?

मिस्टर शेपर्ड----तिची भेट? किंबहुना तिलाच तू आता विसर! राष्ट्रावरून ती तुलाही ओवाळून टाकीला यात मला संशय वाटत नाही! त्या

a

रत्नाचा मोह आता वेळीच सोडून दे! नाहीतर चाळीस चोरांच्या हाती लागायला तुला वेळ लागणार नाही!

ज्वालाप्रसाद----नाही मी या तुमच्या म्हणण्यावर विश्वास ठेवायला तयार नाही. तिच्या अंत:करणाची मला स्पष्ट कल्पना आहे! ती मजबरोबर कोणत्याही परिस्थितीत राहील असे मला वाटते!

मिस्टर शेपर्ड ----तुमच्या या निश्चिती बरोबर मला आनंदच वाटतो. पण त्या निश्चितीचा पडताळा निदान तुम्ही आज आणि इथं पाहू नये, असं मला वाटतं. आता इथं कोणता प्रक्षोभ होईल याची निश्चिती नाही! कदाचित मी ही माझा प्रक्षोभ अत्यंत संयमाने आवरून धरलेला आहे. त्याचाही भडका उडेल आणि ते तुमच्या कार्याचा इथेच नाश करणारा ठरेल! अजून यातलं अवाक्षर देखील माझ्या बायकोला ठाऊक नाही. ती इथं केव्हा येईल याचा नियम नाही. तेव्हा तुम्ही आता ताबडतोब जावं असं मला वाटतं! मी तुमच्या बरोबर झालेल्या या बोलण्याचा स्वतःहून कधीच कुठेच उच्चार करणार नाही. याची हमी देतो. तुमच्या कार्यात तुम्हाला यश येवो अशी पुन्हा एकदा सदिच्छा व्यक्त करतो. परंतु लक्षात ठेवा, जेव्हा तुम्ही प्रत्यक्ष समरांगणावर उभे ठाकाल आणि कर्मधर्मसंयोगाने या वृद्धाच्या समोर उभे ठाकाल तेव्हा मात्र माझ्या हातातील पिस्तुलाकडून तुमची गय केली जाणार नाही. अच्छा नमस्ते!

a

ज्वालाप्रसाद----नमस्ते म्हणण्यापूर्वी एकच गोष्ट सांगतो. यदाकदाचित तुम्ही संकटात पडून तुमच्या जीवावर बेतण्याचा प्रसंग आला आणि माझ्या नावाचा उच्चार करून जर तुम्हाला जीवानिशी वाचता आलं तर तुम्ही माझ्या नावाचा जरुर वापर करावा. माझी शपथ आहे तुम्हाला!

मिस्टर शेपर्ड----(चिडून क्रोधाने) काय तुम्ही मला डरपोक समजता? तुमच्या नावाचा उपयोग? Only cowards can think of it! तुम्ही आता अधिक न बोलता येथून काळ करा! माझ्या अंत:करणाचा दाह होतो आहे! जा! चला! उठा! जा!

ज्वालाप्रसाद----अच्छा तर! नमस्ते!(जातो)

मिसेस शेपर्ड----(घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करते. मिस स्यू जेनी ही तिच्या मागोमाग येते. तीही घाबरलेली आहे.) काय झालं डॅनियल? का ओरडलास एवढा? आणि ज्वालाप्रसाद कुठे आहे?

मिस शेपर्ड---- काय झालं डॅडी?

मिस्टर शेपर्ड---- एक भिकारी आला होता. म्हंटलं आज-काल कोण कसलं सोंग घेऊन येईल याचा नियम नाही. नुकतच सर व्हीलरनं सावध राहण्यासंबंधी सूचना दिली नव्हती का? तेव्हा म्हटलं हा

भिकारी भिकारीच असेल कशावरून? त्याला ताबडतोब हाकलून काढला झालं! तूच सांग!

मिसेस शेपर्ड----इतका काही गाजर पारखी होऊ नकोस डॅनियल! तो खराच भिकारी होता असेल तर!

मिस्टर शेपर्ड----खरा खोटा ओळखावा कसं? आणि उगीच धोका तरी का पत्करा? आणि खरा असता तर काय केलं असतंस?

मिसेस शेपर्ड---- का? त्याला ख्रिस्ती करण्याची खटपट केली असती मी! Oh! माझी एक संधी दवडलीस तू!

मिस स्यू----पुरे मम्मी! ज्याला त्याला तू आपली ख्रिस्ती करायला निघाली आहेस! जगू दे ना ज्याला त्याला त्याच्या धर्मात!

मिसेस शेपर्ड----किती सिली आहेस तू जेनी! अग, या जगाचा उद्धार करायला नको का? त्या ज्वालाप्रसादकडे जरा तू लक्ष दे ना! विचार त्याला बाप्तिस्म्याविषयी एकदा! मला तो मुळीच दाद देत नाही! बघ तुला तरी तो दाद देतो का? तुझी मोहिनी आहे त्याच्यावर! तुझं ऐकेल तो!

स्यू जेनी---- माझी मोहिनी त्याच्यावर? त्याचीच मोहिनी माझ्यावर पडलेली आहे मम्मी! I love him!

मिसेस शेपर्ड---- मग तर फारच उत्तम! त्याला कन्व्हर्ट कर ना!

a

मिस्टर शेपर्ड----_तिच्याकडून अशी अपेक्षा करतेस डोरोथी तू?

मिसेस शेपर्ड----का बरं? का करू नये?

मिस्टर शेपर्ड----स्त्री ही पुरुषाला शरण जाते! पुरुष स्त्रीला नाही.

मिसेस शेपर्ड----मग मी तुला शरण गेली नाही ती?

मिस्टर शेपर्ड----(हसून) पण ते लग्न झाल्यानंतर! लग्नापूर्वी तू नरमच होतीस माझ्यापुढे!

मिसेस शेपर्ड----You naughty boy!

स्यू जेनी----आणि असं पहा मम्मी, प्रेमात सापडलेल्या मुलीला प्रेमावेगळा धर्मच नसतो. फारच झालं तर, प्रियकराचा जो धर्म तोच तिचा धर्म!

मिसेस शेपर्ड----Nonesense! म्हणजे तू ज्वालाप्रसाद मागे लागून हिंदू होणार आहेस का?

स्यू जेनी---- त्याची तशी इच्छा असेल तर!

मिसेस शेपर्ड----Absurd! त्याला तू ख्रिश्चन केलं पाहिजेस! माझी मुलगी आहेस तू! विसरु नकोस!

मिस्टर शेपर्ड----माझी ही मुलगी आहे ती डोरोथी! त्यात ॲबसर्ड काय आहे? हिंदूच हो तू जेनी!

a

मिसेस शेपर्ड---- वाटलंच मला! तू अजून कसा बोलत नाहीस. याचंच मला आश्चर्य वाटत होतं! बरोबर माझ्या उलट बाजू तुझी! जणू काही उलट बाजू घेतली नाहीस तर तुला माझा नवरा म्हणणार नाहीत! म्हणे, हिंदूच हो तू! मी विचारते, तूच का ज्वालाप्रसादला ख्रिश्चन होण्याचा आग्रह धरीत नाहीस?

स्यू जेनी ----Dady will be the last person to do that mamy!

मिसेस शेपर्ड----Don't spoke your dirty nose in the middle Janny!

स्यू जेनी----Mumy! Don't call my nose dirty. l have it from you. remember! मी तुझीच मुलगी आहे ना!

मिसेस शेपर्ड----थांबा तुम्ही तसं ऐकणार नाही! मीच त्या ज्वालाप्रसादशी एक दोन हात करते! कुठे आहे तो?

मिस्टर शेपर्ड ----तो तर केव्हाच गेला!

मिसेस शेपर्ड---- हाय हाय! गेला? कुठे?

मिस्टर शेफर्ड ----ते काही मला सांगून गेला नाही तो!

a

मिस जेनी---- आणि मला का तो आल्याचं कळवलं नाही डॅडी? मी त्याचीच वाट पाहत आहे. म्हटलं, तुमचं संस्कृत संपू दे. मग तो मजकडे येईल!

मिसेस शेपर्ड----(एकदम आठवल्यासारखं करून) अरे पण त्याला सर व्हीलरनं सांगितलेलं विचारायचं होतं नाही? विचारलंस का त्याला?

मिस्टर शेफर्ड---- हो विचारलं!

स्यू जेनी----काय ते डॅडी?

मिस्टर शेपर्ड----Nothing.तुझ्याशी काही संबंध नाही त्याचा मुली!

मिसेस शेपर्ड---- मग काय म्हणाला तो?

मिस्टर शेफर्ड----Nothing.

स्यू जेनी ----डॅडी नथिंग शब्दाव्यतिरिक्त तुमच्या कोशात दुसरा शब्द नाही काय?

मिसेस शेपर्ड----You ediot! Would not you tell me?

मिस्टर शेपर्ड----तुला ऐकायचे आहे का? त्याचा कोणत्याच तसल्या गोष्टीशी संबंध नाही. इंग्रजांविरुद्ध काही शिजत आहे, हे त्याला

प्रथमच कळलं आणि ते ही आमच्याच तोंडून! मग आमच्या विषयी चिंता वाटून उलट म्हणाला काय ठाऊक आहे?

मिसेस शेफर्ड ----काय?

मिस्टर शेपर्ड ----जर आम्ही काही संकटात पडून आमच्या जीवावर बेतण्याचा प्रसंग आला आणि त्याच्या नावाचा उच्चार करून संकट दूर होईल असं वाटलं तर आम्ही त्याच्या नावाचा उपयोग करावा म्हणे! तू करशील त्याच्या नावाचा उपयोग,?

मिसेस शेपर्ड----छे! कदापि नाही. त्या राजद्रोहाच्या नावाचा उपयोग? त्रिवार अशक्य! पण खराच का काही धोका आहे? या ज्वालाप्रसादचा काहीही संबंध नाही हे खरं का?

मिस्टर शेपर्ड ----छे! तसं काही नाही! त्यांनी उलट मी प्रत्यक्ष तुमचं संरक्षण करीन असं सांगितलं! मी नसलो तर माझ्या नावाचा ही उपयोग करा असं तो म्हणाला!

मिसेस शेपर्ड----ह्यॅ! हा संस्कृतपंडीत आमचं काय संरक्षण करणार आहे?

स्यू जेनी----हा असं बोलू नकोस हां मम्मी! मला त्याचा फार मोठा आधार वाटतो! मोठा शूर आहे माझा प्रसाद! मी तर त्याचच नाव लावणार आहे! थांबा, आता उद्या तो इकडे आला की मी त्याला स्पष्ट सांगून टाकते!

a

मिस्टर शेपर्ड----आता तो इथे कधीच येणार नाही!

स्यू जेनी----म्हणजे! म्हणता काय डॅडी तुम्ही?

मिस्टर शेपर्ड----त्याला मी इथे येण्याची बंदी केली आहे!

मिसेस शेपर्ड----आणि तुमचं संस्कृत शिक्षण?

मिस्टर शेपर्ड---- ते मी आता सोडून दिल आहे!

मिसेस शेपर्ड---- किती चांगले आहात तुम्ही!

स्यू जेनी----अखेर तुम्ही सुद्धा माझ्या आड येत आहात ना डॅडी! ते काही नाही. तो जर इथे येणार नसेल तर मी त्याच्याकडे जाईन!

मिस्टर शेपर्ड----नाही जेनी, तुला जाता येणार नाही!

मिसेस शेपर्ड---- मी तुला जाऊ देणार नाही! अशी धरून ठेवीन.

स्यू जेनी----सोड मला! मी जाणार! (रडकुंडीला येऊन) सोड ना!

मिसेस शेपर्ड----(रागाने)No,No मी तुला जाऊ देणार नाही!

(स्यू जेनी स्पुंदू लागते सोडवून घेण्याचा प्रयत्न करू लागते)

पडदा

---

# अंक२. प्रवेश. २रा---+

(ज्वाला प्रसाद एका झाडाच्या बुंध्याशी विचारमग्न स्थितीत उभा आहे)

स्यू जेनी ----(प्रवेश करून)डॉन ज्यूऑन!

ज्वाला ----(मागे वळून पहात) कशाला आलीस तू संजीवनी?

स्यू जेनी----बाई, हा काय प्रश्न?

ज्वाला----आपल्या प्रेमावर समाधी बांधली हे सांगायला का तू इथे आलीस?

स्यू जेनी ----तुझ्या मागून इथवर धावत आले ती काय हेच सांगायला आले? का अंत पाहतात तुम्ही सारे माझा? तिकडे डॅडी-मम्मी काही सांगत नाहीत! फक्त मला अडवून धरू पहात होते. त्यांच्या विरोधाला धाब्यावर बसवून ही मी तुझ्या मागुन धावत आले. तो तू असे जिव्हारी घाव घालतोस! किती निर्दयी आहात रे तुम्ही सारे लोक?

ज्वाला----तुला काही सांगितलं नाही तुझ्या डॅडींनी संजीवनी?

स्यू जेनी----नाही रे! काही सुद्धा नाही.

ज्वाला ----मग तू का आलीस?

स्यू जेनी ----तिथं जे कळलं नाही ते तुला विचारायला! तुला घरी यायला डॅडींनी बंदी केली एवढं कळलं! पण का? कशासाठी ही शिक्षा तुला? विशेषता मला? मला हे सहन होत नाही रे! ही मलाच शिक्षा वाटते!

ज्वाला---- आम्ही स्वतंत्र राष्ट्र व्हावं असं तुला नाही वाटत?

स्यू जेनी ----का नाही वाटणार? मी इंग्रज रक्ताची स्त्री आहे हे विसरू नकोस! इंग्रज रक्ताचा माणूस हा स्वातंत्र्याचा ज्वलंत उपासक असतो!

ज्वाला ----ते ठीक आहे ग! पण हे स्वातंत्र्य आम्ही इंग्रजांविरुद्ध लढून मिळवणार आहोत हे विसरू नकोस! इंग्रजांविरुद्ध म्हणजे पर्यायाने तुझ्या विरुद्ध ही!

जेनी ----माझ्या विरुद्ध नाही! कारण तू नि मी आता विरुद्ध नाही! तुझ्या बरोबर मीही तुझ्या म्हणजे माझ्याच स्वातंत्र्यासाठी लढेन!

ज्वाला---- नेमकं हेच तुझ्या डॅडींना आवडलं नाही. त्यांनी, मी स्वातंत्र्यवादी आहे म्हणून मला आपलं घर बंद केलं! तुला नाही माझा तिटकारा वाटत?

जेनी ----तिटकारा? आम्ही इंग्रज लोक मोठे स्वातंत्र्यप्रेमी आहोत! उलट तू स्वातंत्र्यप्रेमी आहेस हे ऐकून माझं तुझ्यावरच प्रेम दुणावलं आहे. तू काय करणार आहेस?

ज्वाला---- संजीवनी माझ्यावर विश्वास ठेव! मी काही वाईट कृत्य करणार नाही. पण तपशिलात शिरून नकोस!

जेनी----असं रे काय?

ज्वाला---- मला तू दुष्ट समज. पण अधिक विचारू नकोस. मी दुष्ट आहे संजीवनी. मी तुझ्या पेक्षा स्वातंत्र्यावर अधिक प्रेम करतो. वाईट वाटेल तुला --

स्यू जेनी----हे ऐकून जीला वाईट वाटेल ती मी नव्हे! तू ध्येयवादी आहेस. हे कळून आल्यामुळेच मी तुझ्यावर प्रेम करून लागले डॉन! तू माझ्यापेक्षा स्वातंत्र्यावर अधिक प्रेम करतोस हे ऐकून मला आनंदच झाला!

ज्वाला----मग हे अश्रू?

जेनी ----कुठे आहेत?हे? आनंदाचे अश्रू आहेत हे! पण हेही तुला पाहावत नसतील तर हे पहा पुसून टाकते! पण खरंच का तू येणार नाहीस घरी?

a

ज्वाला ----मी खूपच विचार केला देवी! इथं या झाडाशी उभा राहून मी त्याचाच विचार करीत होतो. अखेर मी निर्णय घेतला. तुझ्या घरी काय, पण तुझी ही भेट आता अखेरचे ध्येय साध्य झाल्याशिवाय होईल असं वाटत नाही.

स्यू जेनी---- नको रे, इतका कठोर होऊ नकोस!

ज्वाला----संजीवनी मोठी समजूतदार आहेस. तुला माझा निर्णय विचारांती पटेल. विचार कर. मी कुठेही असलो तरी तुझाच आहे विसरू नकोस.

स्यू---- डॉन!

ज्वाला ----ऐक, फक्त एकाच माणसापासून सावध राहा--.नानकचंद. त्याच्या पासून तुला आणि मलाही धोका आहे.

स्यू---- मी इंग्रज स्त्री आहे डॉन! तुमच्या आर्य स्त्री पैकी नव्हे. मी सबला आहे. मला पुरुषाच्या मदती वाचूनही संरक्षण करून घेता येतं. नानकचंदासारख्या नेभळटापासून संरक्षण करून घेणे तर फारच सोपे आहे. नानकचंदासारख्या नीच माणसाला मी मुळीच घाबरत नाही. मी स्वतंत्र राष्ट्राची कन्या आहे. (पिस्तूल दाखवून)पाहिलंस! हे आमच्या संरक्षणासाठी सिद्ध असतं!

a

. ज्वाला----तुझ्या शीला संबंधी मी बोललो नाही संजीवनी! 'तुझे शील तुझ्या हाती सुरक्षित आहे हे मी जाणतो. शिवाय नानकचंदात तेवढंही धैर्य नाही हे ही मला ठाऊक आहे. प्रश्न आहे तो त्याच्या फंदफितुरीचा. आमच्या उद्योगाची चुकून देखील वाचता तुझ्या किंवा माझ्या तोंडून त्याच्यासमोर किंवा कुठेही होऊन उपयोगी नाही हे लक्षात ठेव.

स्यू---- त्याबद्दल तू निर्धास्त रहा. मीच तर तुला त्याच्या त्या हीन उद्योगाची कल्पना दिली आहे.

ज्वाला ----बरं तर, जा तू आता परत!

स्यू----मग पुन्हा तुझी भेट?

ज्वाला ----ते काही सांगता येत नाही.?

स्यू---- नको रे असा निष्ठूर होऊस!

(डोळे पाणावतात)

ज्वाला ----वेडी नाहीतर! पूस ते डोळे! विश्वास बाळग की आपली भेट आता लवकरच होईल. दोन चार महिन्याच्या अवधीनंतर आपण भेटू आणि तेही जन्माचे एकत्र येण्यासाठी भेटू असा मला भरवसा वाटतो. पूस ते अश्रू. चल तुला मी त्या रस्त्याच्या वळणा पर्यंत सोबत करतो.

a

(खिन्नपणे चालू लागते तिचा हात हातात धरून ज्वालाप्रसाद तिला सोबत करीत निघून जातो)

पडदा

दुसरा अंक समाप्त

# अंक---३ --प्रवेश----१ला

स्थळ---- पहिल्या अंकातील नानासाहेब पेशव्यांचे दालन. --काळ 20 मे १८५७ वेळ ----सकाळची. पडदा वर जातो. आणि

दालनामध्ये नानासाहेब उत्तर हिंदुस्तानचा नकाशा (भिंतीवर लटकवलेला)अभ्यासिण्यात अगदी गर्क आहेत. काही ठोकताळे मनाशी बसवून ते अझीमुल्ला येण्याची वाट पाहत आहेत. मध्येच ते अस्वस्थपणे येरझार सुरू करताहेत. मधेच ते नकाशा समोर थांबताहेत. त्यांच्या प्रत्येक हालचालीत काहीशी अनिश्चितता, अधिरता व्यक्त होत आहे. घेतलेला निर्णय हा बरोबर की चूक हे त्यांच्या मनाला अजून निश्चितपणे ठरविता आलेले नाही.

आझीमुल्ला---- (प्रवेश करतो. नानासाहेब यावेळी नकाशात अगदी एकाग्र झालेले असतात. त्यांना उद्देशून). मी आलो आहे श्रीमंत. !

नानासाहेब----आम्ही तुझ्या येण्याचीच प्रतीक्षा करीत आहोत.

अझीमुल्ला---- त्या नकाशात इतकं काय पाहता सरकार?

नानासाहेब---- आमच्या प्राणाचं या नकाशात आम्ही अवलोकन करीत आहोत. या नकाशात आमचे, आमच्या क्रांतीचे, आमच्या यशाचे आणि आमच्या स्वातंत्र्याचे प्राण साठून राहिलेले आहेत.

अझीमुल्ला----ते प्राण आपल्या स्वाधीन होण्याची वेळ आता फार दूर नाही श्रीमंत!

नानासाहेब----धीर देण्यासाठी हे तुझे शब्द ठीक आहेत अझीम! परंतु त्याची निश्चिती मनावर ठसत नाही!

अझीम----काय या नकाशाचा रंग व रूपरेषा बदलणार नाही असं आपल्याला वाटतं?

नानासाहेब----नाही तसही निश्चितपणे वाटत नाही! तितकी निराशा मनाला अजून तरी स्पर्श करू शकली नाही! अजून उदंड आशा आहे!

अझीमुल्ला---- मग मध्येच अशी निराशा डोकावण्याचं कारण?

नानासाहेब----कारण तुला ठाऊक आहे! ३१ मे हा आपला सार्वत्रिक उठावाचा दिवस ठरलेला होता. तो दिवस उगवायला आजचा दिवस धरून १२ दिवस आहेत. आज २० मे चा दिवस आणि इकडे मिरतला तर गेल्या १० मे लाच अचानक उठावणी झालेली आहे

a

अझीम----या सर्व परिस्थितीचा विचार आपण, आपणाला ती बातमी १५ मे ला कळाली तेव्हाच बैठक भरवून केलेला आहे ना?

नानासाहेब ----हो, आणि त्या बैठकीत आपण ठरलेल्या ३१ मे या दिवसाची आपण वाट पहायचीच असा आम्ही निर्णय घेतलेला खरा आहे.

अझीम---- मग आज पुन्हा त्याचाचसा विचार?

नानासाहेब----मिरतच्या आकस्मित उठावणीच्या बातमीनंतर आपण तिकडे आपला खास दूत सविस्तर बातमी आणण्याकरिता पाठविला होता. आणि त्याच्याकडून आलेलं हे वार्तापत्र. वाच.

. अझीम----(वार्तापत्र उलगडून) सैन्यातील क्रांतीच्या हालचालींचा वास गोऱ्या अधिकाऱ्यांना येऊ लागलाच होता. त्यात कितपत तथ्य आहे हे आजमावण्यासाठी त्यांनी ६ मे ला एका घोडदळातील सर्व सैनिकांवर गाईच्या व डुकराच्या चरबीने माखलेली काडतुसे लादण्याचा प्रयोग करून पाहिला. काडतुसांना कोणीही स्पर्श केला नाही. तेव्हा ९ मे रोजी या सैनिक घोडदळ तुकडीला इतर सर्व हिंदी तुकड्यांच्या समोर १०/१० वर्षांच्या बंदीची कडक शिक्षा देण्यात आली.

बघणारे हिंदी सैन्य मनातून पेटले होते. पण ते संयम पाळून स्वस्थ राहिले. संध्याकाळी मिरतच्या बाजारात हे हिंदी सैन्य सहज फिरत असताना तेथील बाजारातील स्त्रियांकडून त्यांची छी: तू : झाली! आहाहा! तुमचे बांधव तिकडे तुरुंगात सडत आहेत आणि इकडे तुम्ही माशा मारत भटकत आहात! थू: थू:! फुकट जगला रे, तुम्ही फुकट! असे उद्गार तिथल्या स्त्रियांनी त्यांच्या तोंडावर काढले. याचाच परिणाम म्हणून सैनिक अधिक भडकले. आणि १० मे चा रविवार साधून चर्चमध्ये इंग्रज लोक प्रार्थना करावयास गेले असता, मिरत भडकून उठले. क्रांतीच्या ज्वाला आकाशाला जाऊन भिडल्या. इंग्रजांची दाणादाण उडाली. त्यांची सरसहा कत्तल झाली. ती त्यांची चर्चमधली अखेरची प्रार्थना ठरली.आणि पुढे १० मे ला रात्री या सैन्याने, "चलो दिल्ली". ची गर्जना घुमवून दिल्लीची वाट धरली.

नानासाहेब---- काय वाटले हे बातमी पत्र वाचून तुला?

अझीम----वाटणार काय? बाहू स्फुरण पावू लागले आहेत! आपलेही स्फूरण पावले असतीलच!

नाना----स्फुरण पावतील यात शंका नाही. पण ती बातमी लगेच विमनस्क करणारी नाही वाटली तुला?

अझीम----नाही. तशी का वाटावी?

नाना---- क्रांतीन तिथं घोडचूक केलेली आहे, असं नाही वाटत तुला?

अझीम----चूक केली असेल! पण घोडचूक कशी?

नाना----क्रांतीच्या प्रवर्तकांनी बाजारातील स्त्रियांच्या त्या बोलांनी आपली शांती ढळू देणे हे क्रांतीला कितपत पोषक आहे? ठरविलेल्या दिवसाआधी भडकून उठण्याला ते काय पुरेसं कारण आहे?

अझीम----पण श्रीमंत बोलून-चालून ही क्रांती आहे. ठराविक नियमानी आणि वेळ काळानी का क्रांतीचे नियमन होत असते? काहीएक स्थूल तत्त्वाने क्रांतीचे नियमन होत असते, इतकेच! पण केव्हा केव्हा अगदी नवीन आणि अनपेक्षित अशा गोष्टींची भर पडत असते. अशापैकीच मिरतची उठावणी मानायला नको का?

नाना---- ते ठीक आहे. पण त्यामुळेच क्रांतीच्या अंतिम यशामध्येही अनिश्चितता निर्माण होते, हे आमचे म्हणणे काही चूकीचे ठरत नाही!

अझीम----क्रांती हा एक विलक्षण पक्षी आहे पेशवे! आपल्या निश्चितच स्थळी पोहोचण्यापूर्वी तो अशा स्वैर भराऱ्या मारीत असतानाच त्याच्या पंखावर आरुढ होण्यात व आपले आसन स्थिर करण्यातच खरे कौशल्य असते. त्याच्या मोकाट उड्डाणाच्या वेळी या

पक्षाच्या पाठीवर आपले आसन स्थिर करण्यालाच यश माळ घालते!

नाना----क्रांतीच्या गरुडाने आम्ही आखलेल्या आराखड्यानुसारच उड्डाण करावे असे मी कुठे म्हणतो? परंतु हा क्रांतीचा नारळ अकाली फुटला नाही का? विचार कर. मिरतमध्ये आपले हिंदी सैन्यबल किती? खरे म्हणजे मीरतलाच आपल्या पक्षाचे सैन्य सर्व प्रांताहून अति अल्प आहे. त्यांचा क्रम त्यानुसार अगदी शेवटी लागायचा! पण सुरुवात तर तिथेच झाली आहे. जिथे होऊ नये तिथे झालेली ही आकस्मिक सुरुवात प्राणघातक ठरेल अशी शंका मनात का येऊ नये?

अझीम----पण आता याला काही इलाज का आहे? अशाही परिस्थितीत सावधतेने व जागरूकतेने पावले टाकण्यातच शहाणपणा आहे!

नाना----इंग्रजांची वेळ बरी म्हणण्याची पाळी येऊ नये म्हणजे मिळवली! २९ मार्चला मंगल पांडेने बराकपूरच्या भूमीवरील आपल्या एकांड्या तांडव नृत्याने बंगालच्या इंग्रजांना सावध केले. त्याचे परिणाम तिथल्या ३४ व्या आणि १९ व्या तुकड्यांचे त्यांनी नि:शस्त्रीकरण केले. लखनौला मे ३ ला बेफाम झालेल्या चार शिपायांनी लेफ्टनंट मेशॅमच्या तंबूत घुसून त्याला दम भरला; व त्याला सावध केले. अंबालाच्या आगीने इंग्रजांची झोप चाळवली

आहेच! आता त्यात या मिरतच्या सशस्त्र उठावाची अनपेक्षित भर! शिवाय हे मिरतचे सैन्य दिल्लीच्या दरवाजावर धडकण्यास गेले हा आणखी यावर कळस!

अझीम----पण दिल्लीला आतापर्यंत तरी सरशी झाल्याची खबर आहे ना!

नाना----सविस्तर वार्ता जरी हाती आली नाही तरी सरशीची वार्ता आली आहे खरी! ज्वालाप्रसादकडे आज सविस्तर वार्ता येईल तेव्हा ती कळेलच. पण या सर्व घटना माझ्या मनाला अस्वस्थ करीत आहेत! आपण जेव्हा दिल्लीला एप्रिलच्या अखेरी अखेरीस जाऊन आलो तेव्हा बादशहा बहादूरशहाना आपण ३१ मे चा दिवस कळवून आलो आहोत. या आकस्मिक उठावणीने बादशहा गोंधळून गेले नसतील कशावरून?

अझीम,----ही आपली शंका रास्त आहे. पण आज ज्वालाप्रसाद इथे आल्यानंतर आपल्या शंकांचं निराकरण होईल असे वाटते.

नाना----शिवाय असं पहा (नकाशात पंजाब प्रांत दाखवून) हा पंजाब प्रांत. याच्यावर हे पेशावर. या पेशावरलाही उठाव झाल्याची बातमी आहे. पेशावर आणि दिल्ली यांच्यामध्ये पसरलेला हा पंजाब. आमच्या क्रांतीच्या दृष्टीने काही फारसा आशादायक नाही! इथले शीख आणि पंजाबी सैनिक हे क्रांती पक्षाला काही तितके

अनुकूल नाहीत! सार्वत्रिक उठावाच्या लाटेत हे शीख आणि पंजाबी सैनिक वाहवले जाऊन आम्हास मिळतील, या आशेवर इथल्या क्रांतीची आम्ही उभारणी केलेली आहे. आता या आकस्मिक आणि त्रोटक उठावाने ते आमच्या अपेक्षेच्या अगदी विरुद्ध वागणार नाहीत काय?

अझीम---- हा. ही आपली शंका रास्त आहे. किंबहुना आपण आता जेवढ्या शंका निर्माण कराव्यात तेवढ्या सगळ्या रास्तच ठरतील! पण शंकांच्या आडरानात शिरण्यापूर्वी आपण ज्वालाप्रसादच्या येण्याची वाट पाहणे हे ठीक होईलआणि त्याच्याकडच्या बातमीनंतर पुढे काय करायचे याचा विचारही आपल्याला करता येईल! हे पहा ज्वालाप्रसादच येणं झालंच आहे! ज्वाला तू शतायु आहेस आणि तुझ्या आगमनानं क्रांती चिरायू झाली आहे!

ज्वालाप्रसाद----क्रांती खरोखरच चिरायू होण्यासारखा रागरंग दिसतो आहे सरकार!

अझीम---- होणार असा रागरंग दिसतो असली अनिश्चितच भाषा आहे का अजून?

ज्वाला----ते नंतर सांगेन. अगोदर हे दिल्लीचे वार्तापत्र घ्या. दिल्ली तर स्वतंत्र झालीं आहे. दिल्लीला स्वातंत्र्याचा ध्वज दिमाखाने फडकत

आहे! बादशहा बहादूरशहा आणि बेगम झीनतमहालानी क्रांतीचे नेतृत्व स्वीकारले आहे! स्वातंत्र्याचा जयजयकार होत आहे,.

नाना----(आनंदाने)अस्स? वाच. तूच मोठ्याने वाच ते पत्र.

ज्वाला---- ११ मे ला मिरतच्या सेना दिल्लीला येऊन पोहोचल्या. त्यांनी बादशहाच्या नावाचा जयजयकार केला. गुप्त संघटनेत सामील झालेले ५४व्या तुकडीचे शिपाई आपल्या मिरतच्या सैनिक बांधवांना मिळाले. "मारो फिरंगी को" ची गगनभेदी गर्जना उठली. दिल्लीतील शेकडो नागरिक हाती सापडेल ते शस्त्र घेऊन क्रांतीकारकांना येऊन मिळत आहेत. गोऱ्या लोकांची सरसहा कत्तल होत आहे. यमुना नदीचे पाणी लाल झाले आहे.चर्चसंस्था,चर्चपीठ, आणि चर्चघंटा उध्वस्त करण्यात आल्या. चर्च शिखरांची उंच उंच चढलेली टोके छिन्नविछिन्न होऊन धुळीत फुपाट्यात लोळत पडली आहेत. ११ ते १६ मे या पाच दिवसात नुसती आग भडकलेली दिसत होती. इंग्रजांच्या स्वामित्वाची एवढी सुद्धा खूण उरलेली नाही! दिल्लीतील दारूचे कोठार हस्तगत करण्यासाठी आमचे २५ शूर,बहादुर सैनिक प्राणपणाने लढले. अखेर ८/१० इंग्रज शिपायाकडून दारूचे कोठार आग लावून उडविले गेले. त्यात आमचे लढणारे २५ रणमर्द कामास आले!

नाना----शाब्बास शिपायांनो! दिल्लीचे दारूचे कोठार म्हणजे दिल्लीचा प्राण! ते जिंकण्यासाठी तुम्ही आत्मबलिदान केलेत! या नानाचे तुम्हा हुतात्म्यांना लाख-लाख प्रणाम!

अजीम----चर्चेस आणि त्यांची शिखरे धुळीत लोळत असलेली ऐकून कुणाचेही समाधान होईल. इंग्रजांसारख्या जुलमी पीडकांना आपल्या पंखाखाली आश्रय देऊन, त्यांच्या पारलौकिक कल्याणापेक्षा त्यांच्या ऐहिक कल्याणाचीच जास्त चिंता या चर्चसंस्थांनी वाहिली होती. ती या भूमीवर दिमाखाने उभी राहिलेली कशी सहन केली जातील? इंग्रजांची सत्ता 'यावत्चंद्र दिवाकरौ ' हिंदुस्तान वर नांदावी म्हणून आकाशातील बापाला याच सैतानी अड्यात प्रार्थना होत होत्या. हे सैतानी अड्डे आपल्या भरवस्तीत आपण स्थापू दिले याचेच पारितोषिक आपणाला गायीच्या व डुकराच्या चरबीने माखलेल्या काडतुसांचा रूपाने मिळत नव्हते का? ही नतद्रष्ट चर्चे अशीच ठेचायला हवी आहेत!

ज्वालाप्रसाद----बरोबर आहे! ही दिल्लीच्या इतिहासातील ५ दिवसांची चढाई आपल्या भारताच्या इतिहासात खरोखरीच अविस्मरणीय होऊन राहील. या पाच दिवसातील स्वातंत्र्य युद्धात हिंदू मुसलमान या दोन शतका वरच्या भेदाला मूठमाती मिळाली आहे. स्वधर्म आणि स्वराज्य यांचा उद्घोष ही भारत माता आपल्या या हिंदू

मुसलमान सूपूत्रांच्या मुखाने करीत राहिली आहे! भारत माता या सुपुत्रांना म्हणत आहे की वत्सानो यापुढे तुम्ही सर्वजण बंधूबंधूच आहात आणि दोघांनाही मी यापुढे माते प्रमाणेच आहे. तुमच्यातील भाऊबंदकीला या पाच दिवसात मूठमाती मिळालेली आहे असे समजा आणि असेच अखंड खांद्याला खांदा भिडवून पुढे चला! लढा!

अझीम---- श्रीमंत हे दिल्लीचे वार्तापत्र आपण ऐकलेत! आता आपल्या शंकांचे निराकरण झालं की नाही?

नाना----शंकांचे निरसन झालं. इतकंच नव्हे; नव्या आशेचे अंकुर माझ्या अंतकरणात अंकुरित झाले! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्यातील पहिली लढाई तर आपणच जिंकली आहे. हा अगदी सुरुवातीचा विजय. आता पिढ्यानुपिढ्या जरी ही लढाई चालू राहिली, तरी त्यांना स्फूर्ती देत राहील.

ज्वाला ----इतकी दुर्दमनीय आशा आपल्या अंतकरणात निर्माण होण्याचीच मी वाट पहात होतो श्रीमंत! १५ मे च्या बैठकीत मिरतच्या आकस्मिक उठावणीमुळे आपण खरोखर बेचैन झाला होता! आपलीच अशी स्थिती झाल्यावर आम्ही कोणाच्या तोंडाकडे पहावं?

नानासाहेब---- आम्ही तसे काही गर्भगळीत झालो नव्हतो प्रसाद! अखेर मरणाने जर आमचा आणि आमच्या स्वातंत्र्योत्स्थानाचा शेवट होणार असेल तर त्यालासुद्धा आमची तयारी आहे! या राष्ट्राच्या इतिहासात आमच्यासारखे लाखो नानां निपजतील आणि ही स्वातंत्र्याची लढाई अखंड चालू ठेवतील! आमच्या मरणाची वा अपयशाची काय तमा? तथापि मनुष्यस्वभाव आहे. आरंभिलेलं कार्य याची देही याची डोळा तडीस गेलेलं पाहण्याची आमची इच्छा आहे.

ज्वालाप्रसाद---- आणि परमेश्वर आपल्याला ते सौख्य देवो अशीच आमचीही इच्छा आहे!

नाना ----पण तू मघाशी दुसरं काही सांगण्याचे राखून ठेवलं आहेस त्याचं काय?

ज्वाला प्रसाद---- हो. दिल्लीच्या या स्वातंत्र्य वार्तेनंतर लगेच ही दुसरी वार्ताही हाती आली आहे सरकार. ते इंग्लंडचे इराणबरोबर चालू असलेले युद्ध थांबले आहे आणि तिकडील सैन्याला तत्काळ हिंदुस्थानात येण्याविषयी आज्ञा देण्यात आली आहे. दुसरी वार्ता अशी की पंजाबमध्ये गोऱ्या सैनिकांच्या तुकड्या अधिक आहेत आणि तेथील शीख फलटणी इंग्रजांच्या बाजूने लढण्यास दिल्लीकडे येत आहेत. अंबाला ते दिल्ली यामधील पतियाळा,

नाभाआणि झिंद या संस्थानांनी बादशहानी पाठविलेल्या निमंत्रणाचा अनादर करून संदेशवाही स्वारांना ठार मारले आहे. स्वतःच्या कोशातून पैसा काढून ते तो मुक्तहस्ताने यांना देत आहेत व इंग्रजांच्या सैन्यभरत्या करीत आहेत.

नाना---- ऐकलंस अझीम! मी जे म्हणत होतो तेच आपल्यापुढे या अनपेक्षीत उठावणी मुळे वाढून येत आहे. पंजाबात इंग्रजांचे पाय पक्के होत आहेत. आमच्या योजनेनुसार उठावणी होती तर इंग्रजांना अशी जुळवाजुळव करण्यास अवधी मिळता ना!

अझीम---- झाली आहे खरी तशी गोष्ट! सबंध हिंदुस्तानात एकदम जर उठा होता, तर अगदी दोन-तीन आठवड्याच्या अवधीत या कंपनी सरकारने इथून गाशा गुंडाळला असता निश्चित! पण यामुळे घाबरून जाण्याचे काय प्रयोजन? दोन-तीन आठवड्याच्या कालाने जे होणार होते ते आता दोन-तीन महिन्यांच्या अवकाशात होईल! अखेर विजयश्री तर आपलीच आहे ना?

नाना----तशी आपण आशा करूया! आता आपली पाऊले मात्र सावधपणे पडली पाहिजेत.!

ज्वाला प्रसाद----ही तिसरी दुःखदायक वार्ता ऐका, तिसरी दुःखदायक वार्ता अशी की अंबाला ते दिल्ली या रस्त्यावर असलेल्या सहस्त्रावधी खेड्यातून अगदी सहज जाता जाता जे जे म्हणून हाती

लागतील त्याची सरसहा वधस्तंभावर रवानगी होत आहे! वधमंच्याकडे नेण्यात येणाऱ्या या अभागी दीनांवर हे गोरे लोक त्यांच्या डोक्याचे केस पुंजक्या पुंजक्याने उपट, कुठे बागनेटाने त्यांना भोसकून त्यांच्या अंगाची चाळण उडवून दे, त्यांच्या तोंडात पवित्र अशा गोमांसाचे तुकडे भाल्याने बळेबळे कोंब, असले पाशवी अत्याच्यार करीत येत आहेत. त्यामुळे अंबाला ते दिल्ली या प्रदेशात इंग्रजांचा दबदबा वाढला असून लोकांमध्ये कमालीची भीती निर्माण झाली आहे.

नाना---- इतके क्रूर कर्म हे चांडाळ तिकडे करीत आहेत काय? याद राखा म्हणावं! इकडे नाना अजून जिवंत आहे. त्या क्रूरकर्मीचे प्रायश्चित आज ना उद्या तुम्हाला घ्यायला लावल्या शिवाय आम्ही कदापिही राहणार नाही!

अझीम----सरकार, आता पुढील पावले कशी टाकायची त्याबद्दल काही विचार झाला पाहिजे.

ज्वाला---- मला वाटतं आपण आता ३१ मे चीच वाट पाहत थांबू नये. जशी वेळ येईल आणि संधी मिळेल तशी उठावणी करावी.

नाना ----बरोबर आहे. पण आता एक गोष्ट साधली पाहिजे.निदान गंगा मातेच्या परिसरातील प्रदेशापासून खाली झाशीच्या राज्यापर्यंतच्या प्रदेशात एकदम उठावणी झाली पाहिजे आणि त्याच्या सिद्धतेसाठी

आपणापैकी कुणालातरी कानपूर, झाशी, प्रयाग, काशी, लखनौ, लाहोर या ठिकाणी हिंडून आले पाहिजे. या कामगिरीवर आम्हीच स्वतः जाऊन यावं असं म्हणतो!

अजीम ----कानपूरची सुत्र हलवण्यासाठी आता आपण इथे रहाणं फार आवश्यक आहे असं मला वाटतं. सर्व हवा तापलेली आहे. कुठे ठिणगी उडेल आणि सारी हवा पेटून उठेल याची निश्चिती नाही. तेव्हा आपण इथे राहणं अधिक श्रेयस्कर!

नाना'----आम्ही तसे का अधिक दूर जात आहोत? कानपूरच्या परिसरात तर हिंडून येणार आहोत!

ज्वाला----मलाही अझीम प्रमाणेच वाटतं! तेव्हा आम्हा दोघांपैकी माझ्यावरच ती कामगिरी का सोपवीत नाही?

नाना---- इतर ठिकाणचे राहू द्या, पण झाशीला तर आम्हाला स्वतःलाच गेले पाहिजे. तिकडे ती आमची बहीण या आपल्या भावाकडे डोळे लावून बसली असेल. (एवढ्यात एक चौकीदार प्रवेश करतो)

चौकीदार----(लवून मुजरा करून) श्रीमंत इकडे कुणी इंग्रज शिपाई काही काम घेऊन आला आहे

नाना----इंग्रज शिपाई? (अझीमुल्लाकडे व ज्वालाप्रसाद कडे सार्थ दृष्टिक्षेप टाकून) जा. त्याला आत पाठवून दे.

a

(चौकीदार मुजरा करून जातो)

इंग्रज शिपाई आणि यावेळी? काही सुगावा तर नाहीना लागला त्यांना?

अझीम---- काही अनपेक्षित मात्र निश्चित असणार! (इंग्रज शिपाई प्रवेश करतो. इंग्रज पद्धतीने नुसता लवून राजवंदना देतो.)

इं. शिपाई----हा खलीता आम्ही टुमच्याकडे घेऊन आलो. हा सर व्हीलरने राजेसाहेबांना दिला.

नाना----(खलिता घेत) सर व्हिलर साहेबांकडून?

इं. शिपाई ----yes sir.

नाना----(लखोटा फोडून वाचतो वाचताना त्याच्या चेहऱ्यात फार सूक्ष्म फरक होत राहतात. सुरुवातीस आश्चर्य नंतर संशय, चिंतन, सूक्ष्म आनंद व असे विविध भाव उमटून जातात)काही हरकत नाही! सर व्हीलर साहेबांना आमचा रामराम सांगा! त्यांच्या मदतीस आम्ही नेहमी तयार आहोत असं कळवा.

इं. शिपाई----अच्छा! May I take His excellency's leave?

नाना----अच्छा! या तुम्ही.

(इंग्रज शिपाई राजवंदना करून निघून जातो)

a

नाना----(मोठ्याने हसून) अझीम किती अनपेक्षित घटना आहे ही! खरोखर क्रांतीला तू एका विलक्षण पक्षाची जी मघा उपमा दिलीस ती किती सार्थ आहे! ऐक ; मीच वाचतो हा खलिता --

***राजा नानासाहेब,***

***यांना सर व्हीलरचे वंदन. हा खलिदा आम्ही मुद्दाम आपणास धाडीत आहोत. प्रसंग पडल्यास कानपूराचे संरक्षणार्थ धावून याल असा आम्हाला भरवसा वाटतो. आपण एक सुसभ्य हिंदू आहात. आपण कंपनी सरकारशी राजनिष्ठ आहात. आपण कानपूरास पुढील काम ठरविण्यासाठी आपल्या सैन्यासह येण्याचे करावे. तुम्हाला आमच्या छावणीत ठेवून कोषागार रक्षणाचे काम देण्याचा आमचा विचार आहे***

***-सर व्हीलर***

a

नाना----का आहे की नाहीअझीम?

अझीम----आपल्या बाजूने चांगले फासे पडताहेत सरकार!

नाना----कानपूरचे संरक्षणार्थ धावून याल असा भरवसा वाटतो काय? येणारच! यात काय संशय आहे? फक्त संरक्षण कुणापासून करायचे एवढाच प्रश्न बाकी आहे.

अजीम----बरोबर आहे. तुम्ही आता इंग्रजांनी बोलावल्यावरून स्वतःचे सैन्य घेऊन कानपूरच्या संरक्षणासाठी जावयाचे आणि स्वातंत्र्याकरिता उठलेल्या स्वबांधवांशी लढावयाचे ही इंग्रज नीती! जास्त काळजीने रक्षण केले जावे म्हणून लाखो रुपये असलेले कोषागार रक्षणासाठी आपण हाती घ्यावयाचे आणि या सर्व सहाय्याकरिता इंग्रजांनी तुमचे आभार मानावयाचे! यावरून एकच गोष्ट सिद्ध होते सरकार! अगदी गळ्याशी सुरी आली असून सुद्धा आपल्या कोणत्याही कामगिरीचा सुगावा या लाल तोंड्यांना लागलेला नाही. अजून ते अंधारातच चाचपडत आहेत!

नाना----हा सारा तुझा आणि ज्वालाप्रसादचा प्रताप आहे. ज्वालाप्रसादची तर धन्य आहे! एकूण एक गुप्त बातम्या इंग्रजांकडून कळतील, पण इकडची एवढी सुद्धा त्यांना कळू न देण्याची याची कार्यकुशलता सर्वश्रेष्ठ आहे!

a

ज्वाला----आत्ताच ही एवढी स्तुती नको श्रीमंत! अजून परीक्षा दूरच आहे! प्रस्तुत काय करायचे ते एकदा ठरवून टाकू!

नाना---- आता अधिक ते काय ठरवायचे? आमच्या ऐवजी आता तूच एका घोडेस्वाराला बरोबर घेऊन झाशी, काशी, लखनऊ, अलाहाबाद, लाहोर फिरून ये.त्या ठिकाणच्या क्रांती प्रमुखांनी आता कानपूर कडे डोळे लावून बसावे. आम्ही आता कानपुरास कंपनी सरकारचा पाहुणचार घेण्यास सुखेनैव जातो. त्यांच्या कोषागाराचे एरव्ही रक्षण कसे होणार? २३ जून १८५७ची पर्वणी साधू. त्यादिवशी इंग्रजी सत्तेला हिंदुस्थानात शंभर वर्षे होतात! त्या सत्तेला आम्ही त्या दिवशी तिची शंभर वर्षे भरल्याची ग्वाही देऊ. प्लासीतील लढाईच्या पराजयाचा पुरेपूर मोबदला वसूल करू. याच दिवशी बरोबर शंभर वर्षापूर्वी या भारतभूमीच्या स्वातंत्र्याचे मणी-मंगळसूत्र तुटून तिने आर्त किंकाळी फोडली होती. त्या अशुभ दिवसाचे अपमानाचे शल्य इतके खोलवर घुसून हिंदुस्तानचे अंतकरण कापीत राहिले आहे कि आज शंभर वर्षाच्या काला नंतरही तो पातकी काळा दिवस, नी त्याच्या अशुभ आठवणी प्रत्येक हिंदवासियांच्या अंतकरणात अजून ओल्याच आहेत! त्या दिवशी झालेले पारतंत्र्याचे भयानक व खोल घाव आज शंभर वर्षानंतर आपल्याला भरून काढलेच पाहिजेत. कानपुरास ३१ मे नंतरच कदाचित लवकरही उठावणी होईल. जूनच्या पहिल्या

a

आठवड्यात उठावणी करावयाची हे निश्चित! तेव्हा कानपूरच्या उठावाबरोबर झाशी,काशी उठली पाहिजे, हे लक्षात ठेवण्याचा संदेश आता तूच घेऊन जा. ताबडतोब निघ. आता वेळ नको.

ज्वाला प्रसाद----ठीक आहे श्रीमंत! (जातो)

अझीम----पण मी कोणती कामगिरी सांभाळावी श्रीमंत? आता केवळ सल्लामसलत देण्याची कामगिरी नको. आता या बाहूंच्या पराक्रमाला वाव मिळेल अशी कामगिरी सांगा.

नाना----बाहूच्या पराक्रमाला वाव देण्याचीच कामगिरी सांगणार आहो अझीम! तुमच्याकडे आमचं मंत्रीपद तर राहीलच ;त्या शिवाय कानपूराच्या सैन्याच्या सूत्रधाराचं काम तात्या टोपेच्याच बरोबरीत तुम्हीही करा. तुम्ही आता सुभेदार टक्कासिंगाची गाठ भेट घ्या. उठावणी करणाऱ्या कानपूरच्या घोडदळाच सरसेनापती पद टक्कासिंगाला द्या. पूढचे बेत ठरवा आणि वेळ साधून उठावणी करा. कोषागारावर आम्ही आहोतच. तिथे आम्हाला द्रुढाआलिंगन देण्याला या.

अझीम--- या कामगिरीवर मी बेहद खुश आहे सरकार!

नाना--- झाली ना खुशी! चला तर! कार्याला लागा. भारतमातेच्या शुभमंगलाची शुभघटिका भरत येत आहे.तिच्या पूजनाला ही

a

शीरकमळं उतरवून ठेवण्याची सिद्धता ठेवून समरांगणात उडी घेऊ! २३ जुन १८५७ ची पर्वणी साधू.

(चौकिदार प्रवेश करतो)

चौकीदार----स्यू जेनीबाई आल्या आहेत. त्या आत येण्याची परवानगी मागत्यात.

नाना ----आली का ही पुन्हा? जा तीला पाठवून दे.

(स्यू जेनी प्रवेश करते)

स्यू जेनी----नमस्ते महाराज.

नाना---- नमस्ते स्यू जेनी.

स्यू जेनी---- कुठे आहे ज्वालाप्रसाद?

नाना--- का त्याला भेटायचं होतं?

स्यू जेनी----हो. पण त्याची भेट घडण्याचे भाग्य आज तरी माझ्या नशिबी आहे का? दोन महिने आईबापांनी भेटू दिले नाही आणि गेल्या पंधरा दिवसात मी जेव्हा पाच-सहा वेळा भेटण्यासाठी म्हणून आले तेव्हा त्यांनी स्वतःच माझ्यापासून तोंड फिरवलं! काय झालं आमच्या घरी त्यादिवशी देव जाणे! तिकडे आई बाप काही सांगत नाहीत आणि इकडे हा माझी दखलच घेत नाही.

अझीम---- ज्वालाचं तुमच्या वरचं प्रेम आटलं असा संशय येत नाही तुम्हाला संजीवनी बाई?

स्यू---- ते कधी शक्य आहे? मी त्याला चांगला जाणते. तथापि तो निर्दय बनलेला आहे. त्याला निष्ठुर व्हावं लागलं आहे.

नाना----मग तुम्हाला ज्वालाविषयी तिटकारा नाही वाटत?

स्यू जेनी----तिटकारा? नाही उलट त्याच्याकडे अधिक जीव ओढला जातो. फेकला गेलेला चेंडू जमिनीवर आपटून अधिक जोराने उसळी घेतो ना, तसा!

नाना ----तुमची ज्वाला वरची अतूट प्रीती आणि ज्वाला- विषयीची खात्री पाहून मला तुमच्याविषयी विलक्षण आदर वाटतो संजीवनी बाई! पण काही एका करणा निमित्त ज्वालाप्रसाद तुम्हाला भेटू शकत नाही ; इतकंच सांगू शकतो आम्ही. तुम्हाला अजून काही काळ कळ सोसावी लागेल. मात्र अखेर ज्वालाप्रसाद तुमचाच आहे याची खूणगाठ बांधून ठेवा.

स्यू जेनी----तुमचं हे आश्वासन प्रत्येक वेळी मिळत आहे, म्हणून मी ही जिवंत तरी राहिले आहे महाराज! पण आज माझं मन केवळ आश्वासनानं शांत होणार नाही!किती काळ ही आश्वासन माझ्या

तोंडावर फेकत राहणार आहात तुम्ही? आज मला प्रत्यक्ष त्याच्याशी बोलायचं आहे! कुठे आहे ज्वालाप्रसाद?

अझीम----कसं सांगू तुम्हाला संजीवनी देवी? आज तर ज्वाला प्रसाद तुम्हाला मुळीच भेटू शकणार नाही. आता त्यानं ब्रह्मावर्त सोडण्याची जवळजवळ तयारीही केली असेल! आणखी काही वेळाने त्याने ब्रह्मावर्त सोडलेली असेल! त्यांची आणि तुमची भेट आता किमान महिना- पंधरा दिवस तरी होईल असं दिसत नाही!

स्यू जेनी----काय सांगत आहात हे अझीम? मी आज किती आशेने आले होते. आज प्रत्यक्ष माझ्या डॅडींनी मला ज्वालाप्रसादकडे आपण होऊन पाठवलं आहे. हे पहा त्यांनी केलेल्या गीतेच्या इंग्रजी भाषांतराचं हस्तलिखित! हे हस्तलिखित आपल्या गुरुंनं एकदा पाहावं असं डॅडी ना किती -किती वाटतं! ज्वालाप्रसादना आमच्या घरी यायची डॅडीनी का मना केली हेच मला कळत नाही. हे भाषांतर होऊन आज आठ दिवस झाले.ज्वालाप्रसादना दाखविण्यासाठी डॅडी किती उत्सुक आहेत. पण करतात काय? त्यांनीच तर ज्वालाप्रसादना दारं बंद केली आहेत. शेवटी न राहवून त्यांनी हे भाषांतर माझ्याकडे देऊन मला त्यांच्याकडे पाठवलं. किती आशेने मी हे भाषांतर घेऊन आले आहे अझीम, तुम्हाला कल्पना नाही! या गीतेच्या भाषांतरामुळे तरी माझा ज्वालाप्रसाद मला भेटेल,

माझ्याशी चार औपचारिक शब्द तरी बोलेल, असं मला वाटलं होतं.

नाना----पण त्याला आता आमचा नाईलाज आहे संजीवनी देवी!

स्यू जेनी----काय तुम्ही माझी चेष्टा तर आरंभलेली नाही महाराज? का उगीच माझा छळ करता आहात? का हा छळवाद मांडला आहे माझा तुम्ही? नाही तुम्ही मला फसवित आहात! ज्वालाप्रसाद इथं आहे. सांगा त्याला मी इकडे आले आहे म्हणून! मला भेटल्याशिवाय नाही राहावयाचा तो!

अझीम--- नाही संजीवनी देवी! आम्ही खरी गोष्ट तीच सांगतो आहोत तुम्हाला! तूर्त तुम्हाला ज्वालाप्रसाद भेटू शकत नाही!

स्यू.----काय ते मला भेटू शकत नाहीत? नाही असं होणार नाही! होऊ शकत नाही! नाही, नाही, नाही! (चिडून) दुष्ट चांडाळानो,तुम्हीच तर काही डाव रचलेला नाही ना हा? हो.हो.खात्रीने हा तुमचाच डाव आहे. तुम्हीच त्यांना माझ्यापासून लपवून ठेवीत आहात! तुम्ही माझ्या विरुद्ध काही कट रचलेला आहे. तुमचा काही स्वार्थ आहे! किती निर्दय आहात तुम्ही!

नाना---- संजीवनी देवी शांत व्हा! अशा भावनेच्या आहारी जाऊ नका. विचारांचा ताबा सोडू नका!

a

स्यू----(रडकुंडीला येऊन) काय बोलते आहे मी हेच मला समजत नाही! महाराज, आता माझा अंत पाहू नका हो. मला माझा प्रसाद भेटवा! भेटवा ना,!आम्ही आज कानपूरला राहावयास जाणार आहोत. इथं आता मी पुन्हा येऊ शकेन किंवा नाही हे कळत नाही! कदाचित हे माझं शेवटचं येणं असेल. आता यावेळी ज्वालाप्रसादला माझ्यापासून लपवू नकाहो!

नाना----का तुम्ही ब्रह्मावर्त सोडणारा हा आहात?

स्यू जेनी---- तिकडे ते बंडवाले उठलेत ना आमच्या जीवावर! आम्हाला कानपूराशिवाय दुसरं सुरक्षित स्थळ आहे कुठे जवळपास? बंडवाल्यांनी जीवावर शस्त्र धरलं आहे. आता तुम्ही तरी मला संपूर्ण जीवनातूनच उठवू नका!

नाना----नाही देवी, आम्ही दुष्टपणाने काही बनावट सांगत नाही. खरी तीच गोष्ट सांगत आहोत. ज्वालाप्रसाद आता ब्रह्मावर्ता च्या बाहेर जाण्यासाठी मार्ग आक्रमित आहे. आता तो परत येईपर्यंत त्याची भेट नाही.

स्यू जेनी----(चिडून) तुम्ही शुद्ध पशू आहात! तुम्हीच केवळ नव्हे! माझी मम्मी, माझे डॅडी, तुम्ही आणि तुम्हीही सारेजण पशूच आहात! तुम्ही माझी अघोरी थट्टा आरंभली आहे. ज्वालाप्रसादांची व माझी

भेटच होऊ द्यायची नाही असे तुम्ही ठरवले आहे! आज पर्यंत डॅडींनी छळ केला. आपला कावा लपविण्यासाठी डॅडीनं ही गीतेच्या भाषांतराची प्रत ज्वालाप्रसादकडे पोहोचविण्याची शक्कल लढविली! जणूकाही ते या गावचेच नाहीत! पण मी काही आता बोंडल्यानं दूध पिणारी राहिले नाही! मला सगळं कळतं! मला तुमचा कावा उमगला! तुम्ही सारी जण एकमेकांना सामील आहात! तुम्ही एकमेकांनी माझ्या विरुद्ध माझ्या ज्वालाविरुद्ध कट केलेला आहे! तुम्ही कट वाले आहात. दुष्ट आहात. चोर आहात. चांडाळ आहात. डाकू आहात!

(तिला रडू कोसळते स्पुंदून रडू लागते.)

पडदा

---

# अंक--३रा प्रवेश--२

++++++++++++++++++++++

स्थळ ----रस्ता----स्यू जेनी हातात गीतेच्या भाषांतराची प्रत घेऊन निराश अंतकरणाने नानासाहेबांच्या प्रासादावरून परत घरी जात आहे. रस्त्यात नानकचंद येतो. स्यू जेनी चाललेली बघून तिला हाक मारतो.

नानक----हॅलाव, स्यू जेनी! चाललात कुठे?

स्यू जेनी----कुठे? अशी समोर रस्ता फुटेल तिथं!

नानक ----इतक्या अगतिक का? रस्ता फुटेल तिथं जाण्यापेक्षा रस्ता ठरवून चालावं माणसानं!

स्यू जेनी---- पण केव्हा केव्हा रस्ताच सापडत नाही नानक.

नानक ---- तेव्हा कुणाची तरी मदत घ्यावी. मी दाखविण्यास तयार आहे तुम्हाला मार्ग. माझ्या मागून याल?

स्यू जेनी----देऊ केलेल्या मदतीबद्दल मी आभारी आहे. पण ही मदत मी साभार परत करणे मला भाग आहे. वाईट वाटतं.

नानक ----स्यू जेनी माझं ऐक. माफ कर. मी तुला एकेरी संबोधतो आहे. पण माझ्या म्हणण्याचा विचार कर.

स्यू जेनी---- आता स्पष्टच सांगितलं पाहिजे असं दिसतं. तुमचा अर्ज मी केराच्या टोपलीत टाकला असं समजा.

नानक----पण माझ मत ऐकून घेतल्याशिवायच?(स्यू जेनी जाऊ लागते तिला अडवून) थांब; मी तुला असा आज जाऊ देणार नाही! माझं म्हणणं तुला ऐकून घ्यावच लागेल!

स्यू जेनी----असं आहे तर!

नानक---- हो ;आज किती दिवसांनी -किती महिन्यांनी भेट तुझी होते आहे ही. तुला हृद्गत सांगितल्याशिवाय सोडणार नाही मी आज.

स्यू जेनी ----का? तुला यापूर्वीही का भेटला आलं नाही?

नानक---- तुझ्या घरी तुझी आई आहे ना! तिच्या सल्लामसलतीन चालून तिच्या मार्फत तुला वश करता येईल असं वाटलं होतं. पण ती धूर्त बाई गाजर डोळ्यासमोर बांधून ठेवून एखाद्या गाढवाला पळवीत ठेवावं तसं मला सारखा पीटाळीत आली आहे.

स्यू जेनी ----गाढवाला यापेक्षा चांगलं वागवीत नसतातच मुळी!

नानक---- मी गाढवाचं नाही बोलत, माणसाविषयी बोलतो आहे. मी माणूस आहे हे त्या तुझ्या गाढवी आईला कळेल तर ना!

स्यू जेनी---- गाढवी जवळ गेल्यावर लाथाळ्या बसणारच. माणसानं गाढवी जवळ जावच कशाला?

नानक---- म्हणून हा मी आता डायरेक्ट तुझ्याजवळ आलो आहे. योगायोगानंच ही गाठ पडली म्हणेनास.

स्यू जेनी ----पण ही गाठ पडली ठका ठका! हे लक्षात ठेवून बोल.

नानक ----खरंच का तु माझा विचार करणार नाहीस?

स्यू जेनी---- कितीवेळा सांगितलं तरी गाढवाच्या डोक्यात शिरणार नाही ते!

नानक ----असं आहे तर उडत गेलीस! मी ही तुझी पर्वा करीत नाही. मला जहागीर मिळाली म्हणजे आमच्या जातीतल्या कितीतरी थोरामोठ्यांच्या बायका माझ्या गळयात पडतील.

स्यू जेनी---- पण तू जहागीरदार होशील तेव्हा ना?

नानक---- ते काही आता दुर्लभ नाही. कंपनी सरकारला इथल्या बंडवाल्यांची बातमी नक्की कळविली की कंपनी सरकार माझ्यावर पैशाचा नुसता पाऊस पाडेल! शिवाय मी कंपनी सरकारात कोणीतरी मोठा अंमलदार होईन ते निराळेच!

स्यू जेनी ----वा तुझी स्वप्नं तर मोठी गोंडस आहेत. पण तुझ्या त्या भावी ऐश्वर्यावर खुश होऊन तुला बाटग्याला कोणी हिंदू स्त्री माळ घालेल हे विसरून टाक.

नानक---- बाटगा? कोण बाटगा? मी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे तरी कुठे अद्याप?

स्यू जेनी ----आज नाही उद्या!

नानक ----हे तरी तुला सांगितलं कुणी? तू मिळाली असतीस तर ख्रिश्चन होण्याचा प्रश्न होता. तुझ्यासाठी म्हणून मी ख्रिस्ती होणार होतो. आता तुझ्या त्या चांडाळ आईचं--

स्यू जेनी----(रागाने)नानक तोंड आवरून बोल.

नानक ----का? मी बेधडक म्हणेन! तुझ्या या चांडाळ आईचं --

स्यू जेनी---(एकदम तोंडात भडकवून) तोंड म्हणण्यापूर्वीच असं तोंड फुटेल तुझं! (नानक थोडावेळ स्तंभित होतो पण मग रागाने तिच्या अंगावर धावून जाऊ लागतो. पण स्यू जेनीन तेवढ्यात पिस्तूल सज्ज केलेले पाहून मागे सरकतो. घाबरून उभा राहतो)

स्यू जेनी---- आणि पुढे सरशील तर इथेच खलास होशील.

नानक---- (चडफडत)याचा बदला पुरेपूर घेईन! इंग्रजांकडे माझं जे असेल नसेल ते वजन खर्च करून तूझ्या त्या ज्वालाप्रसादलाच पकडून आणवतो. मला सगळं कळलं आहे. तुला 'तो ' हवा आहे नाही? ज्वालाप्रसादचा संशय आलाच आहे सर व्हीलरला. फक्त खात्री करून घेण्याचं तेवढं राहिलं आहे. मलाही आजवर काही नक्की

सुगावा लागलेला नाही. म्हणून मी गप्प आहे. आता मी छातीवर हात ठेवून त्याला ज्वालाप्रसादच्या कारस्थानची खात्री दिली की तुझ्या डॉन जुआनची शंभर वर्ष भरलीच म्हणून समज! तू त्याची संजीवनी काय? तुला ही त्याच्याबरोबर तुरुंगात खितपत पाडवितो. ज्या हातांनी तू या गालफडावर मारलीस, त्याच हाताने तुझ्या डॉनजुआनचे गाल रंगावयास लावले नाही तर नाव सांगणार नाही.

स्यू ----तू कुत्रा काय पराक्रम गाजविणारा आहेस ते मी चांगलं ओळखून आहे. तुझा तू आता रस्ता पकड. माझ्या वाटेला आता यापुढे येशील तर तुला स्वर्गाची वाट पकडावी लागेल. तुझ्यासारखी मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या गळयाला नख लावणारी अधमाधम श्वापद जन्मावित हा मानवजातीलाच कलंक आहे.

नानक---- मातृभूमीच्या साम्राज्याच्या गळयाला नख लावणारी हे बोलते आहे ना? तुझ्यासारख्या मातृभूद्रोही अवलादीच्या शब्दांची किंमत काय करावी हे जगाला चांगलं कळतं. जा, मिरवीत जा तुझे ते तोंड! माझ्या तोंडावर जर जग कलंक फासणार असेल ;तर त्याच जगाला त्याच न्यायानं तुझ्या ही तोंडाला काळोखी फासावी लागेल. (झटक्यात निघून जातो)

स्यू जेनी----(हळूहळू पावले टाकीत जात असताना) हा बोलला हे काही खोटं नाही. माझ्या राष्ट्राचं साम्राज्य हिंदुस्थानात धोक्यात आहे हे

a

जाणवत असूनही मी ज्वालाप्रसादसाठी या साम्राज्यावर उलटले असं सारे इंग्लिश जग म्हणणार नाही का? शम्हणजे नानकचंद आपल्या मातृभूमीच्या दृष्टीने जेवढा अपराधी आहे ; तितकीच मी माझ्या मातृभूमीच्या दृष्टीने अपराधी ठरेन का? मन हे पार्शल असतं हेच खरं.

(पडदा)

-- -----

# अंक----४था,. प्रवेश---१ला सुरु

स्थळ ---- कानपूर. इंग्रजांनी उभारलेल्या किल्ल्याच्या तटा जवळचा भाग. (वेळ सकाळची.) दिनांक २६ जून १९५७

(केशव भट नुकताच देवपूजा आठवून विश्रांतीस्थानाकडे जात आहे. नानासाहेबांनी आपल्या छावणीत देवपूजा आटोपली आहे. त्याच्या मागून लगबगीने घोडेस्वार जात असतो. घोडेस्वार त्याला मागे टाकून पुढे जाऊ लागतो.)

केशव ----अरे कोण; शिवशील! आं? तू होय?

रंगराव ----हो!

केशव ----हो काय? विटाळ झाला असता ना? सोवळ्यात आहे मी!

रंगराव----पण इतका घाबरला होतास का? अजून हात कापतो आहे तुझा!

केशव ---- अरे काय विचारतोस रंगराव? लढाईची धामधुम आहे ना? कुठली बुद्धी झाली आणि पुणं सोडून ब्रम्हवर्तात पेशव्यांच्या कडे आलो असं झालंय! चालू संबंध महिना नुसती ही धामधूम माजून राहिली आहे.

a

रंगराव----मग तुला काय त्याचं? तुझं देवघर सुरक्षित आहे ना?

केशव----कसलं देवघर घेऊन बसलास रंगराव? माझ्या निवासस्थानाहून पेशवे सरकारच्या छावणीपर्यंत जायचं आणि छावणीतून परत निवासस्थानाकडे जायचं म्हणजेच केवढ तरी महाभयंकर कृत्य आहे. अरे ;जीव अगदी मुठीत धरुन पळत असतो. ठाऊक आहे?

रंगराव----अरे पण का?

केशव---- मोठा शहाणाच दिसतोस तू? गेले दहा-बारा दिवस मी जगलो आहे, यावरच माझा विश्वास बसत नाही. बिगुलांचा कर्कश आवाज काय, तोफा, बंदुकी, तलवारी कुकऱ्या आणि संगिनी यांचा धुमधडाड आणि खणखणाट काय! कानठळया बसल्या आहेत माझ्या! केव्हा तोफेचा गोळा या डोक्यावर आदळेल याचा भरोसा नाही. आणि म्हणे का?

रंगराव----अरे पण आज लढाई थांबली आहे.

केशव---- थांबली लढाई?

रंगराव----ते काय लढाई थांबविल्याचे किल्ल्यावर फडकणारे निशाण! कालच इंग्रजांनी उभारले आहे ते!

केशव----काय खरं म्हणतोस की काय?

रंगराव----ते निशाण तरी खरं मानशील तू? दिसतं ना तुला?

a

केशव---- अरे असणारच! दे टाळी! आं!पण थांब. मी सोवळयात आहे. लढाई न थांबून करते काय? लढाई थांबावी म्हणून आणि श्रीमंतांना जय मिळावा म्हणून मी देवांना संकटात घालून ठेवलं होतं! उगाच नाही? अगदी गळयापर्यंत त्यांना पाण्यात बुडवून ठेवलं होतं! लढाई थांबत नाही म्हणजे काय? चेष्टा आहे? देवांना बुडवून टाकलं असतं ना या महातेजस्वी ब्राह्मणांन!

रंगराव---- तरीच! पेशवे सरकारांना जय का मिळाला याचे रहस्य मला आत्ता कळालं! मला वाटत होतं की सारा आमच्या क्रांती सेनेचा विजय आहे! अरेरे; फुकट आमची क्रांतीसेना गेले २० दिवस धुडगुस घालत होती तर! फुकट इंग्रज अधिकाऱ्यांची मुंडकी उडविली होती. घाबरगुंडी उडालेल्या इंग्रजांनी आपल्या गढीचा आश्रय घेतला तेव्हा क्रांतीकारकांनी तिला वेढा घालून त्यांच्यावर बंदुकीच्या गोळयांचा गेले दहा-बारा दिवस सतत वर्षाव केला, तोही फुकट गेला म्हणायचा! कुणाचे डोळे फोडले, तर कुणाच्या शरीराच्या चिंधड्या चिंधड्या उडविल्या! इंग्रज स्त्रिया विधवा झाल्या ; कुणी तट कोसळून त्याखाली गाढले गेले; अन्नाचा साठा संपल्यामुळे कुणी अन्न अन्न करुन मेले; किल्ल्यात पाणी तर इतके दुर्मिळ झाले की इंग्रजांची पोरे टोरे कातड्याच्या पखालीच चोखत बसली; कुणी महामारी, हागवसण,विषमज्वर यांना पटापट बळी

पडले आणि जे बॉम्ब गोळयांच्या स्फोटाला किंवा आजारीपणाला बळी पडले नाहीत, ते हे भीषण दृश्य पाहून वेडेच होऊन गेले. हे सारे फुकट म्हणायचे! तुझ्या संकटात घातलेल्या आणि गळयापर्यंत पाण्यात बुडबिलेल्या कायसे म्हणालास ना; त्या देवावर भार घालून सर्व क्रांती सैनिक नुसते बसते, तर आज अगदी सुखासुखी कंपनी सरकार आणि त्यांचे हे गोरे लोक मुठीत धरून शरण आले असते. नाही?

केशव भटजी---- होच मुळी! हे काय सांगायला हवं? एकूण काय आमच्या श्रीमंतांच्या पक्षाचा विजय झाला तर!

रंगराव ----अजून खरं वाटत नाही की काय तुला?

केशव---- खरं तर वाटलंच ; पण एक कोड देखील उलगडलं.

रंगराव ----कोडं? आणि ते कसलं?

केशव----अरे, आज श्रीमंत सरकार पूजेसाठी कितीतरी वेळ बसून राहिले होते. गेल्या महिनाभरात कधी केली नव्हती ती षोडशोपचारे पूजा आज त्यांनी केली.! मी मनात म्हणत होतो की आजच कुठून त्यांना ही बुद्धी आठवली आणि हे इतक्या वेळ पूजा करीत बसले आहेत.

रंगराव ----असं वाटण्याच कारण?

केशव---- अरे पूजा संपते केव्हा आणि मी माझ्या निवासस्थानापर्यंत एकदाचा सुखरूप जाऊन पोहोचतो कसा, याची चिंता माझ्या मनात! गेला पंधरवडा हा असा जीव मुठीत धरून घराकडे पळत असतो. पटपट पूजा आटपली की जीव भांड्यात पडत असे. पण आज पहावे तो तब्बल एक तास श्रीमंत पूजेस बसले होते. जीव असा काय टांगणीला लागला होता म्हणतोस! लढाई थांबल्याचं ऐकून आता कुठे या जीवात जीव आला बघ!

रंगराव ----आणि इंग्रजांचा विजय झाला असता तर तुझ्या संकटात टाकलेल्या देवांचं काय झालं असतं? देवांना काय तू खरोखर बुडवून टाकलं असतंस?

केशव---- देवांना मी एक दुसरा मार्ग ठेवला होता. त्यांनी जर इंग्रजांकडून माझ्या पूजेची दक्षिणा देवविली असती तर त्यांना बाहेर काढण्याचे मी कबूल केलं होतं! बाकी इंग्रजांचा पराजय झाला हे ठीक झालं.. इंग्रजांचा हिंदुस्थानातून नि:पात होऊन तरी जायला हवा, नाही तर त्यांनी तरी त्यांचं तोंड काळ करायला हवं!

रंगराव ----अरे वा! असं कधीपासून म्हणू लागलास तू? इंग्रजांना देवानंच इथं पाठवले आहे. ते इथून जातात ही गोष्ट बरी नाही, असं तूच नेहमी म्हणायचास नव्हे?

a

केशव,----हॅ! असं कधी मी म्हणालो असंणं शक्य आहे? ब्राह्मण आहे मी! खोटं नाही बोलायचा!

रंगराव----असेल, असेल. पण त्यांनी इथं का राहावं याबद्दलच पुराण या ब्राह्मणाच्या तोंडून ऐकल्याचं मला चांगले स्मरतं. आता ते इथून का गेले पाहिजेत यावर तुझं एक प्रवचन ऐकव म्हणजे झालं!

केशव ----का गेले पाहिजेत? काय प्रश्न झाला की काय हा? अरे सारा अधर्म माजविला आहे अधर्म त्यांनी! आमच्या हिंदू धर्मात ढवळाढवळ करीत राहिले आहेत हे लोक! सती जाण्याची चाल काय वाईट होती? आमच्या धर्म संस्थापकांनी डोके घासून घासून ती चाल शास्त्रात समाविष्ट केली होती म्हटलं!

रंगराव----तरीच तुझ्या डोकीचा तुळतुळीत गोटा झालेला दिसतो! त्यांचाच वंशज ना तू?

केशव---- ऐक रे! चेष्टेचा विषय नव्हे हा! या धर्मलंड इंग्रजांनी एका चुटकीसरशी कायदा पास करुन ती चाल बंद करून टाकली आहे म्हणे! सरकारी नोकऱ्या काय ऐऱ्यागैऱ्यानी करायच्या आहेत? अरे कलम चालविण्याचा आम्हा ब्राह्मणांचा जन्मसिद्ध पवित्र अधिकार तो! आज ऐकतो तर म्हणे जाती धर्मनिरपेक्ष मुसलमानांना आणि ऐऱ्यागैऱ्याना सरसकट सरकारी नोकऱ्या मागण्याला मोकळी

ठेवली आहे! विधवाना म्हणे पुनर्विवाह करण्याला चारी वाटा मोकळ्या ठेवण्यात येणार आहेत! हा काय धर्म झाला? नुसते बंड आहे बंड! कुठल्या फिरंग्यानं म्हणे श्रीमद्भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर सुरू केलं आहे. एकेक ऐकावं ते नवलच! या पुण्याच्या ब्राह्मणाच्या तळपायाची आग नुसती मस्तकाला जाऊन भिडते. संस्कृत भाषा म्हणजे काय चेष्टा आहे? साक्षात देव भाषा ती! तिला या यावनी भाषेचा विटाळ? हर हर! कहर झाला नुसता! तूच सांग अशा या इंग्रजांनी इथून काळं करायला नको का?

रंगराव ----संपलं का तुझं प्रवचन?

केशव----संपलं म्हणून काय विचारतोस? किती बोलावं तेवढं थोडंच आहे. पण बोलायला सवड कुठे आहे?

रंगराव----इतकी कोणती काम अडली आहेत?

केशव---- काम अडली नाहीत काही! पण हे प्राण अडकले आहेत ना या देहात! ही लढाई तू थांबली म्हणतोस ; पण केव्हा पुन्हा तोफेचे गोळे धडधडायला सुरुवात होईल नेम नाही! इथं उभं राहिल्या जागीच एखादा बॉम्बगोळा डोकीवर फुटायचा! केव्हा कपाळमोक्ष होईल याचा काही भरवसा नाही! तेव्हा म्हटलं---

रंगराव---- काय आणखी म्हणतोस?

केशव---- काही नाही! हे तीर्थ घे आणि आता चालू लाग बघू! तीर्थ प्यायलाही थांबू नकोस! पितापिता एखादा बॉम्ब आदळेल!

रंगराव---- किती भ्याड आहेस तू! अरे आता इथं कानपूरात इंग्रजांचे सगळे बॉम्ब गोळे एकदम थंड पडले आहेत! आता या तटाजवळच मंत्री अझीमुल्लाखान आणि सर सेनापती तात्या टोपे येणार आहेत. त्यांच्या आणि इंग्रजांकडील अधिकाऱ्यांच्या काही तहाच्या अटी इथे आता ठरावयाच्या आहेत! मी हा असा पुढे पूर्व बंदोबस्तासाठी आलो आहे! ते पहा नाक्यानाक्यावर आमचे सैनिक पहारा करण्यासाठी उभे आहेत. तू आता चालू लाग. मी ही आपला माझ्या कामाला लागतो.

केशव ---चल बाबा. मी तीर्थाचे पाणीच शिंपडीत जातो कसा! म्हणजे तह फिस्कटायला नको! तहाच काम अगदी निर्वेधपणे होईल! चल,!(तीर्थाचे पाणी पळीने शिंपडत निघून जातो. रंगरावही त्याच्या मागून जातो)

(अजीमुल्लाखान व तात्या टोपे प्रवेश करतात)

अजीम---- अखेर इंग्रजांचे नाक कानपूरला तरी खाली झालं! ते पाहिलंत सेनापती ; इंग्रजांच्या किल्ल्यावर ते पांढरे निशाण! कालपासून

a

वाऱ्यावर फडफडत आहे! इंग्रजांचं पांढरा फटफटीत पडलेलं तोंडच जणू यां नीशाणाच्या रुपाने इथं उघड्यावर मांडलं गेलं आहे!

तात्या ----इंग्रजांची उरलीसुरली लाजही त्या फडक्याच्या मीशानं वाऱ्यावर उघडी पडली आहे; असंही म्हणता येईल! या तलवारीची तहान काही अजून शमलेली नाही मंत्री!

अझीम---- तिची तृषा भागवायला अजून खूप रान मोकळं आहे सेनापती! तिथे कानपूरला आपले पाय आज स्थिर होणार आहेत! इथून आपल्याला पुढे सर्व हिंदुस्तानभर उड्डाण करायचं आहे! आपल्या तलवारीच्या पल्याला मला वाटतं एवढी सर्व हिंदुस्थानची भूमी पुरी पडेल!

तात्या ----हिंदुस्थानच्या सरहद्दीपर्यंत काय, पण या पृथ्वीच्या ध्रूवापर्यंत तरी या इंग्रजांचा पाठलाग करण्यास मिळाला, तरीही माझं समाधान होणार नाही! पृथ्वी गोल आहे म्हणून! ती जर सपाट असती तर या पृथ्वी वरूनच कुठेतरी खोल गर्तेत या इंग्रजांना या तलवारीच्या टोकानं लोटून दिलं असतं!.

अझीम----मी याचेपेक्षाही काही भयंकर केलं असतं! स्वतःचा स्वार्थ ज्या गोष्टीमुळे टिकेल, तीच यांचा न्याय, आणि स्वतःच्या स्वार्थाविरुद्ध जी गोष्ट असेल ती तेव्हढीच ज्यांना अन्याय वाटते अशा या

इंग्रजांना या विश्वातच राहण्याचा अधिकार नाही! सध्याचा गव्हर्नर डलहौसी तर या इंग्रज साम्राज्यवाद्यांचा शुद्ध अर्क आहे! साम्राज्य विस्तारास जे पोषक असेल ते तेवढे योग्य आणि इतर सर्व अयोग्य अशी टांग्याच्या घोड्याप्रमाणे किंवा रानडुकराच्या एकांगी मुसुंडी प्रमाणं त्यांची पद्धत आहे! ती पहा! नाक खाली झालेली त्या डलहौसीच्याच जमातीची तीन लाल माकडं येत आहेत इकडे! यांच्याशी आता डोकं शांत ठेवून बोलणी करायची आहेत!

तात्या---- शरण आलेल्याला अभय दिलं पाहिजे,ही नीती जर आडवी आली नसती, तर या सर्व इंग्रजांच्या रक्ताच्या सड्यानं हे कानपुर भिजवून टाकता आलं असतं! या जंगली जनावरांना या किल्ल्यातच अग्निवर्षावाखाली जाळून काढता आलं असतं! पण हृदयस्थ परमेश्वर आहे ना! म्हणूनच केवळ या मर्कटांशी बोलणी करावयाची!

(मुर, व्हायटिंग आणि रोक हे तीन गोरे तहाची बोलणी करावयास येतात)

तिघे----Good Morning Mr.Azim.

अझीम---- सब लोगो को नमस्ते! आईए.हम आपकी ही राह देख रहे है!

मूर----Why can't you speak in english,Mr Azim?

a

अझीम---- हम अच्छी तरह से अंग्रेजी बोल सकते है! लेकिन आज की बाते हिंदी में ही होगी!

व्हायटिंग----But we can't speak Hindi well! you see!

अझीस---- जी हा ; मै जानता हु! बातचीत अच्छी तरह से करते न होंगे! लेकिन अच्छी तरह से समझ सकते तो सही!

रोक----ठीक है! ठीक है!

अझीम---- अभी ऐसा कुछ बोलो! हिंदी हमारी भाषा है ;और आज कि हमारी बाते सारे हिंदुस्तान के दृष्टी से महत्त्वपूर्ण है! इसलिये आज का सब कुछ लिखना बोलना हमारी भाषामेही होगा, !

मूर----अच्छा! तुम्हारे ही वजायतसे ले लो! आज हम लोग सरंडर्ड है! तुम्हारी सूने बिना दुसरा रास्ता नाही!

व्हायटिंग----This is too much humiliating for us to bear Mr. Azim.

आझीम---- ह्यूमिलिएटिंग याने अपमानास्पद बात तो है, कि आप लोग पराजित हुए है! पराजयसे बढकर दुसरी कोई अपमानास्पद बात हम तुम्हारे लिये नही लाये है! तुम्हारा कहना हम सुन लेते है, यह तुम्हारा बडा सम्मान समजलो! समझे?

रोक----जी हा अभी कुछ काम की बाते करो! खाली भाषाभिमान की बातें छोड दो! Leave it Moor; Whiting. Don't take it so seriously.

अझिम----अच्छा तो पहली शर्त-- अंग्रेजो ने आपका सब तोफखाना, शस्त्रागार, दारूगोला, और खजाना श्रीमंत सरकार नानासाहेब पेशवे इनको स्वाधीन करना,क्या मंजूर है?

मूर ----मंजूर है! मगर हम लोगों को इलाहाबाद को नानासाहेबने बंदोबस्त मे संरक्षण देकर भेज देना होगा!

तात्या----आम्ही काय म्हणून संरक्षण द्यावे? आम्ही आपले तुम्हाला जास्तीत जास्त नावांमध्ये बसवून देऊ. गंगा मातेच्या पात्रातून पुढे अलाहाबादेस जाण्याचे आपले तुमचे तुम्ही पाहून घ्यावे.

अजीम---- हां!आम्ही तुम्हाला नावे मध्ये बसविण्याची जबाबदारी पत्करू!

रोक----ठिक! तेवढी तरी गोष्ट करा.

व्हायटिंग----पण नावांची व्यवस्था चांगली आमच्या मनाप्रमाणे झाली पाहिजे. नावा ओबड-धोबड किंवा सुखसोयी विरहित असून उपयोगी नाही!

a

तात्या ---श्रीमंत नानासाहेब पेशवा कंजूस मनाचा कधीच नव्हता व नाही हे बारीक लक्षात ठेवा! तुम्ही त्याच्या हक्काची आठ लाख रुपयांची पेन्शन अगदी निमकहरामी करून बंद केलीत. तरी सुद्धा तो राजा तुमचे आतिथ्य, आदर सत्कार पूर्वीच्याच उदारतेने करीत होता हे तुम्हाला ठाऊक नाही काय?

रोक---- तसे नानासाहेब शरीफ आदमी आहेत. आम्ही ओळखतो त्यांना.

तात्या ----मग झालं तर! नांवा सुखसोयींनी सुसज्ज ठेवण्यात येतील! त्यांच्यावर चीवाट्यांची छते नि छप्पर उभारून आत बसावयाची व्यवस्था अगदी आरामशीर करण्यात येईल! धान्यधुन्य भरून देऊन तुमची पाठवणी एखाद्या नवपरिणित वधूप्रमाणे समग्र संसारानीशी करण्यात येईल! मग तर झालं?

मूर----Thats all right. परंतु हम लोग प्रथम इन्स्पेक्शन करेंगे! हमको वह राईट-- हक रखना!

अझीम ----यहा तुम्हारे हक्क की बात नही! वरना हमारे सौजन्य की बात है! हमारे सौजन्य पर विश्वास करो!

व्हायटिंग ----No,No. हम दुष्मनोंके सौंजन्यपर विश्वास नही कर सकते!

a

अझीम---- हां, यह अंग्रेज लोगों जैसा है! लेकिन शरण आये हुए दुश्मनों को भी मित्र समझना यह भारतीय सभ्यता है! यह भूलो मत! हम अपनी सभ्यताको कभी नही छोडेंगे!

रोक---- जाने दो यार! हमे इन्स्पेक्शन कर दे! वह बात भी तुम्हारे सौजन्यकी होगी!

अझीम----और दुसरोपर विश्वास न करना यह अंग्रेजी नीति भी जगजाहीर होगी! तुम इन्स्पेक्शन जरूर कर लो! मगर तुम लोग कब जाया करोगे?

तात्या ----हो, तुम्ही लोक कधी निघणार?

व्हायटिंग---- हम लोग कल जाया करेंगे!

तात्या----कल नहीं! आजही जाना होगा!

मूर----यह कैसी बातें कर रहे हो? हमे जाना तो है! लेकिन जरा धीरे से जाने दो!

तात्या ----नही! आज की बातें आजही होनी चाहिये! उसमे क्या इतनी कठीनाईयां है? आज शाम तक तुम अपना बाडबिस्तरा बांध सकते हो!

रोक---- क्या आप दुसरे दिन तक का भी समय नही दे सकते?

अझीम---- नही जी! राजनीति की बात है! तुम्हारे अंग्रेजी मे ही कहावत है ना! Don't put up till tomorrow!

व्हायटींग----अजी जरा हमारी ओर तो देखो! कितनी बडी आफत आ पडी है! आज ही रात हम कैसे जायेंगे? कुछ तो रिझनेबल बाते करो!

तात्या---- हमारा राज्य, हमारे सातारके छत्रपती का सिंहासन, श्रीमती पेशवे सरकार का आठ लाख रुपयौंका वार्षिक तनखॉ, सबकुछ एकदम मे हडप करते वक्त तम्हारी रिजनेबल बातें और तुम्हारा रिजन क्या इंग्लंड मे रख कर यहा तुम आये थे? जो तुम हमे रिझनेबल बातें आज सिखा रहे हो?

रोक----माफ करो! हम लोग मुर्दा जैसे हो गये है! हमे फिर मारने मे क्या हासिल है?

अझीम----अच्छा तो ऐसा करो, आज की ही रात को सब कानपूर का ताबा श्रीमंत नानासाहेब को दे दो! शाम ढलतेही सब (शस्त्र) नीचे रखना.और तोफखाना हमारे कब्जे मे दे देना! और कल सुबह होते ही यहॉंसे आप लोगो ने रस्ता पकडना! क्या मंजूर है?

मूर----जी हा मंजूर है!

अझीम ----तो चलो, अभी इकठ्ठे बैठकर यह सब बातें लिखेंगे! तुम व्हीलर कि दस्तखत लेकर एक प्रती हमारे पास भेज दो और हमारे

a

श्रीमंत पेशवे सरकार की दस्तखत की एक प्रति तुम्हारे पास हम भेज देंगे! अच्छा शुक्रिया!(नमस्कार करतो)

मूर----आप लोगो ने यह तह किया इसलिये थँक्स!

अझीम ---तुम लोगो ने हमारी बातें मानी इसिलिये आपको धन्यवाद!

(रोक, मूर, व्हायटिंग जातात)

तात्या----बस, आज हाती कानपूर आले! प्लासीच्या लढाईत लागलेला पराजयाचा कलंक धुण्याचा प्रारंभ झाला! इंग्रजांचे पांढरे पाय उद्या गंगाकिनारी वळण्याचा मुहुर्त ठरविला गेला. अनमोल क्षणांपैकी हा एक आनंददायी क्षण आहे मंत्री!

अझीम----आमच्या आनंदात सहभागी होण्यासाठी जर यावेळी इथं हा तह ठरवितांना ज्वालाप्रसादअसता तर हा आनंद शतपटीने वाढला असता. उद्या कानपूरच्या घराघरावर आमचं स्वातंत्र्याचे निशाण जेव्हा फडकेल, तेव्हा दाही दिशांना वाऱ्याच्या वेगानं ही बातमी कळेलच कळेल! पण उद्या स्वातंत्र्याचा भगवा ध्वज फडकवायच्या आतच ही बातमी ज्वालाप्रसादला कळाली तर त्यालाही विशेष आनंद होईल! त्याच्याकडे एक खास माणूस पाठविण्याची व्यवस्था करावयास श्रीमंत पेशवे सरकारांना सांगू!

a

तात्या----चला उद्यापासून दिग्विजयास प्रारंभ! चलो दिल्ली! दिल्लीला घोडे नेऊन भिडवल्याशिवाय आता स्वल्पविराम सुद्धा नाही! चलो दिल्ली. (जातात)

(किल्ल्याच्या तटाचा पडदा वर जातो आणि प्रवेश दुसरा लगेच सुरू होतो)

---

# अंक---४ प्रवेश----२रा सुरु

(सतीचौरा घाटाचे दृश्य. गंगा किनार. इंग्रज लोकांची नावांत बसून देण्याची व्यवस्था घाटावरून तात्या टोपे आणि अझीमुल्ला पाहात आहेत. नावा तयार झालेल्या आहेत)

तात्या टोपे----(थोडावेळ निरीक्षण करून झाल्यावर) आता जवळ जवळ सर्व तयारी झालेली दिसते.

अझीम----हो. ते पहा. सर व्हीलर आणि त्याचा परिवार नावावर चढत आहे. तो पहा. आता एक दोन मिनिटात नांवा सोडण्याची इशारत करण्यास हरकत नाही.

तात्या टोपे----कानपूर आता पवित्र झालं! हे गंगे, माते आता अपवित्र भार तुझ्या पाण्यावरून वाहून नेऊन अलाहाबादेस सुखरूप पोहोचव किंवा तुला हवे ते कर! आता आमची जबाबदारी संपत आली.

अझीम---- हे पहा! चढलेच सर्वजण. आता काढा आपला रुमाल. करा इशारत.(दोघेही रुमाल काढून इशारत करतात एवढ्यात पडद्यामागे हल्लकल्लोळ माजतो. "मारो फिरंगी को "ची गर्जना उठते) अरे हे

a

काय? हा कसला आवाज? हे कोण लोक? हे बिगुल काय वाजताहेत?

तात्या---- आणि ते पहा कितीतरी जणांनी नदीत उड्या टाकल्या

अझीम---- आणि ते तिकडे काही सैनिक घोड्यांवर सुद्धा चढले सुद्धा. अरेरे! इंग्रजांची खरोखरच शंभर वर्षे भरली! ते पहा! किती तरी लोक तलवारीने इंग्रजांच्या माना कापून नावातून खाली पाण्यात टाकत आहेत.

तात्या----हर हर ही कत्तल कोणी सुरू केली? याना आज्ञा कोणाची?

अझीम----नावांना आगी काय लावल्या! इंग्रजांनी पाण्यात उड्या काय टाकल्या! त्यांच्यावर पाण्यातही शस्त्र काय चालवले जात आहे? बंदुकीच्या गोळ्यांनी नावेतून उडी मारता मारता इंग्रज टिपले जात आहेत. ते पहा. चला, हे काय अराजक आहे ते जातीने पाहू. (जातात)

(एवढ्यात शेफर्ड कुटुंबाला फरपटत ओढीत काही रक्त, धुळीने माखलेले ४/५ क्रांती सैनिक स्टेजवर प्रवेश करतात)

पहिला क्रांती सैनिक---- खेचा त्यांना, दगडामागे लपून बसून प्राण वाचवितात काय? घेऊन चला तिकडे त्या प्रचंड खडकावर त्यांना!

तिथे या तिघांनाही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य पूजकांची तलवार किती तिखट असते ते दाखवू!

मिसेस शेफर्ड ----लोक हो, सोडा आम्हाला! आम्ही शरण आलो आहोत! आम्ही निरपराधी आहोत! इथे ज्वालाप्रसाद कुठेतरी असलाच पाहिजे. (मोठ्याने हाका मारते.)ज्वालाप्रसाद! ज्वालाप्रसाद! ज्वालाप्रसाद! (एक घोडेस्वार प्रवेश करतो)

घोडेस्वार ----कोण ज्वालाप्रसादच आमच्या हेर प्रमुखाचे नाव घेत आहे?

मिसेस शेफर्ड ----मी, आम्हाला त्यांना भेटायचं आहे. ते इथं असतील तर निश्चित आम्हाला संरक्षण देतील.

घोडेस्वार ----थांबा. सैनिकहो, यांचे ज्वालाप्रसादांशी खरोखर चांगले संबंध असतील तर यांना संरक्षण दिले पाहिजे. काय तुम्ही ज्वालाप्रसादांना ओळखता?

मिसेस शेपर्ड ----ते आमचे चांगले मित्र आहेत!

मिस्टर शेपर्ड----नाही, ही थेरडी खोटं बोलते आहे. ज्वालाप्रसाद हे नाव मी आजच ऐकतो आहे. आम्ही त्यांना जाणत नाही. विचारा हवं तर या माझ्या मुलीला! प्राण वाचवण्यासाठी ही थेरडी खोटं बोलते.

मिसेस शेपर्ड----नाही, हाच खोटं बोलतो. ज्वालाप्रसाद, ज्वालाप्रसाद, -

a

मीस स्यू जेनी----मम्मी चूप. डॅडी म्हणतात तेच बरोबर आहे. आम्ही ज्वालाप्रसाद वगैरे जाणत नाही. आमचा तो शत्रु आहे. तुम्ही लोक दुश्मन आहात आमचे.

पहिला क्रांतिकारक---- देशबांधवा,कशाला मध्यस्थी करतोस? यांच्या रक्ताच्या थेंबाथेंबात आम्हा लोकांविषयी वैरभाव आहे. यांच्या रक्ताला इथं वहावलच पाहिजे! सैनिकहो खेचा त्यांना. न्या,त्या एकदा बोला ऐकत आहे शिळेवर आणि करून या आपली कामगिरी.

मिसेस शेपर्ड ---ज्वालाप्रसाद -

पहिला क्रांतिकारक ---चूप थेरडे.

स्यू जेनी----मम्मी, ज्वालाप्रसादच नको येशूचं नाव घे.

(स्यू जेनीला व मिस्टर शेपर्डला क्रांतीसैनिक हिसका मारून नेतात आणि मागून मिसेस शेपर्डला फरपटत नेतात. पडद्यात जाता जाता आणि गेल्यावरही मिसेस शेपर्डच्या हाका ऐकू येतात. शेवटी हाकांच्या ऐवजी दोन किंकाळ्या उठून विलीन पावतात)

# अंक---४ प्रवेश--3 सुरू

(कानपूरातील एका राजवाड्याच्या दालनातील दृश्य--

प्रवेश १ मधील प्रसंग घडला, त्याच्या दुसऱ्या दिवशी हा प्रसंग घडतो. सकाळचे दहा वाजलेले आहेत. राजवाड्यातील या गर्भागारात शिवाजी महाराज, थोरले बाजीराव पेशवे, माधवराव पेशवे यांच्या भव्य प्रतिमा भिंतीला टांगलेल्या आहेत. स्वातंत्र्याच्या, हिंदुस्थानच्या, हिन्दी स्वराज्याच्या, अनंत उर्मी नानासाहेबांच्या मनामध्ये उसळलेल्या आहेत. शिवाजी महाराज आणि थोरले बाजीराव यांच्या पराक्रमाची दिव्य स्फूर्ती नानांच्या हृदयात उसळत आहे. राजवाड्यावर स्वातंत्र्याचा ध्वज डौलाने फडकत आहे. विचारमग्न मनस्थितीत नानासाहेब मुकाट्याने इकडुन तिकडे येरझाऱ्या घालीत फिरत आहेत. यावेळी पडदा वर जातो.)

लक्ष्मी---- ("झाशीची महाराणी "अशा नावाची घोषणा झालेली आहे. प्रस्तुत कानपूरला ती नानासाहेबाना भेटायला आलेली आहे. नानासाहेबही तिच्या येण्याची वाट पहात आहेत. नानासाहेबांच्या तीन-चार येरझाऱ्या होतात. एवढ्यात महाराणी प्रवेश करते.) नाना, ही मी आले!

a

नाना---- ये ; झाशीची राणी लक्ष्मी, साक्षात स्वातंत्र लक्ष्मी ये! तू यावेळी इथे यावस म्हणून मी तुझ्या वाटेवर हे डोळ्यांचे नंदादीप, माझ्या पंचप्राणांच्या त्यात ज्योती उजळून अखंड पेटते ठेवले आहेत!

लक्ष्मी---- आठवते भाऊ तुला? मी झाशीची राणी होईपर्यंत ब्रह्मावर्ताला प्रत्येक भाऊबीजेच्या सणाला सुवर्ण पात्रात रत्नजडीत निरांजन ठेवून या मंगल आरतीने तुला ओवाळीत असे! आठवतं तुला?

नाना---- बालपणातल्या सुखद स्मृती विसरणे कुणाला शक्य आहे? बालपण हे तर सर्व जीवनातील अमृतकुंभ आहे! ते अमृत पिऊनच माणूस पुढील जीवनातील विषारी प्रवाह पचविण्याला समर्थ होत असतो!

लक्ष्मी----मलाही ते बाळपण सदाच हवहवसं वाटतं! आणि आज तर त्याचा हव्यास उत्कटपणे जीवाला लागला आहे! भाऊ; आज ही तुझी मनू झाशीची महाराणी या नावाच्या तबकात आपल्या दोन डोळ्यांची ही निरांजन उजळून तुला ओवाळायला अधीर झाली आहे! आज स्वातंत्र्याची यमद्वितीया आहे. तुझ्याकडून भाऊबीज काय मिळणार याचा मी विचार करीतच करीतच आले आहे.

नाना----आणि हा नानासुद्धा भाऊबीजेच्या ओवाळणीनिशी सिद्ध आहे. तुझ्या मंगलारतीच्या तबकात ठेवण्यासाठी खऱ्याखुऱ्या अर्थाने

स्वातंत्र्याच्या सोन्याचे पाणी चढवून' श्रीमंत सरकार नानासाहेब पेशवे ' ही बीनमोल चीज तुझ्या या भावाने घडवून ठेवली आहे. ये.झाशीची महाराणी. तुझ्या या स्वातंत्र्यदेवतेचा पुजक बनलेल्या भावाला ओवाळ. आपण ही यमद्वितीया साजरी करू.

लक्ष्मी---- श्रीमंत नानासाहेब पेशवे! मी आज तुम्हाला या डोळयांनी ओवाळून धन्य झाले. पृथ्वी मोलाची भाऊबीज मला आज मिळाली. श्रीमंत सरकार नानासाहेब पेशवे या सुमंगल शब्दावलीच्या सार्थ नावापुढे स्वर्गीय संगीत सुद्धा कवडीमोल आहे!

नाना----मनू, झाशीची राणी, हे अनमोल तबक मला ओवाळण्यासाठी तू जे घडवून आणलंस त्याची कहाणी तुझ्या तोंडून एकदा ऐकावी अशी इच्छा झाली आहे!

लक्ष्मी ----नाना ही तुझी बहीण तुझ्याशी नेहमीच स्पर्धा करीत आली आहे!

नाना----आणि ती स्पर्धा मला चांगलीच जाणवली पण आहे. अजून ती चित्रे माझ्या स्मृतीत ताजी आहेत.ब्रह्मवर्ताला शस्त्रशाळेमध्ये नानाने तलवारीचे धडे घेतले रे घेतले, की छबेलीही तलवार घेऊन नाचलीच! नानाने पट्टा गरगर फिरवला, की छबेलीनेही फिरवलाच!

a

नाना गजेश्रेष्ठावर बसण्याचे शिक्षण घेतो काय? मग छबेलीलाही ते हवेच! नानाच तेव्हढा घोडा फेकतो म्हणजे काय? छबेलीनेही एक तापट जनावर आपल्या मांडीखाली घेऊन टाच मारलीच! दहा वर्षाची कोवळी मनू घोड्याला आवरता आवरता तांबडी लाल झाली ;पण पर्वा नाही! घोड्यावरून रपेट तरी तिने केली!

लक्ष्मी----अशा तुझ्या स्पर्धाळू बहिणीने आपला हरविलेला राजमुकुट मिळवण्यासाठी तू कानपूरमध्ये रणशिंग फुंकलेस आणि आपल्या पेशवेपणाची प्रकट घोषणा केलेली ऐकली मात्र! आणि तिनेही आपण झाशीची महाराणी झाल्याची घोषणा केली! क्रांतीच्या रक्त मेघांनी जेव्हा कानपूरचे आकाश चार जूनला आरक्त झाले तेव्हा झाशीच्या आकाशात ही क्रांतीची विद्युलता कडकडून तळपली!

नाना---- शाब्बास! आता जग पिढ्यानपिढ्या निश्चित म्हणत राहील की नानाला ही बहीण खऱ्याखुऱ्या अर्थाने शोभली!

लक्ष्मी---- आणि लक्ष्मीलाही हा भाऊ खऱ्याखुऱ्या अर्थाने शोभला! लढाईची घोषणा केल्यानंतर ४/६ दिवसात झाशी स्वतंत्र झाली! इंग्रजांच्या रक्ताचे पाटचे पाट झाशीच्या रस्तोरस्ती वाहत राहिले! राणीच्या दत्तकाच्या अधिकाराला मान्यता न देणाऱ्या डलहौसीच्या व राज्ये गिळंकृत करण्याच्या क्रूर अमानुष धोरणाला झाशी ने आग लावून दिली! डलहौसीच्या रक्ताचा एकही जीव झाशीच्या भूमीवर

a

राहिला नाही! आणि दोनच दिवसापूर्वी जेव्हा तुझ्या स्वातंत्र्याची कथा ऐकली, तेव्हा झाशीचे हे स्वातंत्र्य कानपूरच्या स्वातंत्र्याला डोळे भरून पाहण्यासाठी अधीर होऊन तुझ्याकडे धावत आले!

नाना----मनू, आपले बालपणीचे स्वप्न- भारतभूमीच्या स्वातंत्र्याचे मणी-मंगळसूत्र पुनरपि बांधण्यात आल्याचे उज्वल आणि सुरम्य स्वप्न साकार होण्याची वेळ येत चालली आहे! कानपूर स्वतंत्र झाले! झाशी स्वतंत्र झाली! ती पाहिलीस, गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशाही छत्रपती शिवरायांची प्रतिमा आणि ती पहिलीस; परमप्रतापी पुण्यश्लोक श्रीमंत बाजीराव पेशवे यांची प्रतिमा! या दोन प्रतिमांना आपण साक्षी ठेवून ज्या ज्या प्रतिज्ञा केल्या, त्या साऱ्यांची उजळणी मनात करीत तू येण्यापूर्वी मी येरझाऱ्या घालीत होतो. त्या सर्व प्रतीज्ञांच्या आठवांनं सारं शरीर कसं कणाकणानं पुलकित झालेलं आहे! छत्रपतींचा नेकजात मराठा आणि पेशव्यांचा कुलदीपक वंशज म्हणवून घेण्याआगळे या पृथ्वीतलावर दुसरे काही श्रेष्ठ असू शकेल? ती भूषणे नाना या नावावर चढविण्यासाठी मी उत्सुक झालो आहे. तेच आता माझं जीवितकार्य आहे.

a

लक्ष्मी----तुझ्या या जीवित कार्यात आज वरच्या प्रमाणेच भविष्यकाळातही ही तुझी लाडकी मनू सर्वस्व पणाला लावून तुला साथ करीत राहील!

नाना----याबद्दल मला तीळमात्रही संदेह नाही. झाशीची महाराणी लक्ष्मी, मी,ज्वालाप्रसाद, अझीम आणि तात्या टोपे हे भारतीय स्वातंत्र्याच्या झाडावर एका रसाने, एका दवाच्या शिडकाव्याने प्रफुल्लित झालेले पाच दळाच फुल आहे! एकच सुगंध यात भरून राहिला आहे! एकाच वाऱ्याच्या झोताने ही दळ थरथरत आली आहेत! ही अगदी एकरूप आहेत!

लक्ष्मी ----पेशवे आज अझीम, ज्वालाप्रसाद, तात्या टोपे ही मंडळी आहेत कुठं? त्यांच्याशिवाय तू इथे एकटाच म्हणजे काय? आणि तेही या आनंदाच्या प्रसंगी?

नाना---- हो तुला सांगायचं राहिलंच!अझीम आणखी तात्या हे कानपूरच्या रणकनदनातून जेमतेम बचावलेल्या इंग्रजांची अलाहाबादेस सालंकृत पाठवणी करण्यासाठी सातिचौर्या घाटावर गेले आहेत. इंग्रजांना नावांत सुखरूप बसवून देण्याची जबाबदारी आम्ही तहाच्या वेळी घेतलेली आहे. इंग्रजांना नावांत बसवून देण्याची व्यवस्था ते दोघे जातीने पहात आहेत! आज इंग्रज इथं

औषधालासुद्धा राहणार नाही! इंग्रजांच्या नांवा गंगेच्या पात्रात वल्हवल्या गेल्याचे वृत्त देण्यासाठी मी आता कान टवकारून आहे!

लक्ष्मी---- आणि ज्वालाप्रसाद ची काय हालहवाल?

नाना----ज्वालाप्रसाद आज वीस पंचवीस दिवसापूर्वी दौऱ्यावर गेला आहे ;तो तिकडेच गुंतून पडलेला आहे. इकडे आम्ही कानपूर आणि झाशीला स्वातंत्र्यसमरात विजयी झालो खरे ; पण तिकडे लाहोर, लखनौला आणि काशी प्रयागला क्रांतिकारकांची पीछेहाट होत असल्याच्या बातम्या आहेत. निष्पाप लोकांच्याही सरसहा कत्तली केल्या जात असल्याच्या महाभीषण बातम्या आहेत! सध्या ज्वालाप्रसाद काशी प्रयाग या ठिकाणीच आहे! तेथील कांती सेनेला योग्य नेतृत्व नाही! तिथल्या क्रांतिकारकांचा होत असलेला तेजोभंग सावरण्यासाठी आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी ज्वालाप्रसादने तिथे ठाण मांडण्याचे ठरविले आहे! आता इथली व्यवस्था लागली की आम्ही ही काशी प्रयोगाकडे लक्ष देऊ! आज इंग्रज कानपूरहून जात असल्याचे दृश्य पाहण्यासाठी इथे आमच्या समवेत ज्वालाप्रसाद असायला हवा होता. आपलं सुरम्य स्वप्न साकारत असल्याचं प्रत्यक्ष पाहून त्याचं हृदय निश्चित हेलावलं असतं!

a

लक्ष्मी----मी काय आता सासरची आहे! कधी वर्ष सामासिक माहेरवाशीण म्हणून तुमच्या सानिध्यात आले तर आले! पण तुम्ही चार शूर नरवीर म्हणजे आजच्या हिंदू संस्कृतीचे चार आधारस्तंभ! तुम्हा चौघांना एकत्र पाहीलं की चार वेद, चार अर्थ एकत्र पाहिल्याचे समाधान लाभतं! तुम्ही चौघे म्हणजे भारतीय स्वातंत्र्याची चतु:सूत्री आहात! यावेळी इथं ज्वालाप्रसाद खरोखरच हवा होता!

(एवढ्यात एक जासूद येतो. नाना व लक्ष्मी यांना मुजरा करून उभा राहतो. त्याचा चेहरा म्लान व दुःखपूर्ण आहे)

नाना---- कोण? ज्वालाप्रसादाचा शरीर संरक्षक?

घोडेस्वार----जी! (घोडेस्वार मुजरा करतो)

नाना---- तू आलास? ज्वालाप्रसाद कुठे आहे?

घोडेस्वार----श्रीमंत अत्यंत दुःखद वृत्त आणलं आहे मी!

नाना---- दुःखद वृत्त? कुणाविषयी?

घोडेस्वार----आपल्या हेर प्रमुखखांविषयी!

नाना---- ज्वालाप्रसादच काही बरं वाईट?

घोडेस्वार----प्रयागला इंग्रजांच्या गोळीला ते लढता-लढता बळी पडले सरकार!

नाना ----अरेरे! नेमकं नको ते वृत्त कानी आलं!

लक्ष्मी----केवळ आनंदानं उन्माद चढेल म्हणून का हा विधीन पहिला प्रहार केला?

घोडेस्वार---- त्यांचे शेवटचे शब्द सांगण्यासाठी मी इतक्या तातडीने आलो श्रीमंत!

नाना ----बोल काय आज्ञा आहे त्या नरश्रेष्ठाची?

घोडेस्वार---- त्यांचं तुम्हाला असं सांगणं-

दुसरा घोडेस्वार ----(मध्येच प्रवेश करून) इतक्या घाईने मध्येच आल्याची क्षमा असावी श्रीमंत! (मुजरा करतो) फारच निकडीचं काम आहे. मंत्रीमहाशयांकडून व सर सेनापतींच्या कडून घोडदौडीनं आलोआहे!

नाना---- बोल, तुझं काय वृत्त आहे? इंग्रजांची रवानगी झाली का?

दुसरा घोडेस्वार ----इंग्रजांविषयीचच वृत्त घेऊन आलो आहे श्रीमंत! इंग्रज नावांवर चढले. तोपर्यंत सर्व चुपचाप आणि शांत होतं.हाती वल्ली घेऊन आंबीही तयार झाले. शेवटी नांवा सोडण्याची खूण म्हणून सरसेनापतीनी हवेत घाटावरून आपला हात मागे पुढे केला मात्र! सर्वत्र" मारो फिरंगी को "असा ध्वनी उठला. बिगुलांचा आवाज घुमला. आणि तोफा, बंदुका, तलवारी, कुकऱ्या आणि

संगिनी यांचा एकच खणखणाट उठला! आंबी नांवा सोडून तीरावर पळून आले. आणि शिपायांनी पाण्यात उड्या घेतल्या. नंतर एकच हलकल्लोळ माजून राहिला आहे. नावांना आगी लावण्यात आल्या आहेत. बायका-मुले पुरुष साऱ्यांनी नावातून पाण्यात उड्या टाकल्या. काही बुडाले, काही जळून खाक झाले, जे पोहत होते ते बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडत आहेत. घाटावर शिपायांनी हत्यासत्र उघडले आहे! . मांसाचे लचके, छिन्न मस्तके, छाटलेले केस, कापलेले हातपाय यांचा खच पडत आहे संबंध भागीरथी लालभडक होऊन गेली आहे. !

नाना----खरोखरच हे अविचारी कृत्य झाले पण आमचे शिपाई असे वागले कसे?

दुसरा घोडेस्वार---- हे शिपाई कानपूरचे नाहीत सरकार! ते काशी, प्रयागकडचे पराभूत पावलेले शिपाई असावेत असा अंदाज आहे. इकडे स्वातंत्र्याचा ध्वज रोवल्याची वार्ता ऐकून ते इकडे आले असावेत. ते इतके चिडलेले दिसत आहेत की कुणाचीही दयामाया ते करीत नाहीत! मी इकडे येत असताना त्यांच्यापैकी काहींनी एक इंग्रज वृद्ध गृहस्थ, त्याची वृद्ध स्त्री व मुलगी यांना घेरले.ती तिघे आपला जीव वाचवण्यासाठी एका शिळेमागे लपून बसली होती. मी थांबून चौकशी केली. शेपर्ड या आडनावाचं ते कुटुंब होतं. त्या

a

वृद्ध स्त्रीने ज्वालाप्रसाद यांची ओळख असल्याचं ओरडून सांगण्याचा प्रयत्न करताच, मी मध्ये पडलो. पण तेवढ्यात त्या वृद्धाने त्वेषानं त्यांना आव्हान दिलं! 'ज्वालाप्रसादला मी जाणत नाही' अस मोठ्यांदा सांगण्यास प्रारंभ केला. तरुण मुलींन सुद्धा निश्चयी मुद्रेने ज्वालाप्रसादची ओळख नसल्याचे ठासून सांगितलं. माझी मध्यस्थी फुकट गेली आणि चिडलेल्या सैनिकांनी हां हां म्हणता या तिघांचीही वासलात लावली. सर्वत्र असा हाहाकार माजून राहिला आहे.

पहिला घोडेस्वार---- काय? शेपर्डसाहेबांची आणि त्यांच्या कुटुंबाची वासलात लागली? त्यांच्या संबंधितच तर मला बोलायचं होतं श्रीमंत!

नाना---- त्यांच्यासंबंधी? ज्वालाप्रसादचे शेवटचे शब्द सांगणार होतास ना तू?

प. घोडेस्वार---- हो. त्यांचेच शब्द आणि ते शेपर्डकुटुंबा विषयी होते.

नाना----मग सांग ना!

पहिला घोडेस्वार---- पण आता त्याचा काही उपयोग नाही श्रीमंत!

नाना----ते आता उघड आहे! तथापि शब्द काय होते ते आम्हाला कळले पाहिजेत!

पहिला घोडेस्वार ---शेपर्ड व त्यांच्या कुटुंबियांपैकी जर कुणी शरणार्थी म्हणून आले तर त्यांचे संरक्षण करा! शरणार्थी म्हणून आले नाही, तरी त्यांना आपण होऊन सन्मानानं संरक्षण द्या. एवढं बोलून त्यांनी आपले प्राण सोडले.

नाना----अरेरे! किती दैवदुर्विलास हा! विधिलिखितापुढे मानव किती पंगू आहे याचं हे ढळढळीत उदाहरण आहे. पण त्या तरुण मुलींनं ज्वालाप्रसादची नुसती ओळख नव्हे तर त्यांचे प्रेमाचे धागे गुंतले असूनही त्याची ओळख नाही म्हणून सांगणं हे एक मोठं कोडं आहे!

लक्ष्मी---- हा काय प्रकार आहे? तो माझ्या नीट लक्षात आला नाही नाना!

दुसरा घोडेस्वार ----पण सरकार मला आज्ञा व्हावी! तिकडे सतीचौरा घाटावर मंत्रीमहाशय व सरसेनापती आपल्या आज्ञेची वाट पाहत आहेत. शिपायांना आपली आज्ञा सांगितल्या शिवाय परिस्थिती आटोक्यात येणार नाही!

नाना ---जा!त्यांना जाऊन सांगा-

(पडद्यामागे) तरुण----श्रीमंत थांबा! एव्हढ्यात आपली आज्ञा उच्चारू नका. या घोडेस्वारामागोमाग मी ही मुद्दाम आलो आहे. आज्ञा

उच्चारण्यापूर्वी माझ ही म्हणणं विचारात घ्यावं असा माझा अर्ज आहे.

नाना---- कोण आहे रे? त्याला आत येऊ द्या!

तरूण----(एक अस्ताव्यस्त आणि धुळीने माखलेले रक्ताचे डाग पडलेले कपडे घातलेला, उन्हामुळे ज्याचा चेहरा काळवंडलेला आहे, असा एक तरुण प्रवेश करतो.) श्रीमंत पेशवे सरकारांचा जय जयकार असो!

नाना---- चेहऱ्यावरून तर तू दुःखी दिसतोस आणि तुझे कपडे पाहिले तर तू कुठून लांबून आल्याप्रमाणे दिसतोस! बरं काय आहे तुझं म्हणणं?

तरुण---- तुमचा कयास अचूक आहे सरकार! मी प्रयाग काशी कडून आलो आहे. मीच काय? कितीतरी अभागी लोक तिकडून कानपूरच्या विजयामुळे इकडे आश्रयासाठी आलेले आहे! घाटावर जी सरसकट कत्तल चाललेली आहे, ती आम्ही लोकांनी आरंभलेली आहे! पण श्रीमंत ती कत्तल अशीच चालू द्या! या कत्तलीपेक्षाही अत्यंत अघोरी कृत्य याच इंग्रजांच्या उन्मत्त भाईबंदानी तिकडे काशी प्रयाग कडे केलेले आहे! त्यांच्या तावडीतून कसेबसे सुटून आम्ही आलो. इंग्रजांनी तिकडे मृत्यूचा खेळच आरंभिला आहे.जो कुणी सापडेल त्याला फासावर

a

लटकवताहेत. फासावर लटकवतानासुद्धा अत्यंत क्रूर आणि हिडीस चेष्टा हे हैवान करत आहेत! इंग्रजी 8व 9 आकड्याच्या आकारांमध्ये कुणाकुणाला फासावर लटकवले आहे. बायका आणि पाळण्यातील मुलेसुद्धा या बदमाश नील साहेबाने स्वतःच्या हाताने जाळून टाकल्या आहेत. माझी बायको आणि तान्हे मूल प्रत्यक्ष जळताना मला पहाव लागलं. तरुण मुलींच्या वस्त्राना आणि केसांना आगी लावून हे गोरे सोजिर अत्यानंदाने टाळ्या पिटत आहेत! आणि इथे आपण त्यांची पाठवणी अगदी समारंभपूर्वक करीत आहात! कसे पहावेल हे आम्हाला? सूड! बदला! आमचे डोके फिरून गेले आहे! आम्हाला सूड घेऊ द्या! पुरेपूर बदला घेऊ द्या!

(नानासाहेबांचे मस्तक सुन्न होते. गरगरू लागते. काही काळ स्तब्धतेत जातो. आणि मग नाना आपल्या धीरगंभीर वाणीने बोलतात.)

नाना----जा घोडेस्वार, माझी आज्ञा घेऊन जा.! बायकामुलांना त्रास देण्याचे कारण नाही. त्यांच्या केसाला सुद्धा धक्का लावू नका. केवळ इंग्रज पुरुषांना फार तर मारा! ही माझी आज्ञा शिपायांना खडसावून कळवण्यास सांग!

दुसरा घोडेस्वार---- जी आज्ञा!

(मुजरा करून निघून जातो)

लक्ष्मी---- नाना! तुझी धन्य आहे! केवळ तू म्हणूनच इतका संयम पाळू शकलास!

तरुण----धन्य आहे राजे! तुमचे राजेपण तुमच्या या आज्ञेनं सिद्ध झालं! आम्ही मोकाट सुटणारी प्रवाहपतित माणसं! प्रवाहाला ही रोखण्याचं सामर्थ्य एखाद्याचच! प्रवाहाला रोखू शकणाऱ्या प्रभावी राजा, तुझा सदैव जय होवो! (जातो)

नाना ----(अंतर्मुखपणे विचार करुन) तुझा सदैव जय होवो! जय-विजयाचा उन्माद चढू नये म्हणूनच हा दिवस उजाडला की काय?

लक्ष्मी ----असं का म्हणतोस नाना तू? हा नुकता कुठे प्रारंभ आहे.

नाना----प्रारंभ! पण प्रारंभाच्याच या एका दिवशी किती परस्परविरोधी आणि विविध वार्ता ऐकाव्या लागल्या ह्या? हा सारा प्रारंभ शुभ की अशुभ? हे यामुळेच मला समजेनासं झालं आहे! आमच्या प्रक्षोभाचं हे पहिलं पर्व! पहिल्या पर्वाचा विराम इथं झाला. या पर्वाच्या अंती आमचा विजय झाला. प्लासीच्या पराभवाच विष आज पचनी पडलं. पण आजच काय ऐकावं लागलं मला? आम्हा पंचप्राणापैकी एक प्राण -ज्वालाप्रसाद - या प्रक्षोभात आत्माहूती देऊन निखळून पडला! काय झालं? कसं झालं? कसं होईल?

a

कशाकशावर प्रकाश पडत नाही! हे अनिश्चितते, तुझ्या उदरात काय दडलं आहे हे कधी कुणास कळले आहे? तोवर स्वतंत्र झालेल्या या मराठ्यांच्या पेशव्यांचे आणि या झाशीच्या महाराणीचे कोटी कोटी प्रणाम त्या हुतात्म्या कडे घेऊन जा!

आम्हा पंचप्राणापैकी निखळून पडलेल्या त्या एका प्राणाला आमचे मानाचे मुजरे पोचते कर! भारताच्या प्रक्षोभाची जी प्रचंड ज्वाला त्या ज्वालाप्रसादला आमच्या मानवंदना सुपूर्द कर!

(झाशीची राणी व नानासाहेब नतमस्तक होतात. पडद्यामागे "मारो फिरंगी को ","भारत माते कि जय ","क्रांती चिरायू हो "असे ध्वनी लाख-लाख कंठातून लांब लांब वरून ऐकू येतात आणि हळूहळू विलीन होतात.

**(पडदा)**

**समाप्त**

**दि.९/१/१९५७लेखन पूर्ण.**

==================================

या नाटकाचे प्रयोग करू इच्छीणाऱ्यांनी कृपया संपर्क करावा
कुमुद्वती भोसले
पत्ता - प्लॉट नंबर 15 ,दीप सेवक सोसायटी ,आर के नगर,
कोल्हापूर . महाराष्ट्र.
संपर्क – व्हॉट्स ऍप क्र. ९९७०१०३३७८
Email : bhosalekumudwati@gmail.com

==================================

ई साहित्यवर अशीच अनेक नाटके वाचा

**नाटक (esahity.com)**

**फक्त एक क्लिक करा.**